[redacted]

OUP—391—29-4-72—10,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M135·3 D53S Accession No. M 1958

Author ढगे, ज. ना.

Title स्वप्नसृष्टी.

This book should be returned on or before the date last marked below.

# स्वप्नसृष्टी

लेखक

ज. ना. ढगे एम्. ए.

किंमत १॥ रुपया

: प्रकाशक :
द. गो. काळे, बी.ए.
गोविंद भुवन, म्युनिसिपल
कॉलनी, पुणें ४.

: मुद्रक :
विष्णु गणेश माटे,
‘ विश्वकर्मा ’ मुद्रणालय,
१५५ टिळक रोड, पुणें २.

# प्रस्तावना

लोकांना अनादिकालापासून स्वप्नें पडत आहेत; पण स्वप्न म्हणजे काय ? असा प्रश्न केल्यास फारच थोडया लोकांस त्याचें उत्तर देतां येईल. स्वप्नांत संतांना दृष्टांत झालेले आहेत. कांहीं स्वप्नांना सांकेतिक अर्थ असतो. अर्थात् असल्या प्रकारच्या स्वप्नांना महत्त्व आहे. पण ' मनीं वसे तें स्वप्नीं दिसे ' असें बऱ्याच स्वप्नांत होतें. पुष्कळ स्वप्नें वेडगळपणाची व निरर्थक असतात. यावरून सर्व स्वप्नें एका दर्जाची नसतात, व स्वप्नांचे निरनिराळे प्रकार असतात हें दिसून येते. या पुस्तकांत रा. ढगे यांनीं स्वप्नांची उदाहरणें देऊन ते निरनिराळे प्रकार विशद केले आहेत. फ्रॉईड वगैरे मनोविश्लेषण शास्त्रवेत्त्यांनीं स्वप्नांचे जें संशोधन केलेलें आहे तें फक्त एका प्रकारच्या स्वप्नांचें आहे. फ्राईडच्या विचारांची दिशा या पुस्तकांत दाखविलेली आहे. पण फ्राईडच्या मतांत कांहीं तथ्यांश असला तरी तीं मतें सर्व स्वप्नांना लागू पडत नाहींत हें या पुस्तकांत सोदाहरण दाखविलेलें आढळेल. स्वप्नें अंतर्मनांतून उगम पावतात असें मनोविश्लेषण शास्त्रवेत्त्यांचें म्हणणें आहे. पण अंतर्मनांत जशा वेडगळपणाच्या ऊर्मि असतात तशा अंतर्मनांत उच्च ज्ञानशक्तिही असतात ही त्यांस मान्य नसणारी गोष्ट रा. ढगे यांनी या पुस्तकांत उघड करून दाखविलेली आहे. फ्राईड यानें जसें स्वप्नांचें संशोधन केलेलें आहे तसे सायाकिकल रिसर्च अथवा चमत्कार संशोधन या क्षेत्रांतही स्वप्नांचें संशोधन झालेलें आहे. या संशोधनांत उच्च दर्जाच्या सत्यमूलक स्वप्नांचा तपास लावलेला आहे. उपनिषदांत स्वप्न नांवाची जी अवस्था दिलेली आहे तींतही उच्च दर्जाचे व सत्य शिकविणारे अनुभव माणसाला येतात अशी उपनिषदांची शिकवण आहे. या पुस्तकांत उच्च प्रकारच्या या सर्व प्रकारच्या स्वप्नांचाही परामर्ष रा. ढगे यांनीं घेतला आहे आणि त्यांत माणसाला कोणकोणत्या प्रकारचे अनुभव येत असतात त्याची माहिती दिलेली आहे. रा. ढगे यांनी दिलेली स्वप्नांची उदाहरणें पौर्वात्य आहेत आणि पाश्चात्यही आहेत. त्यांत वाचकाला स्वप्नांचे निरनिराळे प्रकार सांपडतील, आणि स्वप्नांस्वप्नांमधील तारतम्य ध्यानांत येऊन स्वप्न या भानगडीच्या विषयावर नीट प्रकाश पडेल अशी आशा आहे.

**राजाराम सखाराम भागवत**

# दोन शब्द

आजकालच्या कोणत्याही पाश्चात्य ग्रंथकारानें लिहिलेले मानसशास्त्रावरचें एखादें पुस्तक उघडलें म्हणजे त्यांत ‘ स्वप्न ’ या विषयावर एखादें तरी प्रकरण बहुधा आढळतें. यावरून या विषयाकडे शास्त्रज्ञांचें चांगलेंच लक्ष वेधलें गेलें आहे हें सिद्ध होतें. परंतु आजकालचे बहुतेक सर्व शास्त्रज्ञ हे केवळ जडवादी असल्याकारणानें त्यांनीं स्वप्नाची केलेली मीमांसा अपुरी वाटते. माणसाच्या जाणिवेचे कप्पे विविध असून माणूस निरनिराळ्या लोकांत निरनिराळ्या जाणिवेनें व्यवहार करू शकतो अशा अर्थाचे उल्लेख उपनिषद्‌वाङ्मयांत व योगाभ्यास विषयक ग्रथांत आढळतात; परंतु हे सर्व उल्लेख सर्वसामान्य माणसाला दुर्बोध व गूढ वाटण्यासारखे आहेत. माणसाच्या विविध व्यक्तित्वाची व जाणीवेची स्वच्छ व शास्त्रीय माहिती देणारे ग्रंथ, परलोकवासी डॉ. ॲनी बेझंट व रेव्हरेंड सी. डब्ल्यू. लेडबीटर यांनीं संशोधनपूर्वक लिहिलेले आहेत. त्यांच्याच ग्रंथांचा या पुस्तकाच्या उभारणीस बराचसा उपयोग झाला.

‘ स्वप्नसृष्टी ’ या विषयावर पुण्यास एकदा माझें व्याख्यान झालें होतें त्यावेळीं एका बाईनें असा प्रश्न विचारला होता, कीं. ‘ तुम्ही विषय समजून देतांना पाश्चात्यांचीच उदाहरणें कां देतां ? ’ या विषयावर माझे निरनिराळे लेख सह्याद्रि, वसंत, रोहिणी, महाराष्ट्र इत्यादि मासिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाले त्यावेळीही अनेक वाचकांनीं असे व असल्याप्रकारचें प्रश्न विचारले होते. या सर्व प्रश्नांच्या मागे ‘ आमच्या धर्मग्रंथांत सर्व कांहीं आहे. आम्हांला दुसऱ्यांनीं शिकविण्याची जरूर काय ? ’ ही अहंभावना दडलेली होती हें उघड आहे. परंतु आमच्या पूर्वजांनीं लिहून ठेवलेले ग्रंथच जर वैशिष्ट्यपूर्ण गूढ पद्धतीनें लिहिलेले, तें समजून घेण्याची आमच्यापैकीं पुष्कळांना इच्छा नाहीं तर पाश्चात्यांनीं परिश्रमपूर्वक गोळा केलेला पुरावा विषय समजून घेण्यासाठीं कां आधाराला घेऊं नये ? माझ्या बऱ्याचशा वाचकांनीं व परिचित माणसांनीं त्यांना पडलेल्या मजेदार

स्वप्नांच्या हकीकती मला सांगितल्या आहेत. परंतु " माझ्या नांवाचा लेखांत उल्लेख करूं नका " असें ज्याचें त्याचें अगदी निक्षून सांगणें. मी जर कुणाला म्हणालो, " अरे बाबा, तुला हा जर प्रत्यक्ष अनुभव आला आहे तर तूं तारीख, वार, वेळ, व नांवनिशि मला लिहून दे. त्याचा मला पुरावा म्हणून उपयोग करितां येईल. " तर त्या माणसानें तुम्हांला जरूर लिहून देईन, एवढेच आश्वासन द्यावें व कांहींच करूं नये. असें अनेकांच्या बाबतींत घडलें आहे. यावरून या विषयाच्या संशोधनांतील अडचणींची कल्पना येईल. तरीसुद्धां मी प्रस्तुत पुस्तकांत माझ्या परिचित माणसांचे कांहीं अनुभव नांवानिशी देऊं शकलो. माझ्या सर्व वाचकांनीं आपले पूर्वग्रह बाजूला ठेवून हें पुस्तक वाचावें व त्यांस स्वप्नसृष्टीसंबंधी जर कांहीं वैशिष्ट्यपूर्ण अनुभव आले असतील तर ते त्यांनीं मला माझ्या ४ शापुरजी माणेकजी रस्ता टेंभी, ठाणें या पत्त्यावर कळविण्याची कृपा करावी ही नम्र विनंति आहे.

ज. ना. ढगे

# अनुक्रमणिका


| | प्रकरण | पान |
|---|---|---|
| १ | स्वप्नांतील जाणीव | १ |
| २ | मनोव्यापारांची व्याप्ती | ११ |
| ३ | झोपेंत व्यवहार करणारीं माणसें | १६ |
| ४ | दडपलेल्या भावना | २३ |
| ५ | स्वप्नांतील काळ | ३३ |
| ६ | स्वप्नांतील दूरदर्शन | ४१ |
| ७ | स्वप्नांत भेटणारीं जिवंत माणसें | ५४ |
| ८ | स्वप्नांत भेटणारीं मृत माणसें | ७२ |
| ९ | दिवास्वप्न | ८४ |
| १० | प्रतिकात्मक स्वप्नें | ८९ |
| ११ | स्वप्नांतील भवितव्य दर्शन | ९९ |
| १२ | उपसंहार | ११७ |

## : १ : स्वप्नांतील जाणीव

स्वप्नांचे विविध प्रकार, स्वप्न पडण्याचीं कारणें, स्वप्न म्हणजे खरोखरीच भ्रम आहे कीं स्वप्नांत कांहीं अर्थ असतो, स्वप्नांतील भवितव्यदर्शन, स्वप्नांतील काळ, स्वप्नांतील संदेश अित्यादि स्वप्नविषयक अनेक कूट प्रश्नांची चर्चा या ग्रथांत करावयाची आहे.

**फ्राइडचें मत**

'स्वप्न' या विषयावर भौतिक दृष्टिकोणांतून प्रकाश पाडण्याचें मोठें कार्य फ्राइड या मानसशास्त्रज्ञानें केलें आहे. युंग व ॲडलर यांनीं-ही तें थोडेसें वेगळ्या रीतीनें केलें आहे. १९०० सालीं प्रसिद्ध केलेल्या आपल्या "Die Traumdeutung" नामक ग्रथांत फ्राइड यानें हें स्वच्छ दाखवून दिलें आहे कीं स्वप्न म्हणजे मेंदूतील पेशींचा स्वैर व अर्थशून्य संचार नव्हे, शास्त्रानें डावलून टाकण्या-सारखी तीं बाब नव्हे, तर स्वप्न म्हणजे मनाच्या गूढ, विविध आणि वैचित्र्यपूर्ण चळवळींचा तो एक आविष्कार आहे. फ्राइडच्या मताप्रमाणें मोठ्या माणसांचीं बहुतेक सर्व स्वप्नें म्हणजे

१ त्यांच्या शरिराच्या तात्कालिक गरजा ( तहान, भूक इ. ) दाखविणारी.

२ त्यांचें दाबून ठेवलेले विचार आणि विकार दाखविणारीं.

३ परिस्थिति व समाजबंधनें यांमुळें लैंगिक वासनांच्या अतर्पितन निर्माण होणारी असतात.

फ्राइडच्या मतें बहुतेक सर्वच स्वप्नें मनांत उत्पन होणाऱ्या

ज्या इच्छा, त्यांच्या आधारावर उभारलेल्या असतात. माणसांच्या बऱ्याचशा इच्छा शारिरीक गरजांमुळें मनांत उद्भवत असतात. या मनांत उत्पन्न होणाऱ्या इच्छा नेहमींच पुऱ्या होतात असें नाहीं. किंबहूना मनांत उद्भवलेल्या इच्छांपैकीं बहुतेक पुऱ्या होतच नाहींत. जीवनांतली सामाजिक, धार्मिक आणि नैतिक इत्यादि जी अनेक बंधनें आहेत त्या बंधनांमुळें त्या इच्छा माणसाला दाबून टाकाव्या लागतात. कधीं कधीं उत्पन्न झालेल्या या इच्छांची जाणीव बाह्य मनास नसतें. परंतु अंतर्मनाला मात्र ती जाणीव पूर्णपणें असतें. तसल्या प्रकारच्या जाणीवेंतूनही अनेक वेळां स्वप्नांचा उद्भव होत असतो.

परंतु फ्राइडनें आपली स्वप्न मीमांसा करितांना हट्टीपणानें एकाच बाजूकडे लक्ष पुरवून इतर सर्व अंगांकडे डोळेझांक केली आहे. आणि त्यामुळें त्याची मीमांसा एकांतिक व हास्यास्पद झाली आहे. त्यानें प्रत्येक स्वप्नाचे कारण वैषयिक वासनांशी जोडलें आहे. जणूं काय माणसाला विषयतृप्ती वाचून जीवनांत रममाण होण्यासारखे त्याच्या मतें दुसरे कांहीं नाहींच. स्वप्नांची भाषा अनेक वेळां प्रतिकात्मक असते. फ्राइडनें उदाहरणादाखल अनेक प्रतिकें घेतली आहेत व त्या सर्वांचा संबंध माणसाच्या काम वासनेशी जोडला आहे. तो म्हणतो “ ३ हा अंक पुरुषाच्या इंद्रियाचें प्रतिक आहे. काठी, छत्रि, दांडा, झाड इत्यादि सरळ आणि ताठ वस्तू त्याची प्रतिकें आहेत. याखेरीज ज्या पदार्थांच्या अंगीं टोचण्याचें, माणसाच्या अगांत शिरून त्याला दुखापत करण्याचें सामर्थ्य आहे अशी चाकू, सुरा, भाला, पिस्तूल इत्यादि शस्त्रेंहीं त्याचींच प्रतिकें होत. म्यानांत शिरणारी तरवार, टोपणांत शिरणारी पेन्सिल, दौतींत बुडून बाहेर येणारा टाक इत्यादि वस्तू म्हणजे देखील असली प्रतिकें होत.

" त्याचप्रमाणें खाडे खड्डे, दऱ्या, बाटल्या इत्यादि वस्तू या स्त्रीच्या इंद्रियाचीं प्रतिकें होत.

" दाट अरण्य किंवा गर्द झाडी हें इंद्रियावरील केसांचे प्रतिक होय.

माणसाच्या मनांत ज्या वासना असतात त्यांत विषय वासना ही एक महत्वाची वासना असते हें जरी पुष्कळ लोकांस मान्य असलें तरी सर्व स्वप्नांचा संबंध कांहीं विषय वासनेशीं जोडणें आणि तदनुसार असली प्रतिकें निश्चित करणें म्हणजे विचित्रपणाची पराकोटी होय. फ्राइडनें ह्या असल्या अचाट कल्पनेच्या जोरावर इतरही आणखी प्रतिकें निश्चित केली आहेत तीं अशीं. :—

" स्वप्नांत जर एखादें घर दिसलें आणि त्या घराच्या भिंता जर गुळगुळीत असल्यातर तें पुरुषाचें प्रतीक समजावे. त्या घराला गॅलरी वगैरे सारखे पुढें आलेले भाग दिसले तर तें स्त्रीचें प्रतीक समजावें.

आईबाप माणसाला पुष्कळदां राजा राणीच्या स्वरुपांत दिसतात. लहान लहान प्राणी आणि किडे हें लहान मुलें, भाऊ भाऊ, बहिणी बहिणी इत्यादिंची प्रतिकें आहेत.

" पाण्याशी कोणता ना कोणता संबंध दिसला म्हणजे ती जन्म झाल्याची खूण समजावी. "

" कुठें तरी प्रवासास निघणें, किंवा प्रवास करीत असणें हें मृत्यु सूचविणारे प्रतीक आहे.

या दृष्टीनें विचार करणारे शास्त्रज्ञ सांगतात कीं माणसाच्या मनोवृत्तीशीं स्वप्नांचा अत्यंत निकटचा संबंध असतो. एका रोग्यानें डॉक्ट-

रला सांगितलें, "मला रात्रीं असं स्वप्न पडलं कीं पिसाळलेला कुत्रा माझा पाठलाग करीत होता"

असें स्वप्न त्या रोग्यास कां पडावें याची मीमांसा करतांना त्या डॉक्टरला खालील गोष्टी आढळून आल्या.

१ कुत्र्या विषयी त्या रोग्याच्या मनांत तिरस्कार होता.

२ स्मिथ नांवाच्या एका माणसाचा टेरिअर जातीचा कुत्रा रोग्यानें आदल्या दिवशीं पाहिला होता; आणि तो कुत्रा त्याच्या अंगावर गुरगुरला होता.

३ रोगी लहान असतांना त्याच्या बापानें एक कुत्रा पाळलेला होता. आपल्या बापाच्या कुत्र्याची त्याला भीति वाटे.

पुढें तो कुत्रा पिसाळला आणि त्याला जनावरांच्या दवाखान्यांत नेण्यांत आलें. (Psychcanalysis for Normal people by G. Coster पृष्ठें १९५, १९६). प्रत्येक स्वप्नाच्या पाठीशी असा कांहीं इतिहास घडलेला असतो असें फ्राइड व इतर शास्त्रज्ञ म्हणतात. सर्वच स्वप्नें माणसाच्या अनुभूतींतून निर्माण झालेली असतात असा त्यांचा ठाम सिद्धांत आहे. जागेपणी मनासमोर आलेल्या गोष्टी त्याज्या स्वप्नांत त्यास वारंवार दिसतात हें म्हणणें रास्त जाहे. पण सर्वच स्वप्नांचा उगम जागृतींतल्या अनुभवांत असतो हें मत टिकण्यासारखें नाहीं. फ्राइडसारखे पंडित सर्व स्वप्नें विचारांत घेत नाहींत. आपल्या उपपत्तीशीं जी जुळतील तेवढींच हिशोबांत घेतात आणि बाकीच्यांकडे कानाडोळा करतात. याचें कारण असें कीं ह्या पंडितांनीं अदृश्य सृष्टीचा विचारच केलेला नाहीं. तें जडवादी आहेत आणि हट्टानें त्या जडवादास चिकटून बसलेले आहेत. अदृश्यसृष्टीच्या द्वाराजवळ ते आलेले आहेत. पण ते तेथें बसून राहिले आहेत. अनेक वर्षें

अभ्यास व संशोधन करूनही अदृश्य सृष्टीच्या अस्थित्वाबद्दलचा त्यांचा गैरविश्वास कायम आहे. त्यांचा जडवाद खोटा आहे असें ठरविणारा जो पुरावा आज उपलब्ध आहे त्याला ते आपल्या विचाराच्या कक्षेंत येऊंच देत नाहींत. त्यामुळें ह्या पंडितांचे मत अंशत: खरें असलें तरी सर्वस्वी खरें नाहीं. हट्टी व दुराग्रही जडवादांतून त्यांची मीमांसा निघालेली असल्यामुळें त्यांतील कांहीं भाग अपुरा व कांहीं भाग धादांत चुकीचा आहे असें दाखवितां येईल. याचा विचार आपण पुढें पाहूं.

स्वप्नांची मीमांसा निर्दोषपणें करावयाची असली तर देह झोपीं गेल्यावर माणसाची जाणीव कशी असते या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. स्थूल देह जरी झोपीं गेला तरी माणसाची जाणीव अजीबात थांबत नाहीं. ती मंद होते आणि म्हणूनच आपण जरी पलंगावर झोपलों, झोपेंत रात्रभर इतस्त:ता लोळलो तरी खालीं पडून आपणांला सहसा इजा होत नाहीं.

पायोरिया किंवा इतर कांहीं रोग झाला असतांना ज्यावेळीं एखाद्या रोग्याचे दांत काढावयाचे असतात, त्यावेळीं डॉक्टर लोक इंजेक्शन देऊन रोग्याला बेशुद्धावस्थेंत नेतात. आणि मग दांत उपटतेवेळेचा तो क्षण आला म्हणजे रोग्याची काय अवस्था होते हें ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें आहे तेंच तुम्हाला सांगू शकतील कीं देहाच्या वेदना त्यावेळीं जरी रोग्याला प्रत्यक्ष जाणवत नसल्या तरी अगदी असहायपणें एक अथवा दोन्ही हात त्या बेशुद्धावस्थेंतही त्याच्याकडून तोंडाजवळ नेले जातात. यावरून हें लक्षांत येतें कीं जिवंत माणसाला तो सुप्तावस्थेंत असला किंवा बेशुद्धावस्थेंत असला तरी देहाला होणाऱ्या तीव्र दु:खाची किंचितमात्र कां होईना पण जाणीव असूं शकते.

झोपेंत माणसाला तहान लागली तर आपण कुठें तरी जाऊन

पाणीं प्यालो असें त्यास बहुधा स्वप्न पडतें. झोपेंत माणसास लघवी करण्याची इच्छा झाली किंवा शौचास जावेसें वाटलें म्हणजे ते त्याचे देहधर्म त्यास बहुधा जागे करितात परंतु कधीं कधीं झोपेची पकड इतकी दृढ असते की माणसाला अंथरुण सोडून उठवत नाहीं. अशा वेळीं तो स्वप्नांत आपल्या मनानें कुठें तरी ते विधी उरकून घेतो. त्यामुळें देहातील घाणीचा उत्सर्ग होत नाहीं. उत्सर्गोत्सुक इंद्रियाच्या संवेदनाची तीव्रता कमी होऊन माणूस आणखी कांहीं तास निद्रासुखाचा अनुभव घेऊं शकतो.

अशा रीतीनें देहांतल्या देहांत होणाऱ्या संवेदना माणसाला सुप्तावस्थेंतही जाणवतात व त्या दुःखांतून स्वतःला सोडविण्याचा झोपेंतल्या झोपेंत माणसाकडून प्रयत्न केला जातो. जागेपणीं शरिरावर येणारा धोका आपण पुष्कळदां उघड्या डोळ्यांनीं पाहूं शकतो व त्यापासून आपलें रक्षण करूं शकतो ; परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं आपलें बंद डोळे देखील देहावर येणारे संकट कांहीं अकल्पीत प्रकारानें पाहूं शकतात व देहाला जागे करून देहाचा त्या संकटापासून बचाव करूं शकतात. यासंबंधीं स्वतःचा एक अनुभव डॉ. मॅगडुगल या सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञानें दिला आहे. मॅगडुगल साहेब एकदां आगगाडीतून प्रवास करीत असतांना त्यांचा डोळा लागला. झोपेंत त्यांची मान खिडकीवर रेललेली होती. कांहीं काळानंतर गाडीच्या डब्याच्या ज्या उघड्या खिडकींत मॅगडुगल साहेबांची मान होती त्या खिडकीच्या वर सरकवून ठेवलेल्या पडद्याची अटक सुटली व तो जड पडदा एकदम खाडकन् त्यांच्या नाकातोंडावर पडणार, इतक्यांत त्यांना एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत त्यांनीं आपल्या समोरच्या बाकावर एक मुलगा खिडकींत मान टाकून निजलेला पाहिला व त्या खिडकीच्या वर सारुन ठेवलल्या जड पडद्याची अटक

सुटून तो पडदा नेमका त्या मुलाच्या नाकातोंडावर पडून त्याला इजा होणार हें पाहून साहेब दचकून जागे झाले व उठून म्हणाले "अरे, अरे, उठ तो पडदा तुझ्या तोंडावर पडतो आहे पहा" आणि त्याच वेळीं त्यांच्या मागच्या बाजूच्या खिडकीचा पडदा खाड्कन पडला व तें आधीच उठलें असल्यामुळें त्यांना होणाऱ्या अपघातांतून तें वाचले. [ An Outline of Abnormal Psychology by William mcDougall Page 142 ]

खिडकीच्या पडद्याची अटक सुटून पडदा खालीं पडण्यास क्षणाचाही विलंब लागला नसेल परंतु त्या क्षणार्धांत त्यांनीं प्रत्यक्षांत नसलेला तो मुलगा आणि ती त्याच्या तोंडावर पडणारी खिडकी वगैरे वगैरे देखावा स्वप्नांत पाहिला व त्यामुळेंच त्यांना स्वतःला होणारा अपघात टाळतां आला. त्यांना कोणीही मुद्दाम उठवून जागें केलें नव्हते. त्यांचे तेच जागे झाले. नेमक्या अपघाताच्या वेळीं त्यांच्या सुप्त जाणिवेनें तो प्रकार त्यांच्या मिटलेल्या डोळ्यांना मोठ्या विचित्र प्रकारें दाखवून त्यांची मान त्यांना त्या जोरानें खालीं आदळणाऱ्या पडद्याच्या कक्षेंतून बाहेर काढावयास लावली होती !

मानवी देहरुपी यंत्राची रचनाच अशी मोठी गमतीदार आहे कीं त्या देहाचे रक्षण करणारीं गात्रें जरी सुप्तावस्थेंत कार्यनिवृत्त झाल्यासारखी दिसत असली तरी त्यचंया जाणिवेची ज्योत कोठें तरी तेवतच असते. आणि सुप्त देहावर जरी संकट आले तरी त्या ज्योतीच्या प्रकाशांत त्याला तें मोठ्या विलक्षण प्रकारे भासमान होऊन तो कधी कधीं जागा होतो.

स्टिकन्स नांवाच्या एका जर्मन लेखकानें आमच्या बालपणीचा एक अनुभव खालीलप्रमाणें निवेदन केला आहे—

"मी एकदां माझ्या भावाजवळ झोंपलो होतो, तेंव्हा मला स्वप्न पडलें.

स्वप्नांत मी एकाकी रस्त्यावरून चाललो होतो आणि कोणी एक रानटी जनावर माझ्या पाठीमागे लागलें. भीतीनें माझी गाळण उडाली. मला ओरडावेसें वाटलें; परंतु ओरडतां येईना. धांवतां धांवतां मला एक जिना आढळला. त्या जिन्यावर मी चढलो; परंतु मी इतका थकलो होतो कीं मला अधिक पळवेना. त्यामुळें अखेर मी त्या क्रूर श्वापदाच्या तावडींत सांपडलोच. त्या श्वापदानें मला पकडून माझ्या मांडीस चावा घेतला. तेंव्हां मी भेदरून जागा झालों. पाहातों तों माझ्या भावानें माझ्या मांडीस चिमटा घेतला होता!" (रेव्हरेंड सी. डब्ल्यू लेडबीटरकृत Dreams पृष्ठ ३२ ).

चिमट्याची संवेदना लहानग्या स्टीफन्सच्या मेंदूपर्यंत पोहोंचण्यास-जितका अत्यल्प क्षणाचा कालावधि लागला तितक्या कालावधींत उपरिनिर्दिष्ट नाटक त्यानें पाहिलें "तुझ्या देहाला इजा होत आहे, जागा हो" हाच संदेश त्याच्या जाणिवेनें त्याला नाटकी तऱ्हेनें देऊन जागे केलें.

झोपेंतल्या माणसाला चिमटा घेऊन, टांचणी टोंचून किंवा त्याच्या डोक्यावर पाणी ओतून जागे करूं नये. कारण त्या प्रकारामुळें त्याला एखादे वेळीं भलतेंच स्वप्न पडून तो वास्तवीक भीतीचें कांहींच कारण नसतांना भयविव्हल होऊन जागा होतो. लहान मुलें शांत झोपलीं असतांना त्यांच्या जवळपास मोठा आवाज करीत नाहींत. घरांतल्या इतर मुलांना वडील माणसें झोपलेल्या अर्भकापाशीं गोंगाट करूं देत नाहींत, कारण त्यामुळें तें मूल दचकून जागें होतें व कधीं कधीं त्याच्या शरीर प्रकृतीवरही अनिष्ट परिणाम होतो हें आपणांला माहित आहे.

बंदुकीच्या एका आवाजानें जाग आलेल्या एका माणसाचा स्वप्न-

वृत्तांत रीचर्डस् नांवाच्या दुसऱ्या एका जर्मन लेखकानें निवेदन केला आहे.

" त्या माणसाला स्वप्नांत असें भासलें कीं आपण सैनीक झालो आहोंत. नानातऱ्हेची संकटें भोगल्यावर आपणांला शत्रूनें पकडलें, कोर्टापुढें उभें केलें व आपणाला देहांत शासन झाले. वधस्तंभाला बांधून आपणांवर गोळी झाडण्यांत आली " — वास्तविक तो आवाज बाहेर कुणीतरी उडविलेल्या बंदुकीच्या गोळीचा होता ( रे. लेडबीटरकृत Dreams पृष्ठ ३२ ).

तुम्ही एखाद्या झोपलेल्या माणसाला हळूच टाचणी टोचलीत तर आपल्या अंगांत कुणी तरी सुरा खुपसला असें वाटून तो कदाचित् ओरडत उठेल. तुम्ही एखाद्या निद्रिस्ताच्या डोक्यावर थोडेसें थंड पाणी ओतलेत तर आपण जलाशयांत बुडत आहोंत अशा भावनेनें भेदरून हातपाय झाडींत तो माणूस जागा होईल. कारण माणूस स्वप्नसृष्टींत जें कांहीं अनुभवतो त्याचा कालावधि क्षणांनीं मोजतां येण्याजोगा अथवा अत्यल्प असतो. परंतु त्यामुळें वस्तुस्थितिचा अनेकदां भलताच विपर्यास होतो, त्या अनुभवांत सुखाची, दुःखाची किंवा दुसरी एखादी संवेदना निर्माण होते. या संवेदनेची चित्तावर जी छाप पडते ती समुद्राच्या एखाद्या अजस्र लाटेसारखी असते.

रेव्हरेंड लेडबीटर यांनीं आपल्या Dreams नामक छोट्याशा पुस्तकांत खालील एकदोन मजेदार उदाहरणें दिली आहेत.

एका माणसाच्या शर्टची कॉलर फार घट्ट होती. ते घट्ट वेष्टण त्याला स्वप्नसृष्टींत फांस म्हणून प्रतीत झालें आणि आपणांला कुणीतरी फासावर देत आहे म्हणून आपण गुदमरलो आहों अशा स्थितींत तो जागा झाला ? "

अशा प्रकारची स्वप्नें पडूं नयेत म्हणून प्रत्येकानें सैल कपडे अंगावर घालून निजणें इष्ट आहे.

" एका माणसाच्या शरीराला झोपेंत अंथरुणांत पडलेली एक टांचणी टोंचली, तेंव्हां आपण द्वंद युद्ध खेळत असून प्रतिपक्षानें तिक्ष्ण शस्त्र आपल्या अंगांत भोसकलें असें स्वप्न पडून तो जागा झाला."

म्हणूनच बिछान्यावर अंग टाकण्यापूर्वी तो झटकून व त्याच्यावर नीट नेटकी चादर अथरून झोपणें इष्ट आहे.

मॉरि नांवाच्या एका लेखकानें लिहिलें आहे. " एक माणूस झोप-लेला असतांना त्याच्या मानेवर बाजूच्या भिंतीवर टांगलेला एक लोखंडी दांडा पडला त्यामुळें त्याला स्वप्न पडलें की फ्रेंच राज्यक्रांती चालू असून आपल्या मानेंचे विच्छेदन करण्याकरितां कुणीतरी एक भयंकर शस्त्र आपल्या मानेवर ठेवलें आहे ! "

एका लेखकानें आपला स्वतःचाच अनुभव सांगितला आहे. तो म्हणतो, " मेघगर्जनेसारखे गंभीर आणि फार मोठे आवाज स्वप्नांत ऐकून मी जागा होत असे. हे आवाज कुठे होत याची प्रथम मला कल्पनाा नव्हती. परंतु सूक्ष्म चौकशी अंती मी उषीवर डोके ठेवल्या नंतर माझ्या हृदयाची थडथड माझ्या कानावर जाई व त्याचेंच रुपांतर मेघगर्जनेंत होई असें मला कळून आले "

वरील उदाहरणावरून जागृदवस्थेंत माणसाला जशी जाणीव असते तशी सुप्तावस्थेंतही कोणत्या ना कोणत्या स्वरुपांत असते हे दिसून येतें. ही जाणीव कोठून येतें, तिचें स्वरूप काय वगैरे प्रश्न या बाबत उत्पन्न होतात. देह झोपीं गेला म्हणजे त्या शांत स्थितींत मनाचे व्यवहार वाढतात, जाणीवेची आकलन करण्याची शक्तीही वाढतें या वाढलेल्या जाणीवेचें उगमस्थान कोणतें हाही प्रश्न उत्पन्न होतो. या पुस्तकांत या सर्व प्रश्नांवर प्रकाश पाडण्यांचा प्रयत्न केला जाईल.

## : २ : मनोव्यापारांची व्याप्ती

### मनोव्यापारांची व्याप्ती

स्वप्नस्थितींत मनाचें सामर्थ्य जागृत स्थितीइतकेंच असते कीं कांहीं उदाहरणावरून वाढलेले दिसते याचा विचार या प्रकरणांत करावयाचा आहे.

मानसशास्त्रज्ञांनीं मनाचें साधारणतः दोन विभाग कल्पिलेले आहेत. एक बाह्य मन व दुसरें अंतर्मन. जागृदवस्थेंत बाह्य मन व्यवहार करीत असतें. अंतर्मनाचे व्यवहार जागृती, स्वप्न, सुषुप्ति इत्यादि सर्व अवस्थांत चालू असतात. मात्र बहुतकरून बाह्य मन शांत झाल्याशिवाय अंतर्मनाचे व्यवहार लक्षांत येत नाहींत. किंवा बाह्य मनाची खिडकी बंद केल्याशिवाय अंतर्मनाची खिडकी उघडली जात नाहीं. दिवसा अगर रात्रीं जागेपणीं व्यवहार करीत असतांना आपण आपल्याच हातानें एखादी उपयोगी वस्तू कुठेतरी ठेवून देतो आणि नंतर कांहीं वेळानें ती वस्तू कुठें ठेवली तें आपल्या लक्षांत येत नाहीं. मग ती सापडावी म्हणून आपण शांतपणें विचार करतो. शांतपणें विचार करणें याचाच अर्थ सैरावैरा धांवणाऱ्या आपल्या बाह्य मनाला स्थिर करण्याचा प्रयत्न करणें होय. बाह्य मन स्थिरावलें म्हणजे ज्या अंतर्मनाला आपलें सर्व व्यवहार पूर्णपणें लक्षांत असतात तें चटकन बाह्य मनाला ती आपली वस्तू कुठें आहे याची जाणीव करून देतें. कधीं कधीं पुष्कळ विचार करून अनेक ठिकाणें धुंडाळून देखील आपली हरवलेली वस्तू आपणांस सांपडत नाहीं आणि मग स्वप्नांत आपणांला त्या वस्तूचा तपास लागतो. हें कार्य अंतर्मनानें केलेलें असतें.

## अंतर्मनाचें व्यवहार

बाह्य मनाला ज्यामुळें चटका लागून राहिला आहे अशा गोष्टींचे पडसाद अंतर्मनावर कसें उमटतात व त्याचा काय परिणाम होतो याचें एक उदाहरण डॉ. डेव्ही यांनीं सांगितलें आहे.

" --- पांच महिन्यापूर्वी म्हणजे १८४९ च्या सप्टेंबर महिन्याच्या हिशोबांत माझ्या हातून कुठेंतरी चूक झाली होती. कित्येक तासपर्यंत तपासणी केल्यानंतर जेंव्हां ती चूक सापडेना तेंव्हां अगदीं साधा रोग अनेक औषधें देऊनही बरा न करूं शकणाऱ्या डॉक्टरला ज्याप्रमाणें वाटतें तसें मला वाटलें केंव्हांही फुरसतीच्या वेळीं, अंथरुणावर झोप येण्यपूर्वी लोळत पडलो असतांना माझें मन ती चूक कशी झाली असावी याच विचारांनें व्याप्त झालेलें असे. अशा रीतीनें तें हिशोबाचें भिजत घोंगडें ११ डिसेंबर १८४९ पर्यंत तसेंच पडलें होतें. त्या दिवशीं रात्रीं माझा डोळा लागला आणि मला माझ्या कचेंरीतील चोपड्या दिसूं लागल्या. कॅश बुक, बँकेचें पास बुक वगैरे सर्व लवाजमा, मी मेजावर बसलो असून, माझ्या पुढें उघडा होता असें मला वाटलें. आणि अगदीं सहज एके ठिकाणच्या Cross Entry मुळें झालेली चूक चटकन माझ्या लक्षांत आली. मला पूर्णपणें आठवतें कीं त्या स्वप्नांत मी एक कागदाचें चिटोरें घेतलें आणि फुरसतीच्या वेळीं ती चूक कशी सुधारायची यासंबंधी टिपण मी चिटोऱ्यावर नमूद करून ठेवलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी उठलो आणि कचेरींत तीच ती माझी नेहमीची पुस्तकें घेऊन मी काम केलें तरी मला आदल्या रात्रीच्या स्वप्नाची स्मृति नव्हती, परंतु दुपारी मी जेंव्हां कपडे बदलण्यासाठीं घरीं आलो आणि दाढी करून वस्तरा पुसण्याकरितां म्हणून टेबलावर जो कागद सांपडला तो घेतला तोंच माझ्या एकदम मनाला वाटलें कीं चूक सुधारायची कशी यासंबंधी

मी ज्या कागदावर स्वप्नांत टिपण केलें होतें तोच हा चिठोरा आहे. आश्चर्यानें मी नुसता थक्क झालो. त्या चिठोऱ्याचा परिणाम असा झाला कीं मी ताबडतोब कचेरींत गेलो. कॅश बुक काढलें आणि पहातो तो जागृदवस्थेंत न सापडलेली माझी चूक झोपेंत मला बरोबर सांपडली होती ! ”

“ मी झोंपलो असतांना ती चिठ्ठी मला कोठें सांपडली, पेन्सील मी कुठून आणली आणि झोपेंतच त्या कागदावर मी कांहीं लिहून ठेवलें कीं काय तें मला मुळींच आठवत नाहीं. ती पेन्सील, तो कागद जेंव्हां मला सांपडला तेंव्हां त्याच्या शेजारीच पडली होती. मात्र ती माझी नेहमीची वापरावयाची नव्हती. ( Zoist Vol. VIII पृष्ठ ३२८)

व्यवहारांत आपण क्षणोक्षणी कितीतरी क्रिया करीत असतो; परंतु सर्वांचीच आपणांला स्मृती असत नाहीं. मात्र आपल्या हातून नकळत घडलेल्या कांहीं गोष्टी जागृदवस्थेंतील मनाच्या स्मृतींतून सुटल्यातरी अंतर्मनाला त्याची कशी बरोबर जाणीव असतें हें बिकफोर्ड नांवाच्या एका बाईनें स्वानुभव सांगितला आहे त्यावरून लक्षांत येईल.

“ २९–१–१८८९ रोजीं संध्याकाळीं पांच वाजतां मी मेर्लोच्या हॉटेलांत पोहोचले तेंव्हां माझा सोन्याचा ‘ ब्रूच ’ नाहींसा झाल्याचें मला आढळलें. माझ्या समजूतीप्रमाणें तो स्वान अॅन्ड एडगर कंपनीच्या एका खोलींत मी गेलें होतें तिथें पडला असावा. मी तावडतोब माझा माणूस तिथें पाठविला. परंतु तो हात हलवीत परत आला. तेंव्हां माझ्या मनाला निराशेची चुटपुट लागून राहिली. त्याच रात्री मला स्वप्न पडलें आणि त्या स्वप्नांत तो माझा ब्रूच स्वान आणि एडगरच्या कंपनीच्या दुकानांतील एका टेबलावर पडलेल्या ‘ क्वीन ’ वर्तमानपत्राच्या जुन्या राशींत मला दिसला. ज्या पानाआड तो दडला

होता तें पान मला प्रत्यक्ष दिसलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी छोटी हजेरी उरकून स्वान ॲन्ड एडगरकडे गेले आणि ' क्वीन ' पत्राचे अंक मला दाखविण्याची मी तिथल्या मंडळीस विनंति केली. तें कागद हलविण्यांत आलें होतें. मला त्या कागदाच्या राशींत अगदीं बरोबर मी स्वप्नांत पाहिलेंल्या पृष्ठभागीं दडलेला तो माझा ब्रूच मला सांपडला ( Human Personality by Fredric Myers Vol. I हकीगत क्रमांक ४१५ अ

मनावर उमटणाऱ्या ज्या प्रतिबिंबानां आपण स्मृति म्हणतो ती जागेपणींपेक्षां देह झोपीं गेला असतां अनंतपटीनें प्रबल होऊं शकते याचें हें एक उदाहरण आहे. माणसाच्या व्यक्तीत्वाच्या रूळलेल्या अनेक वाटा आपणांला माहित आहेत. परंतु या व्यतिरिक्त मानवी जीवन कांहीं गूढ मार्गावरून चाललें आहे. तें मार्ग जागृत जाणीवेच्या आटोक्यांत आलेलें नाहींत.

बाह्य मन बेसावध असतां किंवा त्या स्वान ॲन्ड एडगर कंपनींत कांहीं वस्तू खरीद करण्यांत व्यग्र झालें असतांना तो ब्रूच स्मिथ बाईच्या अंगावरून पडला असेल तें तिच्या अंतर्मनाच्या लक्षांत आले असेल पण तो त्या ' क्वीन ' वर्तमानपत्राच्या राशींत कसा गेला व तो तेथें असल्याचे तिला स्वप्नांत कसें दर्शन झालें ही विचार करण्यासारखीं बाब आहे. यावरून असा एक निष्कर्ष निघतो कीं माणसाच्या अंतर्मनाला गूढ गोष्टी सहज गम्य होऊं शकतात. माणसाच्या जाणीवेचे कांहीं गुप्त कप्पे आहेत. स्थूल देहाचे व्यवहार शांत झालें म्हणजे हे कप्पे कधीं कधीं उघडतात हें या प्रकरणांत दिलेल्या उदाहरणावरून लक्षांत येण्याजोगे आहे.

## स्वप्नसृष्टीचे वैशिष्ठ्य

स्वप्नसृष्टींत वावरणाऱ्या माणसाला आपण जड सृष्टींहून अधिक भिन्न अशा दुसऱ्या कोणत्यातरी सृष्टींत आहोंत याची जाणीव नसतें. परंतु त्या सृष्टींतल्या चळवळींचा कधीं कधीं त्याच्या मनावर इतका परिणाम होतो कीं त्याचा सुप्त देह तोंडानें बडबड करतो , किंवा बिछान्यावरून उठून चालूं लागतो. झोपेंत चालणारी किंवा बडबड करणारीं माणस वस्तुतः स्थूलदेहाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्यातरी जाणीवेच्या क्षेत्रांत वावरत असतात हें पुढील प्रकरणांत स्पष्ट केलें आहे.

## : ३ : झोंपेंत व्यवहार करणारीं माणसें

कांहीं माणसांना झोंपेंत चालण्याची, घरांत अथवा घराबाहेर वावरण्याची संवय असते, झोंपेंतील असल्या प्रकारचा व्यवहार हाही स्वप्नाचाच एक प्रकार आहे. रेचेल बेकर नांवाची एक बाई १९ साव्या शतकांत पाश्चात्य देशांत होऊन गेली. निद्रिस्त प्रचारक (Sleeping Preacher) म्हणून लोक तिला ओळखीत. तिचा देह झोंपी गेला असतांना ती एखाद्या अस्खलित वक्त्याप्रमाणें विद्वत्प्रचुर धर्मोपदेश करी. तिचें आरोग्य चांगलें असतांना रोज संध्याकाळीं हे असले धर्मोपदेश करण्याचे झटके तिला येत व ती सुमारें पाऊणतासपर्यंत बोले. किती लोक मुद्दाम तिचें व्याख्यान ऐकण्यासाठीं नित्य तिच्या घरी जमत असत. झटका येण्यापूर्वी व व्याख्यान देण्याची उर्मी लुप्त झाल्यावर ती फक्त अंगाला आळोखे पिळोखे देई आणि ताबडतोब गाढ झोपी जाई. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यानंतर आपण दिलेल्या सुंदर व्याख्यानांतला एकही शब्द तिला आठवत नसे*

### विधायक शक्तींचा विकास

झोंपेंत व्यवहार करणाऱ्या माणसाला कधीं कधीं अतींद्रिय ज्ञान

* रेचेल बेकरच्या निद्रेंतील व्याख्यानांचें एक पुस्तक प्रसिद्ध आहे. "Remarkable Sermons of Rachel Baker, and Pious Ejaculations delivered during sleep by Dr. mitchill M. D., Prof. of Physic, The Late Dr. Priest by L. L. D. and Dr. Douglass (London 1815).

प्राप्त होत असते याचा एक पुरावा डॉक्टर डुफे यांनीं १८८९ च्या फेब्रुवारींत पुढें आणला होता. ती हकीगत अशी–†

मिस्टर बडेर हे एका संस्थेचे प्रमुख होते. त्यांचा शिष्य जानीकॉड याला त्याच्या वयाच्याा ८ ते १० व्या वर्षापर्यंत मधून मधून झोपेंत वावरण्याचे झटके येत असत. मिस्टर बडेर लिहितात–

" लहानगा जानीकॉड हा जेंव्हां प्रथम शाळेंत आला तेंव्हा पहिल्या वर्षीं त्याची प्रकृती उत्तम होती परंतु १८५९ च्या जून जुलै महिन्यांत हवेंतील उष्णता वाढूं लागली आणि जानीकॉड रोज रात्रीं झोपेंत हिंडूं फिरूं लागला. थोड्याच दिवसांत तो इतका बदलला कीं घरच्या मंडळींना देखील तो ओळखूं येईना. त्याचें डोळे खोल गेले त्याचे मांसल शरीर रोड झालें आाणि तो झोपेंत उठून मुलांच्या शयनगृहांभोंवती हिंडे, कांहीं तास बागेंत फिरे आणि पुन्हा अंथरुणांत येऊन झोपीं जात असे.

" एके रात्रीं अकरा वाजतां जानीकॉड झोपेंत चालत चालत माझ्या खोलीपाशीं आला व त्यानें दारावर थाप मारली. मी दार उघडून त्याला आंत घेतलें तेंव्हां तो म्हणाला ' मी नुकताच व्हेनडोम येथून तुमच्या कुटुंबाची हकीगत घेऊन आलो आहे. मिस्टर आणि मादाम आरनॉल्ट यांची प्रकृती ठीक आहे आणि तुमच्या लहानग्या चिरंजीवाला चार दांत आले आहेत. मी त्याला म्हणालो, तूं पुन्हा व्हेनडोमला जाऊन ती मंडळी आतां काय करीत आहेत तें मला सांगशील काय ?

' थांबा.... हा मी तेथें आहे .... ती मंडळी पहिल्या मजल्यावरील एका खोलींत झोपली आहेत. त्या मंडळींच्या उजव्या बाजूला दाईचा बिछाना आहे आणि हेन्रीचा पाळणा तिच्या जवळच आहे, '

† Proceedings S. P. R. Vol VI पृष्ठें ४१६–२७.

" जानीकॉडने आमचें व्हेनडोमचें घर कधींच पाहिलें नव्हतें परंतु मी विचारल्यावरून त्यानें खोलीचें जें वर्णन केलें तें अगदीं बरोबर होतें. दुसऱ्या दिवशी मला माझ्या सासऱ्याकडून एक पत्र आलें त्यांत हेन्रीला नुकताच चवथा दांत फुटला आहे असें लिहिलें होतें. पुन्हा कांहीं दिवसांनीं ११ च्याच सुमारास जानीकॉड झोपेंत माझ्या खोलींत येऊन म्हणाला -- ' मी आज पुन्हा व्हेनडोमहून आलों आहे. तुमच्या चिरंजीवाला अपघात झाला आहे ! तें ऐकून माझी पत्नी एकदम भ्याली व तिनें त्या अपघाताचें स्वरूप विचारलें, तेंव्हां तो म्हणाला--

' तसें कांहीं घाबरण्याचे कारण नाहीं. त्याच्याजवळ असलेल्या डॉक्टरचे म्हणणें कांहीं का असेना तुम्हाला इतकी धास्ती वाटेल असं मला माहित असतं तर मी ही हकीगत तुम्हाला सांगितलीच नसती.

" दुसऱ्या दिवशीं मी माझ्या सासऱ्यास पत्र लिहून उलट टपालीं मुलाच्या प्रकृतीसंबंधी उत्तर मागविलें सासरे बुवांनीं मुलाची प्रकृती उत्तम असून अपघात वगैरे कांहींही घडला नसल्याचें कळविलें

" परंतु पुढें सप्टेंबरांत रजा घेऊन व्हेनडोम येथें गेलों तेंव्हां खरा प्रकार मला समजला. ज्या रात्रीं जानीकॉडनें मला झोपेंत येऊन तें अपघाताचें वृत्त कळविलें त्याच रात्रीं डाक्टरांच्या म्हणण्याप्रमाणें मुलगा जगण्याची आशा नव्हती. त्या दिवशीं त्याची दाई कांहीं मादक पदार्थ सेवन करून शुद्धीवर नव्हती आणि तशा स्थितींत तिनें मुलाला पाजल्यामुळें पुढें कित्येक दिवस मुलाची प्रकृती बरी नव्हती."

" मिस्टर एम्. सिमोनेट हें आमच्या इथें दुय्यम शिक्षक होते व ते जानीकॉडचे मेहुणे लागत होते. मिस्टर सिमेनेट यांच्या धाकट्या मुलाचा कान मागल्या बाजूला चिडचिडला होता व तो कोणत्याहि

औषधानें बरा होईना तेंव्हां एके रात्रीं त्यांनीं जानीकॉडला तो झोपेंत भ्रमण करूं लागला असतांना विचारले 'डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणें या कानाच्या दर्दामुळें आतां मागील दाताला धक्का लागणार आहे. तेंव्हां आतां याला उपाय काय करणार ?"

जानीकॉडनें उत्तर दिलें, "डॉक्टर लोक उगीच भीती घालीत आहेत. तो कान बरा होणार आहे. या आपल्या आवारांतील बागेंत एक वनस्पती आहे ती मी आत्तां आणून त्या कानाला लावतों.*"

"तो ती वनस्पती आणावयास बागेंत गेला परंतु वाटेंतच त्याच्या पायात काटां बोंचला आणि तो जागा झाला. त्यामुळें ती वनस्पती आणावयाची राहूनच गेली; परंतु जानीकॉडनें भविष्य केल्याप्रमाणें त्या मुलाचा कान लवकरच बरा झाला."

## निद्रेंतील विघातक उद्योग

अमेरिकेंतील मोंटाना नामक गांवच्या एका शेतकऱ्यानें एकदां पोलिसांत तक्रार दाखल केली. "कुणीतरी चोर रात्रीं माझ्या गाइचें दूध काढून नेतात" ही तक्रार दाखल केल्यानंतरही कित्येक दिवस चोरीचा हा प्रकार चालूच होता. एके रात्रीं पोलीस त्या चोरांना पकडण्याकरितां त्या शेतकऱ्याच्या आवारांत छपून बसले. तो काय आश्चर्य! तो शेतकरीच राजरोस येऊन त्या गाईची धार काढूं लागला! मात्र हें कृत्य तो जागृदवस्थेंतल्या जाणिवेनें करीत नसून झोपेंतच त्याच्या न कळत त्याच्या इंद्रियांचे व्यवहार चाललेले होते.

---

* जिला इंग्रजींत Confrey फ्रेंच भाषेंत Counfirie व वनस्पतीशास्त्रांत Symphtum Officinale म्हणतात ती ही वनस्पती असावी. तिच्या अंगी औषधी गूण असून ती जखमेवर बांधली असतां जखम बरी होते.

त्या शेतकऱ्याचें हें करणें निरुपद्रवी होतें. निदान तो दुसऱ्या कुणाला उपद्रव देत नसून नकळत त्याचें स्वतःचेंच नुकसान करून घेत होता. झोपेंत चालणारी माणसें अमक्याच प्रकारचे व्यवहार करितात असें नाहीं. जागृत जाणिवेनें भयंकर कृत्यें करणारी जशीं माणसें आढळतात तशीच कृत्यें नेणीवेनें किंवा झोपेंतील त्या विशिष्ट जाणिवेनें करणारीहि माणसें आढळलेली आहेत.

लॉईड एन्. आस्बोर्न नांवाचा एक ५९ वर्षे वयाचा धनिक आपल्या तृतीय विवाहित पत्नीसह बोटीनें प्रवास करीत होता. एके दिवशी सकाळीं त्याच बोटीनें जाणारे सहप्रवासी त्याच्या खोलींत जाऊन पहातात तो ऑस्बोर्नच्या तरुण पत्नीचा देह मस्तक छिन्न-विच्छिन्न होऊन बिछान्यावर अस्ताव्यस्त पडला होता; व एका कोपऱ्यांत स्वतः ऑस्बोर्नचें प्रेत पडलें होतें आणि टेबलावर अर्धवट लिहिलेलें एक पत्र त्या प्रवाश्यांना सांपडलें त्यांत मजकूर होता– " कृपा करून माझ्या भयंकर पापाची मला क्षमा करा. रात्रीं झोपण्यापूर्वी मी व हेलन ४० जणांचे कुऱ्हाडीनें खून करून वाशिंग्टन येथें नुकत्याच फाशीं गेलेल्या जेक बर्ड नामक अमानुष व निर्दय खुनी माणसाविषयीं गप्पा करीत होतो.

" रात्रीं झोपेंत मला स्वप्न पडलें. स्वप्नांत मी जेक बर्डप्रमाणें कित्येकांचें खून पाडलें."

" आणि उठून पहातो तों काय!–प्रिय पत्नीचाच मी चेंदामेंदा केलेला. या दारुण दुःखांतून सुटकेचा सोपा मार्ग मी शोधून काढीत आहे."

ऑस्बोर्ननें विष प्राशन करून आत्महत्या केली होती! आपल्या मागें मालमत्तेची काय व्यवस्था करावयाची यांच्या सूचना त्यानें लिहून

ठेवल्या होत्या. पत्र लिहितां लिहितांच विषाचा परिणाम होऊन ऑस्बोर्नचा देह जमिनीवर पडला होता.

स्वप्न अनुभवित असतांना आपण स्वप्नसृष्टींत आहों ही जाणीव माणसांस नसतें. देह अंथरुणावर पडला असतांनाच आपण इंद्रियांनी व्यवहार करीत असल्याची जाणीव स्वप्नसृष्टींत गेलेल्या माणसास असते; परंतु कधीं कधीं ती जाणीव इतकी प्रबळ होतें कीं निद्रिस्त देह जागृदवस्तेप्रमाणे व्यवहार करीत सुटतो.

जो ॲन किगर नांवाच्या १६ वर्षांच्या तरुणीनें स्वप्नांत आपल्या घरांत दरोडेखोर शिरतांना पाहिलें ते आपल्या वडिलांवर हल्ला करीत आहेत असें दिसतांच ॲननें झोपेंतच उठून दोन रिव्हॉल्व्हर घेतले आणि गोळ्या झाडण्यास सुरवात केली. रिव्हॉल्व्हरमधील गोळ्या संपल्यानंतर तिनें पिस्तूल घेतलें व आणखी कांहीं गोळ्या झाडल्या. हातांत तप्त पिस्तूल असतांना ती जागी झाली. पाहाते तो काय चोर वगैरे कुणीं नसून तिनें मारलेल्या गोळ्यांमुळें तिचे वडील व भाऊ मरून पडला होता. जवळच तिची आई जखमी होऊन विव्हळत होती तें राक्षसी कृत्य तिच्या हातून झोपेंतच झाले अशी खात्री पटल्यावर कोर्टानें तिला निर्दोष ठरविलें !

माझ्या माहितीच्या एका शेतकऱ्याला असेंच एकदां स्वप्न पडलें होतें. त्या स्वप्नांत त्यानें चोर आपल्या घरांत शिरलेला पाहिला. शेतकरी चांगला बलिष्ठ व निधड्या छातीचा होता. म्हातारपणीं ही त्याच्या अंगांत चांगली रग होती. त्या चोराला पहातांच तो झोपेंतच अंथरुणावरून उठला आणि स्वप्नांतील चोराच्या गालफडावर एक गुद्दा त्यानें जोरानें ठेवून दिला तो त्याचा गुद्दा भिंतीवर बसला आणि त्याच्या बोटांची पेरें घायाळ झालीं त्या वेदनेनें तो जागा झाला व आपल्या मूर्खपणाची त्याला कींव आली !

माणूस जागृदावस्थेंत जसा वागतो जवळ जवळ तसाच तो स्वप्नांतहि वागत असतो तो शेतकरी जर भित्रा असतां, तर स्वप्नांतल्या त्या चोराला पाहून भिऊन पळून गेला असतां स्वप्नांत घाबरून उठलेलीं माणसें, स्वप्नांत बडबडणारीं माणसें आपण नेहमींच पाहातों. म्हणूनच मनाचा निर्मळ आणि व्यवहाराचा सरळ माणूस स्वप्नांतदेखील भलतेंसलतें कांहीं करणार नाहीं असें म्हणावें लागतें.

माणसाच्या जीवनांत मनोविकारांना फार महत्व आहे. एखाद्या राक्षसासारखें ते माणसाला विचित्र तऱ्हेनें छळीत असतात. शेपटीवर पाय पडलेला साप जर आपण आपल्या घरांतच वावरूं दिला तर जितकें धोक्याचें असते तितकाच धोका दडपलेल्या मनोविकारांपासून कधींकधीं उत्पन्न होतो या विषयींचीं उदाहरणें पुढील प्रकरणांत पाहूं.

## : ४ : दडपलेल्या भावना

प्लेटोनें असा एक सिद्धांत मांडला होता कीं " .... the virtuous man contents himself with dreaming that which the wicked man does in actual life ', ज्या गोष्टी दुष्ट माणूस प्रत्यक्ष आपल्या आयुष्यांत करतो त्यांचा अनुभव गुणी माणूस स्वप्नांत घेतो. म्हणजे जगांत अशी कितीतरी गुणी माणसें आहेत कीं लोकलज्जेस्तव वाईट समजल्या जाणाऱ्या गोष्टी करीत नाहींत. याचाच अर्थ असा कीं कित्येक माणसें वरकरणी कशीही दिसत असली तरी त्यांच्या मानसीक प्रवृत्ति मोठ्या प्रबळ असतात आणि म्हणून जडसृष्टींत शक्य नसलेली इच्छातृप्ती माणसें स्वप्नसृष्टींत करून घेत असतात. याच तत्वाचा अवलंब करून फ्राइडनें कांहीं व्यक्तींच्या स्वप्नांचे मोठे मनोरंजक अर्थ लावले आहेत.

### एक अर्थपूर्ण स्वप्न

एका तरुण मुलीला असें स्वप्न पडतें कीं तिच्या बहिणीचा लहान मुलगा चार्ल्स् हा मेला असून त्याला पेटींत ठेवण्यांत आला आहे. कांहीं वर्षांपूर्वी तिचा भाऊ ऑटो हा मेला त्यावेळीं जशा मेणबत्त्या लावण्यांत आल्या होत्या तशा याही वेळीं स्वप्नसृष्टींत तिला दिसल्या.

आपल्या बहिणीचा एकुलता एक मुलगा चार्लस हा मरावा अशी त्या तरूण मुलीची मुळींच इच्छा नव्हती. मग या स्वप्नानें कोणती इच्छा तृप्ती साधली ? ज्या मुलीला स्वप्न पडलें तिचा थोडा मागला इतिहास लक्षांत घेतां असें दिसतें कीं आईबाप लहानपणींच वारल्या-मुळें तिला तिच्या मोठ्या बहिणीनें वाढविलें होतें. तारुण्यांत अ ल्यावर

ती एका तरुणाच्या प्रेमांत सांपडली. तें प्रेमकरण त्या मोठ्या बहिणीला मान्य नव्हतें. लहान बहिणीचा तो प्रियकर मोठा पंडित होता. त्याच्या विद्वत्तेनें ती भारली गेली होती. त्याच्या व्याख्यानांना ती श्रोता म्हणून हजर राही. त्याचें लिखाण ती आदरपूर्वक वाचांत असे. त्याला ती विसरणें शक्य नव्हतें. ज्या रात्रीं तिला स्वप्न पडलें. त्या रात्रीनंतर येणरा जो दिवस त्या दिवशीं ती कोणत्या तरी कार्यक्रमाला जाणार होती; आणि त्या कार्यक्रमाला तिचा प्रियकर येणार होता. तिनें ज्या ज्या वेळीं आपल्या प्रियकराची भेट घेतली होती त्या प्रसंगापैकी ऑटोचा मृत्यू हा एक प्रसंग होता. प्रियकराच्या अतीवोत्कंठेतून मृतमुलाचें काल्पनीक चित्र तिनें स्वप्नसृष्टींत पाहिलें. मृत मुलगा आणि प्रियकराची भेट या दोन्ही गोष्टींचा समन्वय झाला होता.

स्वप्नांत कुणाचा तरी मृत्यु पाहिला म्हणजे पाहिलेला अगर दुसरा कोणतातरी माणूस मरतो की काय अशी कांहीं माणसांचीं कल्पना असते. परंतु एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत ठेवली पाहिजे कीं व्यवहारांत अनुभविलेल्या गोष्टी बाह्य मन जरी विसरत असले तरी अंतर्मनाला त्यांची पूर्णपणें जाणीव असते आणि स्वप्नसृष्टींतला चित्रपट अंतर्मनाकडून प्राय: दाखविला जात असल्याकारणानें स्वप्नाचा अर्थ लावतांना आपल्या आयुष्यांत घडलेल्या गोष्टी आणि अनुभवलेले प्रसंग यांचा स्वप्नसृष्टींतील देखाव्याशी कुठें संबंध लावतां येतो कीं काय तें आधी विचारांत घेतलें पाहिजे.

## आणखी एक अस्वाभाविक स्वप्न

एका बाईनें स्वप्नांत असें पाहिले कीं आपली पंधरा वर्षाची मुलगी मृत झाली आहे आणि तिला पेटींत घालून आपल्यापुढे ठेवण्यांत आले आहे. त्या बाईची मातृभाषा जी इंग्रजी त्या भाषेंत तिला तें तें स्वप्न असें प्रतीत झालें होतें——

"—My fifteen year old daughter lying dead before me in a box."

यांतील Box हा शब्द मोठा महत्त्वाचा आहे व त्यावरच स्वप्नातील व्युत्पत्ती अवलंबून आहे. Box शब्दाचें इंग्रजींत १ पेटी २ तोंडावर मारलेला गुद्दा ३ सिनेमा गृहांतील राखीव जागा, असे प्रामुख्यानें अर्थ होतात, परंतु इंग्रजीं वाक्यप्रचारांत Box हा शब्द स्त्रीचें कामदेवगृह या अर्थानेंहि उच्चारला जातो. तेव्हां पेटींत पाहिलेली मृत मुलगी म्हणजे वस्तुस्थितींत पोटांत वाढणारा गर्भ असा अर्थ निर्माण होतो.

त्या स्वप्नाचा फ्राइडने असा अर्थ लावून म्हटले आहे—" पहिली मुलगी जन्माला येते वेळीं त्या बाईला भीति वाटत होती कीं आपलें मूल मेलेले तर निर्माण होणार नाहीं ? त्या गोष्टीला पंधरा वर्षे होऊन गेलीं आणि त्या गरोदरपणांत मृत मुलीची कल्पना स्वप्नरूपानें तिला दिसली. ( Freud : His Dream & Sex Theories पृष्ठ 64–65

## विरोधानें इच्छा तृप्तीचा प्रत्यय आणून देणारे स्वप्न.

एका दुखणाईत बाईला एकदां असें स्वप्न पडलें कीं उन्हाळ्यांतील एका थंड हवेचें ठिकाणीं एका तलावांतील काळ्या पाण्यांत तिनें उडी घेतली. त्या पाण्यांत फिक्कट चंद्राचें प्रतिबिंब पडले होतें. 1950

ज्या स्वप्नांत चंद्र दिसतो तीं स्वप्नें मुलाचा जन्म दर्शविणारी असतात असें फ्राइडचें म्हणणें आहे. आणि अशा स्वप्नांतील स्वप्नाची संगति त्या स्वप्नांतील प्रकार उलट केले म्हणजे व्यवस्थित लागते. त्या स्वप्नांत त्या बाईनें स्वतःला पाण्यांत उडी टाकतांना पाहिले. म्हणजे ती पाण्यांतून वर आली ! आणि पाण्यांतून वर येणें म्हणजे बुडतांना वांचणें, नवा जन्म होणें असा अर्थ होतो. ज्या बाईला तें स्वप्न पडलें ती बाई बरेच दिवस आजारी होती. त्या आजारांतून आपली सुटका व्हावी अशी तिची साहजीक इच्छा असणार, आणि त्याप्रमाणें तूं बुडतांना वांचशील, बरी होशील असें

त्या स्वप्नानें सुचविलें होतें. त्या दुखण्यांतून बरें होणें म्हणजे एक प्रकारें तिचा नवा जन्मच होता. त्या तलावाचें पाणी काळें होतें. तिचा रोगही दुर्धर होता. त्या काळ्या पाण्यांतून ती न बुडतां वर आली होती——म्हणजे त्या दुर्धर रोगांतून तिची सुटका झाली होती. आणि त्याच्याही पुढें त्या पाण्यांत तिला चंद्र दिसला. अर्थात् मातृपद प्राप्त होण्याची चिन्हें त्या चंद्रानें सूचित केली होती. तो चंद्र पुन्हां फिक्कट होता. नुकतीच रोगांतून उठलेली माता ही अशक्त असणार आणि अशा परिस्थितींत जन्माला आलेलें मूल हें वर्णानें फिक्कट दिसले तर तें निसर्गनियमाला धरूनच होय.

बाणानें आपल्या कादम्बरीच्या आरंभीच तारापीडाच्या राणीला स्वप्नांत चंद्र दिसल्याचें वर्णन केलें आहे. आणि त्या स्वप्नानें सूचित केल्याप्रमाणें तिला पुढें मुलगा झाला व त्याचें नांव चंद्रापीड म्हणून ठेवण्यांत आलें. बाणाचें वर्णन कवी कल्पनेला साजेसें असलें तरी चुकूनमाकून कां होईना पण मानस शास्त्राला धरून आहे कारण त्या महाकवीनेंही सत्यसृष्टींत अशा प्रकारच्या स्वप्नांचा पडताळा पाहिला असेल.

मनाच्या नुसत्या कल्पनांतून स्वप्न कसें निर्माण होतें ही एक मोठी विचार करण्यासारखी गोष्ट आहे. नुसते विचार हे आकार धारण करितात. पूर्वींच्या अनुभवाशीं त्यांची सांगड घातली जाते आणि मोठा अद्भूत असा देखावा स्वप्नांत दिसतो. कुठल्या कल्पनेचा कुठल्या विचाराशीं कसा संबंध आहे हें उकलतां आलें म्हणजे कधीं, कधीं जी स्वप्नें फार भयंकर वाटतात त्यांचा फोलपणा प्रत्ययास येतो.

आपल्या भावला फांसावर लटकविल्याचें एका बाईनें स्वप्नांत पाहिलें.

त्या बाईला हें स्वप्न पडलें तें तिचा भाऊ फांसावर जावा अशी इच्छा होती म्हणून खास नव्हे. एक तर ती तिच्या दोघाही भावांची प्रेमळ बहीण होती, आणि ते दोघेही भाऊ स्विस्तवासीं झाले होते.

एक भाऊ आठ वर्षांपूर्वी क्षयरोगाला बळी पडला होता आणि चार वर्षांपूर्वी दुसऱ्या भावाचा कॅन्सरनें अंत केला होता. आणि तिला स्वप्नांत जो टांगलेला भाऊ दिसला होता तो क्षयानें मेलेला नव्हे की कॅन्सरला बळी पडलेलाही नव्हे. तो त्या दोघांमिळून एक असा होता.

आणि हें स्वप्न त्या बाईच्या Tumor[१]ची शस्त्रक्रिया झाल्यानंतर पडलें होतें. याशिवाय तिला कफ आणि खोकल्याची जबरदस्त पीडा होतीच. त्या कफामुळें आपल्याला क्षय झाला आहे व त्या ट्युमार-मुळें आपणाला कॅन्सर झाला आहे कीं काय अशी तिला भीति वाटे. क्षय आणि कॅन्सर हे आपले अनुवंशीक रोग आहेत अशी पुन्हां तिची समजूत व्हावयास तिच्या दोन मृत भावांची उदाहरणें तिच्यापुढें होतीच. आपल्या भावाचें ते रोगजन्य आत्यंतिक दुःख तिनें प्रत्यक्ष पाहिलें होतेच. तें दुःख फांसावर लटकण्याइतकें महाभयंकर असेल, अशी तिची कल्पना असेल, आणि त्या कल्पनेंतून त्या स्वप्नांचा उगम झाला असेल, किंवा आपल्याला एकवेळ फांसावर लटकलेले परवडेल; परंतु आपल्या दोन भावांना जे दोन रोग झाले ते एकसमयावच्छेदेकरून आपणांला होऊं नयेत अशा तिच्या इच्छेंतूनच तें स्वप्नदर्शन तिला घडले असेल. (Freud: His dream & Son Theories पृष्ठें ५९–६०).

जीवनांत घडलेल्या कांहीं कांहीं प्रसंगांचा मनावर जबरदस्त ठसा बसतो. जागृदावस्थेंत घडलेल्या हकीगतीविषयीं फारसें कांहीं वाटत नाहीं. परंतु ते प्रसंग स्वप्नांत वेळोवेळीं माणसाला भिववून सोडतात.

---

* हा प्रकार शब्दांनीं जास्त वर्णन करतां येण्यासारखा नाहीं. फ्राइडचें वर्णन येणें प्रमाणें आहे. " The Brother in the dream is not a real brother, but a composite of one brother who died of tuberculosis eight years before and of another who died of cancer fore years ago· १ पेशीला येणारी सूज.

यावरून मनावर केलेला आघात किती जबरदस्त असतो याची कल्पना येते.

माझा एक मित्र १९४० सालीं मॅट्रिकच्या परीक्षेला बसून पास झाला. परंतु अजूनहा दरवर्षी मॅट्रिकची परीक्षा झाल्यानंतर निकाल लागण्यापूर्वीं त्याला स्वप्न पडतें कीं आपण मॅट्रिकच्या परीक्षेंत नापास झालों आहोंत व दुःखानें भारावलेल्या अंतःकरणानें तो जागा होतो.

ज्या वर्षीं तो मॅट्रिकच्या परीक्षेला बसला होता त्यावर्षीं त्याला आपण नापास झालों आहों असें कदाचित् स्वप्न पडलें असेल. परीक्षेला बसलेल्या अनेक विद्यार्थ्यांना अशीं स्वप्नें पडतात; परंतु माझ्या त्या मित्राच्या मनावर त्या स्वप्नाचा इतका भयंकर परिणाम झाला असला पाहिजे कीं धुरानें काळवंडलेल्या भिंतीवर कितीहि रंग फासला तरी तो काळेपणा नष्ट होत नाहीं तशी त्याची ती स्वप्नांतील आभासमय स्मृति नष्ट हात नाहीं.

याच माझ्या मित्राला आपण वाहत्या पाण्यांत आहोंत व ते पाणी चढत चढत कमरेवरून, पोटावरून, छातीवर व शेवटीं गळ्यांपर्यंत येते असा स्वप्नांत भास होतो. पोहतां येत नसल्यामुळें तो फार घाबरतो. आपलें नाक पाण्याच्यावर ठेवण्याचा तो आटोकाट प्रयत्न करतो. शेवटीं नाकांपर्यंत पाणी भिडते व मृत्यूच्या भितीनें तो एकदम जागा होतो. हें स्वप्न त्याला नेहमीं नेहमीं पडत असतें व तो निष्कारण भयविव्हल होऊन जातो.

या स्वप्नाची कारण मीमांसा अशी आहे कीं तो इंग्रजी शाळेंत असतांना पावसाळ्यांत एका ओहाळावर पोहणें शिकण्यास गेला होता तिथें त्याच्या नाकातोंडांत पाणी जाऊन तो घाबरा झाला आणि पुन्हां आपण पाण्यांत म्हणून उतरणार नाहीं अशी त्याच्या मनानें धास्ती घेतली. त्या धास्तीमुळेंच त्याला तें स्वप्न नेहमीं पडत असतें.

## ज्ञानार्जनाचे गुप्त मार्ग

माणसांना पडणाऱ्या बऱ्याचशा स्वप्नांना अर्थ असतो आणि तो अर्थ ज्याचा त्यालाच प्रयत्न केल्यास नीट लावतां येतो कारण बरी-चशीं स्वप्नें त्या त्या व्यक्तीच्या विचार, वासना, भावना इत्यादिकांवर अवलंबून असतात.

आधुनिक मानसशास्त्राचे प्रणेते विलियम मॅगडुमल हे आपलें मित्र डॉक्टर जुंग व त्यांचे स्नेही याजबरोबर मानसशास्त्राचा अभ्यास करीत असतांना व कांहीं नव्या सिद्धांताचे संशोधन करीत असतांना त्यांना एके रात्रीं स्वप्न पडलें त्या स्वप्नाचें ते स्वतः वर्णन करितात—

" माझ्याबरोबर दोन ( अस्पष्ट ) माणसें होतीं. एका तलावाची योजना, आखणी यासंबंधी आमचं बोलणं चाललं होतं. मी पोहत पोहत पुढें चाललों होतों आणि एका लहान होडींत बसून तीं दोन माणसें माझ्या मागून येत होतीं. पोहतां पोहतां मला एकही किनारा दिसेनासा झाला. तलावाचं पाणी स्वच्छ होतं आणि धुकं जमूं लागलं. मला एकाएकीं असं वाटलं कीं एखादी आगबोट येईल आणि ती माझ्या अंगावरून जाईल. धुकं हळू हळू दाट झालं माझ्या मागून नौकेंत बसून येणारी तीं दोन माणसं दिसतात कां म्हणून मी वळून पाहिलं तो त्यांचाही पत्ता नव्हता. घाबरून मी आरोळी मारली पण कुणी ओ दिली नाहीं. हताश होऊन मी आणखी जोरानं आरोळी मारली. माझ्या तोंडांत पाणी शिरून मी बुडायला लागलों व धडपडत जागा झालों.

या स्वप्नाचें स्पष्टीकरण करतांना मॅगडुगलसाहेब पुढें लिहितात—

" ज्या रात्रा मला स्वप्न पडलें त्याच्या आदल्या दिवशीं मी डॉक्टर जुंग व त्याचा एक मित्र यांच्याबरोबर एका तलावांत नौकाविहारार्थ गेलों होतों. स्वप्नांत मला जी दोन माणसं दिसलीं व जीं अस्पष्ट असल्याकारणानें ओळखतां आली नाहींत ती हींच असली पाहिजेत.

स्वप्नांत मी त्यांच्यापुढें गेलों व त्यांचा माझा संबंध तुटला व बुडूं लागलों. हा सर्व प्रकार मानसशास्त्राचें नवें सिद्धांत शोधून काढतांना माझी फसगत तर होणार नाहीं ना ?—ही जी माझ्या मनांत भीति होती त्या भीतींतून निर्माण झाला. मी डॉक्टर जुंगच्या सहाय्यानें मानस शास्त्राच्या प्रांतात संशोधन करीत होतों. स्वतंत्र विचार करून, प्रयोग करून पुढें जावं व जुंगला सांपडलं नाहीं ते आपण आधीं शोधून काढावं असं माझ्या मनाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनं वाटलं असेल. तेंच जुंग आरामानं नौकेंत बसला असतांना मी धडपडत पोहत पुढें जाण्यानं स्वप्नांत दर्शवलं गेलं. जुंगचा हात सोडला तर पुढं धोका आहे हें त्या स्वप्नांत सूचित केलं होतं. (Outline of Abnormal Psychology पृ. १५० ).

जगांत व्यवहार करतांना अनेक प्रकारचे बरे वाईट अनुभव येतात. पुष्कळदां माणूस त्याच्या बाबतींत जर कांहीं अन्याय झाला असला तरी तो बोलून दाखवीत नाहीं. सामान्य माणसाला त्याच्या कर्तृत्वाची जर कोणी संभावना केली नाहीं तर त्याबद्दल वाईट वाटत असते; आणि त्यामुळें तो मनांतल्या मनांत कुढतो. कधीं कधीं माणूस आपल्या मनांत येणाऱ्या विचारांची दादही घेत नाहीं. परंतु स्वप्नसृष्टींत त्याला त्याच्या विचारांची स्पष्ट प्रतीकें दिसतांत.

पुष्कळ वर्षे आघाडीवर काम केलेल्या एका सेनाधिकाऱ्याला कांहीं कारणास्तव रुग्णालयांत पडावें लागलें होतें. तो अधिकारी कुणाशीं फारसें बोलत नसे परंतु एकदां एका मानसशास्त्रज्ञानें विनंति केल्यावरून त्यानें आपलें स्वप्न निवेदन केलें. तो म्हणाला, " बकिंगहॅम राजवाड्यामध्यें स्वप्नांत मला चहा-पार्टीला बोलावण्यांत आलें होतें. चांगले चांगले खाद्य पदार्थ रेलचेल टेबलावर ठेवण्यांत आले होते. त्या खाण्यापिण्याच्या वस्तूवर सर्व पाहुणे मंडळी ताव मारीत होती; परंतु

माझ्याकडे कुणाचेंच लक्ष नव्हते, आणि त्या उत्तमोत्तम पदार्थांपैकीं एकही माझ्या हातीं लागला नाहीं.

या स्वप्नाची चर्चा आणि छाननी केल्यानंतर कांहीं खऱ्या गोष्टी बाहेर आल्या. कित्येक वर्षांच्या नोकरीनंतर रुग्णालयांत पडलेल्या त्या माणसाला लेफ्टनंट करण्यांत आलें होतें आणि लेफ्टनंटची नौकरी कैक वर्षें केल्यानंतरही त्याला जरूर ती बढती मिळाली नाहीं किंवा त्याचा योग्य तो सन्मान झाला नाहीं. त्याच्या बरोबरीच्या कित्येक माणसांना बढत्या व बक्षिसें मिळत राहिली होती आणि ही गोष्ट त्याच्या जिवाला लागून राहिली होती. त्याला लागलेल्या तळमळींतून त्या स्वप्नाचा उदय झाला होता. ( An Outline of Abnormal Psychology - William McDougall P. 152-53 ).

कधीं कधीं चित्ताला ज्या विषयाची तळमळ नाहीं आणि जाणीवही नाहीं असें विषय देह झोंपीं गेला असतांना स्वप्नांत डोकावत असतात. मिस्टर जेम्स लँग्हॅम यांनीं आपल्या more than meets the eye या पुस्तकांत या संबंधीचा स्वतःचा एक अनुभव दिला आहे—

"स्वप्नांत मला एकदां दोन शब्द मोठ्या अक्षरांत अगदीं ठळकपणें दिसले. एक शब्द होता 'Caryatid' व दुसरा होता 'Elegiac' ते शब्द अस्पष्ट होत गेले, पुन्हां स्पष्ट दिसू लागले आणि मी जागा झालो तेव्हां त्या शब्दाची बरोबर स्मृति राहिली. 'Elegiac' हा शब्द मला माहित होता आणि स्वप्नांत दिसला तेव्हां त्यांत कांहीं अभिप्रेत असेल असें मला वाटत नाहीं. 'Caryatid' हा शब्द कधींच कुठेंच वाचल्याचें व ऐकल्याचें मला स्मरत नाहीं. अर्थात त्याचा अर्थ मला माहीत नव्हता आणि तो शब्द कोषांत आहे की नाहीं हें पण मला माहीत नव्हतें, मग मी कोष उघडून पाहिला. तो शब्द सांपडेलसें मला वाटत नव्हतें; परंतु

सांपडला आणि त्या शब्दाचें स्पेलिंग मी जसें स्वप्नांत पाहिलें तसेंच होतें त्या शब्दाचा कोषांत A female figure used instead of a column to support an entamblature ' ' असा अर्थ दिला मग मी Entablature या शब्दाचा अर्थ काढून पाहिला तर तो part of a design in classic architecture which Surmounts the columns and rests upon the capita s. (जुन्या शिल्पकलेंत वरच्या बाजूच्या कलाकृतींना खालून आधार देतांना खांबाऐवजीं एखाद्या स्त्रीचा पुतळा ठेवून देत असत त्याला Caryatid असें म्हणत.

मग त्या स्वप्नाचा अर्थ माझ्या लक्षांत आला. आदल्या दिवशीं लंडन शहरांतील एका रेस्टॉरांत मी चहा पीत बसलों होतों आणि त्या खोलीतील एका बाजूची शिल्पकृती मी पाहिलों. त्यांत वरच्या बाजूला जें कोरीव काम केलें होतें त्याला आधार देण्याकरितां बऱ्याचशा स्त्रियांच्या कोरलेल्या पुतळ्या केल्या होत्या. ती प्रत्येक पुतळी म्हणजे शिल्पशास्त्रांतील भाषेंत Caryatid होत. मला शिल्पशास्त्राचें अथवा शिल्पशास्त्रांतील पारिभाषिक शब्दांचे मुळींच ज्ञान नाहीं.

वरील हकीकतीवरून रूढ मार्गांव्यतिरिक्त ज्ञानार्जनाचें आणखीही कांहीं गुप्त मार्ग आहेत हें आपल्या लक्षांत येतें. स्वप्न हें जाणिवेचें ज्ञानार्जनाचें एक द्वार आहे आपल्या कालांत पुष्कळसें जाणणें अनुभविणें हें स्वप्नांतील जाणिवेचें वैशिष्ट आहे.

## : ५ : स्वप्नांतील काळ

रात्रीं माणूस सात–आठ तास झोप घेतो. आठ तासांपैकी कांहीं क्षणांत तो एखादें स्वप्न पाहतो आणि त्या स्वप्नांत कितीतरी तास, किती तरी दिवस, अथवा किती तरी वर्षांचा काळ त्यानें अनुभविलेला असतो. स्वप्नांतील कालाचें मोजमाप दृश्य सृष्टींतील कालाहून भिन्न असतें. त्याला ( इटर्नल नाऊ -- शाश्वत वर्तमानकाल ) असें कदाचित् म्हणतां येईल.

महंमदानें स्वप्नांत स्वर्गाला भेट दिल्याची अद्भुत हकीकत कुराणांत आहे. त्या स्वप्नांत महंमदानें स्वर्गांतले निरनिराळे प्रदेश पाहिले. त्या त्या प्रदेशासंबंधीं त्याला व्यवस्थित माहिती देण्यांत आली आणि अनेक देवदूतांच्या सभेंत त्यानें दीर्घकाळ चर्चाहि केली; आणि हें सर्व किती वेळांत झालें ? तर महंमद आपला पार्थिव देह सोडून स्वर्गांत जावयास निघाला तेव्हां त्याचा हात त्याच्या उशाशीं असलेल्या सुरईला लागून ती लवंडली होती, तिच्यांतील पाणी पुरतें जमिनीवर सांडण्यापूर्वींच तो त्या स्वप्नसृष्टींतून आपल्या देहांत परत आला होता !

स्वप्नांतील कालासंबंधीं आणखी एक कथा ॲडिसननें आपल्या स्पेक्टेटरमध्यें एकदां लिहिली होती.

इजिप्तमधील कोणा एका सुलतानाला महंमद इतक्या थोडक्या वेळांत स्वर्गांत जाऊन आला हें मुळींच पटत नव्हतें. इतकेंच नव्हे तर आपल्या धर्मोपदेशकानें असली धादांत खोटी गोष्ट कुराणांत

ग्रंथित केल्याबद्दल त्यानें त्याला दोषहि दिला होता. परंतु गूढविद्येंत प्रवीण असलेल्या त्याच्या गुरूनें महंमदाचे स्वप्न अशक्य नसल्याची खात्री करून देण्याचें ठरविलें. त्यानें पाण्यानें भरलेलें एक मोठें भांडें आणविलें आणि तो सुलतानाला म्हणाला, "या भांड्यांत डोकें बुडवून तूं चटकन काढ."

मग त्या सुलतानानें आपलें डोकें आपल्यापुढील त्या भांड्यांतील पाण्यांत बुडविलें; आणि आपण एका पर्वताच्या पायथ्याशीं एका समुद्र-किनाऱ्यावर एकटेच आहोंत हें जाणून तो सुलतान अगदीं आश्चर्यचकित झाला. आश्चर्याचा पहिला धक्का ओसरल्यानंतर त्याला वाटलें कीं आपल्या गुरूनें आपणावर कांहीं तरी चेटूक केलें आणि त्याबद्दल तो त्या गुरुदेवावर मनांतल्या मनांत बहुत चरफडला. कांहीं काळ गेल्यानंतर सुलतानाला भूक लागली; परंतु आपण ज्या प्रदेशांत आहोंत तेथें चरितार्थाचें कोणतेंहि साधन नाहीं हें त्याला लवकरच कळून चुकलें.

सुलतान इकडे तिकडे कांहीं वेळ भटकला आणि हिंडतां हिंडतां त्याला झाडें तोडीत असलेले कांहीं लोक दिसले. त्यांच्यापाशीं त्यानें मदतीची याचना केली. त्या लोकांनीं त्याच्यावर दया करून त्याला आपल्या गांवांत नेलें. त्या गांवांत तो कांहीं वर्षें राहिला. त्यानें उद्योग करून द्रव्य संपादन केलें आणि एका श्रीमंताच्या मुलीशीं लग्न केलें. त्या बाईबरोबर त्यानें अत्यंत सुखाचा संसार केला व तिच्यापासून त्याला चौदा मुलें झालीं; परंतु पुढें तिच्या मृत्यूनंतर त्याच्यावर इतकीं अरिष्टें कोसळलीं व इतका द्रव्यनाश झाला कीं म्हातारपणीं त्याला रानांतील मजूर म्हणून काम करावें लागलें.

एके दिवशीं समुद्र-किनाऱ्यावरून तो चालला असतां त्याला स्नान करावेंसें वाटलें. म्हणून त्यानें कपडे काढून समुद्रांत बुडी मारली.

डोळे वर काढून त्यानें एकदां केस झटकले व उघडून पाहातो तों त्याला आपण आपल्या फार पूर्वीच्या काळच्या दरबारी मंडळींत आहोंत असें आढळलें. त्याच्यापुढे असलेलें पाण्याचें भांडेंहि त्याला दिसलें. त्याचा तो संसार आणि तीं मुलें वगैरे त्याला समोरच्या भांड्यांत डोकें बुडवून काढण्यास जितका वेळ लागला तितक्या वेळांत पडलेलें तें स्वप्न होतें. सुलतानाचा या गोष्टीवर विश्वास बसविण्यास त्याच्या गुरूला पुष्कळ प्रयास पडले.

## योगवासिष्ठांतील मायाचरित्र

**योगवासिष्ठांतील मायाचरित्र** हें त्या सुलतानाच्याच स्वप्नासारखें अन्य उदाहरण आहे. ती कथा अशी—

गौतममुनीचा शिष्य गाधी नांवाचा परम ज्ञानी होता. भगवंताला संतुष्ट करून, ' मला तुझी माया जी म्हणतात त्याचा थोडासा अनुभव दाखव ' अशी त्यानें इच्छा प्रकट केली. त्यावर भगवान म्हणाले,

पीयूषसरतटाका पावोनी जेवि इच्छिणें गरळा ।
तैसें ज्ञान तुझें हें आलें भासोन निश्चये मजला ॥
तें तूं पाहों इच्छिसि परि मोठ्या संकटांत पडशील ।
भ्रमसिल मोहें निश्चित दुःखें अति भोगतांचि रडशील ॥

परंतु गाधी ऐकेना. तेव्हां भगवंतांनीं याला मायेची अल्पशी प्रतीती दाखविण्याचें कबूल केलें.

आणि एके दिवशीं तो गौतमशिष्य गंगेंत स्नान करून अघमर्षणी बुडी मारता झाला. तों त्याच क्षणीं मायेनें आपलें विंदान मांडलें——

गाधीला वाटलें आपणास रोग झाला व त्याचें अतीव दुःख भोगतां भोगतां आपणांस मृत्यू आला. मृत्यूनंतर आपण यमलोकीं गेलों व तेथें नाना तऱ्हेच्या यातना भोगल्या. त्यानंतर तो मृत्यूलोकांत पुन्हां अंत्यजयोनींत जन्मास आला. त्याचें नांव कंटक ठेवण्यांत आलें.

पुढें त्याचें लग्न झालें व त्याचें कुटुंबहि मोठें वाढलें. कंटक महार उदरपूर्तीसाठीं वाटमाऱ्याचा धंदा करूं लागला. अशीं कांहीं वर्षें गेल्यानंतर तो ज्या गांवांत राहत होता त्या गांवांत महामारी आली आणि त्या साथींत त्याच्या कुटुंबांतील सर्व माणसें मरून तो एकटाच उरला. दुःखानें रडत रडत व दारोदार भिक्षा मागत तो परागंदा झालेला कंटक चांडाल केरळ देशास आला. तेथला राजा मरण पावला होता व त्याला पुत्रसंतान नसल्यामुळें हस्तिनीच्या सोंडेंत माळ घालून तिला नगरांत फिरविण्यात येत होतें. कंटकाच्या दैवाचा विलास असा कीं, त्या हत्तिणीनें त्याच्याच गळ्यांत माळ घातली आणि तो केरळ देशाचा राजा झाला.

कंटकानें बारा वर्षें आनंदानें राज्य केलें. आपली जात लपवून त्यानें बहुत ब्राह्मणभोजनें घातलीं. पुढें एकदा त्याच्या मूळच्या गांवचे त्याचे नातलग कर्म-धर्म-संयोगानें त्याच्या राजधानींत आले. तेव्हां त्यांना भेटायची त्याला अतीव उत्कंठा होऊन तो एकदा त्या अंत्यजांना भेटावयास गेला. कंटक राजाच्या मंत्र्याला संशय येऊन तो मात्र त्याच्या मागोमाग गेला; आणि त्यानें राजाचे त्या अंत्यज मंडळीशीं झालेलें संभाषण चोरून ऐकलें व आपला राजा अंत्यज आहे हें रहस्य त्यानें सर्व राज्यांत फोडलें. तेव्हां सर्वत्र हाहाकार झाला. मग त्या राज्यांतील विद्वान् लोक एकत्र जमून त्यांनीं ठरविलें कीं राज्यांतील सर्व लोक बाटले आणि त्यांच्या शुद्धीकरतां देहान्त प्रायश्चित्ताशिवाय उपाय नाहीं. तेव्हां त्या राज्यांतील वृद्ध-तरुण स्त्रिया–पुरुष इत्यादि नागरिकांनीं चिता पेटवून अग्निप्रवेश केला. आपल्या आईबापांसाठीं रडणारीं बालकें मात्र त्या ठिकाणीं उरलीं. कंटक महारानें तो प्रकार पाहून त्याचें अंतःकरण व्यथित झालें. आपणच या सर्व नाशास कारणीभूत आहोंत हें पाहून त्यानें आपल्यासाठींहि एक सरण रचलें व त्यावर तो बसला. खालून

येणारी अग्निशिखा त्याच्या डाव्या मांडीला झगटली आणि तो चटका सहन न होऊन त्यानें आरोळी मारली व सरणावरून खालीं उडी टाकली.

तो इकडे गंगाजलांतला गाधी बोंब मारीत मारीत पाण्यांतून बाहेर आला व पाहातो तों त्याच्या डाव्या मांडीस फोड तरतरून निघाला आहे !

आपण गंगेच्या पाण्यांत बुडी मारली होती याची त्याला आठवण झाली. आपणाला स्वप्न पडलें म्हणावें तर मांडीला फोड कसा आला याचें कारण त्याला समजेना. भ्रांतचित्तानें तो घरीं परत आला तेव्हां त्याच्या पत्नीनें त्याला विचारलें, " आपल्या मांडीला हा फोड कसा आला ? " त्यानें उत्तर दिलें, " ह्या तुझ्या शंकेचें कारण माझ्याच्यानें सांगवत नाहीं. "

## गुरुबंधूचा पुरावा

त्याच दिवशीं गाधीचा एक गुरुबंधू जो बाहेरगांवीं गेला होता तो फिरता फिरतां त्याला भेटयास आला. त्यानें गाधीला हकीगत सांगितली— " एका केरळगांवांत मला नुसती मुलेंच आढळलीं. माझ्या तिथल्या मुक्कामांत मी एकदां भोजन केलें. त्यांतल्या एका जाणत्या मुलाला मी त्याच्या आईबापाविषयीं विचारलें. तेव्हां तो म्हणाला, ' कंटक नावाच्या एका अंत्यजकुलोत्पन्न खलपुरुषानें या राज्यांत भ्रष्टकार केला म्हणून आमच्या आईबापांनीं अग्निकाष्ठभक्षण करून स्वतःला पुनीत करून घेतलें. '

" मित्रा, त्या पापपुरींत अन्नग्रहण केल्यामुळें जो दोष माझ्या ठिकाणीं निर्माण झाला तच्छमनार्थ मी तीर्थयात्रा करीत हिंडत आहे."

ती अद्‌भुत हकीकत सांगून गाधीचा मित्र निघून गेला. नंतर गाधी स्वतः ज्या गांवीं तो कंटक महार जन्मास आला होता त्या गांवा जाऊन तेथें समस्त वृत्त तेथील लोकांना विचारता झाला. तेव्हां आपण

स्वप्नसृष्टींत अनुभविलेली व आपल्या मित्रानें सांगितलेली हकीकत खरी आहे, असें त्याच्या प्रत्ययास आलें.

याप्रमाणें मायेचें अद्भुत चरित्र वसिष्ठानें रामास सांगितलें. या चरित्रांत विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं, गाधीनें स्वप्नांत चितेवरून उडी घेतली आणि तिथें बसलेल्या चटक्यामुळें त्याच्या प्रत्यक्ष शरिराला फोड आला. स्वप्नांतल्या अद्भुत अनुभवाचा परिणाम माणसाच्या देहावर होतो याचें एक उदाहरण **रेव्हरेंड लेडबीटर** यांनीं आपल्या **आलकिऑनीज लाइव्हज्** नामक एका पुस्तकांत सूर्य या टोपण नांवाच्या एका मुलाच्या स्वप्नाच्या हकीकतींत दिलें आहे.

सूर्यानें स्वप्नांत एकदां असें पाहिलें कीं आपण एका तलावाच्या भिंतीवर बसलों आहों. त्याच्यापेक्षां चारसहा वर्षांनीं लहान असलेली एक मुलगी त्या तलावांत त्यानें पडतांना पाहिली. त्याला पोहतां येत होतें. चटकन उडी टाकून त्यानें त्या मुलीला वर काढली आणि आपल्या हांतून जें अपूर्व कृत्य घडलें त्यामुळें विस्मयचकित होऊन तो जागा झाला. तेव्हां त्याच्या अंगावरील कपडे ओले झाले होते. ( Alcyone's lieves; life XIII, पृष्ठ १७५–१९५ ).

त्या स्वप्नसुंदरीशीं सूर्याचें पुढें लग्न झालें. पृथ्वीवरील निरनिराळ्या देशाच्या वाङ्मयांत ज्या अर्थी वरीलप्रमाणें सदृश कथा आहेत, त्या अर्थी त्यांत कांहीं तरी सत्य असलेंच पाहिजे. त्या निवळ कविकल्पना नाहींत.

### एका शास्त्रज्ञाचा अनुभव

फक्त चाळीश सेकंदांच्या अवधींत एका शास्त्रज्ञानें अनुभविलेल्या एका स्वप्नाची हकीकत या ठिकाणीं दिल्यास अनाठायी होणार नाहीं.

त्या शास्त्रज्ञाला आपलें दोन दांत उपटून घ्यावयाचे होते, आणि त्यासाठीं गॅस हुंगवून त्याला दंत–वैद्याच्या खुर्चीवर बसविण्यांत आलें. आपले दांत उपटले जात असतांना आपणाला कोणत्या संवेदना

होतात त्या नीट लक्षांत घेण्याचा त्यानें निर्धार केला; परंतु तो त्याचा निर्धार जागच्याजागीं राहून त्या हुंगलेल्या गॅसमुळें त्याच्यावर निद्रेचें पलट आलें.

तो शास्त्रज्ञ त्याच्या समजुतीप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठला आणि नेहमींप्रमाणें शास्त्रीय प्रयोग करण्याचे व विद्वान् लोकांपुढें व्याख्यानें देण्याचे त्याचे कार्यक्रम सुरू झाले. आपल्या प्रयोगांतून आपण कांहींतरी अद्‌भुत शोध लावीत आहोंत आणि आपलें प्रत्येक व्याख्यान हेंहि आपणाला प्राप्त झालेल्या सिद्धीचें लक्षण आहे, ही त्या शास्त्रज्ञाला जाणीव झाली. असा क्रम कित्येक दिवस –कित्येक आठवडे चालला. शेवटीं एके दिवशीं तो रॉयल सोसायटीपुढें व्याख्यान देत असतां तिथें असलेल्या कोणा तरी बेशिस्त माणसानें इट् इझ ऑल ओव्हर नाऊ ! ( झालं, सगळं काम आटोपलं ! ) असे उद्गार काढले आणि त्यामुळें तो शास्त्रज्ञ थोडासा चिडला आणि व्याख्यानांत व्यत्यय आणणारा हा माणूस कोण आहे हें पाहण्याकरितां त्यानें मान वळविली, तो आणखी पुन्हां आवाज आला– दे आर बोथ आउट (' दोन्हीं दांत काढून झाले '). मग त्या शास्त्रज्ञाला माहित पडलें कीं आपण अजून खुर्चीवरच आहोंत आणि डॉक्टरनें आपले दोन दांत नुकतेच मोठ्या सफाईनें उपटून काढले आहेत !

वरील उदाहरण हें कांहीं सामान्य स्वप्नाचें नव्हे. वस्तुस्थितींत घडलेल्या एका प्रकाराची स्वप्नांतील अनुभवाशीं कशी सांगड घातली जाते व मनुष्य जागा होतो, याचें हें एक उदाहरण आहे.

स्वप्नसृष्टींतील स्थल काल वेगाला जड सृष्टीसारखीं बंधन नाहींत. स्वप्नसृष्टींतील हालचाल जाणीव सर्व कांहीं अमर्याद. स्वप्नांतील अनुभव म्हणजे जसा कांहीं निमिषांत उत्पन्न होऊन अंतर्धान पावणारा विद्युल्लतेचा लखलखाट. मांसास्थिमय पंजरांतून सुटून घटकाभर अनंतांतून

बुडी देऊन आलेल्या अनुभवाच्या प्रकाशाची नुसती तिरिप म्हणजेच स्वप्नांतील अलौकिक अनुभवाची ओझरती स्मृति. आपल्याला माहीत असलेल्या सर्व साधनांतून अन्य तऱ्हेनें शेंकडों, हजारों मैल दूर अंतरावर घडत असलेले प्रकार माणसाला स्वप्नसृष्टींत दिसूं शकतात. या प्रकाराला कांहीं शास्त्रज्ञांनीं दूरदर्शनभास ( Teloesthesia ) असें नांव दिलें आहे. अशाच अलौकिक तऱ्हेनें एका मनांतील विचार दुसऱ्याच्या मनांत उतरूं शकतात या प्रकाराला दूरसंवेदन (Telepa thy ) असें म्हणतात.

अशा रीतीनें माणूस दोन जगांत जीवन जगत असतो. जागेपणचे त्याचे सर्व व्यवहार जडसृष्टीच्या नियमाला धरून असतात. परंतु स्वप्नसृष्टींतील जाणिव व व्यवहार कांहीं निराळ्याच नैसर्गिक नियमांना धरून असल्याकारणानें स्वप्नसृष्टी ही सामान्य माणसाला गूढ व अद्भुतरम्य वाटत असते. दूरदर्शनभासाचे व दूरसंवेदनाचे कांहीं नमुने पुढील प्रकरणांत दिले आहेत.

## : ६ : स्वप्नांतील दूरदर्शन

निरभ्र दृष्टीच्या कोणत्याही संशोधकाला आतां ' स्वप्न ' हा विषय केवळ मनोरंजनाचा, अर्थशून्य असा प्रकार राहिलेला नाहीं. शास्त्रज्ञांनीं व संशोधकांनीं आतां देशोदेशींच्या लोकांना पडलेल्या स्वप्नांची छाननी करून पाहिली आहे व स्वप्नांतील अनुभव हा केवळ दुर्लक्ष करण्यासारखा नाहीं अशी जगांतील पुष्कळ जाणत्या माणसांची खात्री झाली आहे.

जागृदवस्थेंत जसा एक माणूस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन कुणाला तरी भेटूं शकतो तसा तो स्वप्नांतही भेटूं शकतो असें अनुभव कांहीं लोकांना प्रत्यक्ष आले आहेत.

### सूक्ष्म देहाचे व्यवहार

एका बाईला स्वप्नांत एक सुंदर घर व त्याच्या भोंवतालची बाग दिसे. तें घर, ती बाग तिनें प्रत्यक्ष अशी कधींच पाहिली नव्हती. आपण आपल्या मोटारींतून चाललों आहोंत व जातां जातां वाटेंत तें घर आपण पाहिलें व आपण त्या दगडी घरापुढील उद्यानांत शिरलों असें स्वप्न त्या बाईला मधून मधून सारखें दोन वर्षेपर्यंत पडत होतें. अनेक वेळां तें घर जसेच्या तसें स्वप्नांत पाहिल्यामुळें त्या बाईला जशी आपल्या स्वतःच्या घराची ओळख होती तशीच त्या स्वप्नांतील घराची झाली.

पुढें एकदां उन्हाळ्यांत ती बाई पूर्वीं कधीही न गेलेल्या एका गांवीं आपल्या एका मित्राच्या घरीं चार दिवस राहण्यासाठीं म्हणून गेली. आणि एके दिवशीं तो मित्र त्याच्या घरापासून सुमारें वीस

मैल अंतरावर राहणाऱ्या त्याच्या घरोब्याच्या कोणा मंडळींकडे आपल्या त्या पाहुणीला मोटारींतून घेऊन गेला आणि जसजसें तें दूर जवळ येऊं लागलें तसतसा तो रस्ता व ती दुतर्फाची झाडी आपल्या ओळखीची आहे असें त्या बाईस वाटूं लागलें. आणि मग जेव्हां एक दगडी घर त्या बाईच्या दृष्टीच्या टप्प्यांत आलें तेव्हां हेंच तर आपण स्वप्नांत पाहिलेलें घर याची तिला पूर्ण खात्री पटली. तें घर व त्याच्या सभोंवतालच्या बागेंतील झाडेंझुडपें अगदीं तिनें वेळोवेळीं स्वप्नांत जशीं पाहिलेलीं होतीं तशींच्या तशीं होतीं.

परंतु त्याहूनही मोठा चमत्कार म्हणजे त्या घराची मालकीण जेव्हां आपल्या पाहुणे मंडळींचे स्वागत करावयास आली तेव्हां तिनें प्रत्यक्ष कधीं न पाहिलेल्या त्या बाईस ओळखलें व ती म्हणाली, "गेल्या दोन वर्षांपासून माझे घराभोंवती संचार करतांना मी तुला अनेक वेळां पाहिलें आहे !—" ( James Langham कृत More than meets the Eye पृष्ठें १३४–१४५ )

वरील हकीकतीवरुन हें सिद्ध होतें कीं ज्या बाईला तें वेळोवेळीं पडलेलें स्वप्न म्हणजे केवळ कल्पनेचा खेळ नव्हता. ती आपल्या सूक्ष्म देहानें प्रत्यक्ष त्या घरीं गेली होती व ती तिथें ज्या ज्या वेळीं गेली त्या त्या वेळीं त्या घराच्या मालकिणीनें तिला पाहिली होती.

जड देह अथरुणावर झोपी गेला असतांना माणूस दुसऱ्या कुठल्या तरी देहानें दूर जाऊं शकतो आणि जागृदवस्थेंतील जाणिवेव्यातिरिक्त दुसऱ्या कुठल्या तरी जाणिवेनें अनुभव घेऊं शकतो यासंबंधीं अधिक विवेचन या ग्रंथाच्या अखेरच्या प्रकरणांत येईल.

### यथार्थ दर्शन

खुनी माणसाला पकडून देण्याच्या कामीं कांहीं माणसांचीं स्वप्नें कारणीभूत झालीं आहेत. चार्ल्स् किंग्जटन यांनीं आपल्या 'ए गॅलरी

ऑफ रोग्ज ' नामक पुस्तकांत ' क्राइम अॅण्ड क्लेअरव्हॉयन्स् ' ( गुन्हा आणि दिव्यदृष्टि ) नामक एक प्रकरण लिहिलें आहे. त्या प्रकरणांत असल्या स्वप्नांच्या अद्भुत परंतु मनोरंजक आणि खऱ्या हकीकती आहेत.

चार्ल्स् किंग्जटन लिहितात, ' १८४० च्या फेब्रुवारी महिन्यांतली ती रात्र. त्या रात्रीं सेंट हेलेना बेटापासून सुमारें पन्नास मैलांवर असलेल्या ' ओरिअेन्ट ' नामक बोटीवरील अेडमंड नेव्हेल नांवाच्या एका धाडशी आणि कार्यकुशल खलाशाला एक स्वप्न पडलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नेव्हेल छोट्या हजेरीस बसला असतांना त्याचा चेहरा पडला होता आणि त्याचें अंग थरथरत होतें. त्याच्या बाजूला बसलेल्या त्याच्या सहाध्यायांनीं जेव्हां त्याच्या विषण्णमनस्कतेचें कारण विचारलें, तेव्हां तो म्हणाला ' वेडब्रिज येथें इमारती लाकडांचा व्यापार करणारा माझा भाऊ काल मारला गेल्याचें मी स्वप्नांत पाहिलें. तो आपल्या घोड्यावरून चालला होता. इतक्यांत कुणी तरी दोन माणसें आलीं. घोड्याचा लगाम धरून त्यांनीं घोडा अडविला, त्याला यथेश्च बडविलें आणि त्याचें प्रेत रस्त्याच्या बाजूला फेकून दिलें. '

नेव्हेलनें आपलें स्वप्न निवेदन करितांना कित्येक बारीक-सारीक गोष्टींचें इतकें व्यवस्थित वर्णन केलें होतें कीं ओरिएन्ट बोटीच्या कप्तानाला आश्चर्य वाटून त्यानें स्वप्नाचा तो सविस्तर वृतान्त लिहून काढला. स्वप्न पडल्याची वेळ आणि तारीखहि नमूद करण्यांत आली. आपण स्वप्नांत पाहिलेली हकीकत खरीच असली पाहिजे असें नेव्हेलचें अंतर्मन निर्वाळा देत असल्यामुळें तो अगदीं बेचैन झाला होता, म्हणून त्यानें कप्तानाजवळून रजा मागून घेऊन तो इंग्लंड देशास आला.

नेव्हेल आपल्या घरीं येतांक्षणीं आपल्या भावाचा अलक्षित रीतीनें खून झाला असल्याची हकीकत त्याला समजली. आणि कॉर्नवॉल पोलिसांनीं चौकशी करून सुद्धां खुनी सांपडला नाहीं, असें त्याला सांगण्यांत आलें. ताबडतोब नेव्हेल वेडब्रिज येथील एका पोलिस अधिकाऱ्यास भेटून म्हणाला, " तुम्ही माझ्याबरोबर येत असाल तर ज्या दोन माणसांनीं माझ्या भावाचा खून केला तीं माणसें मी दाखवतों चला. कारण त्या दोन माणसांनीं माझ्या भावाचा खून करून आपल्या निवासस्थानीं निघून जातांना मी माझ्या स्वप्नांत पाहिलें आहे ! "

भावाच्या आकस्मिक मृत्यूमुळें या माणसाचा मेंदू बिघडला असावा, असें प्रथम त्या पोलिस अधिकाऱ्यास वाटलें ; परंतु नेव्हेलनें अत्यंत अर्जव केल्यामुळें त्याच्याबरोबर जाण्याचें त्या पोलिस अधिकाऱ्यानें कबूल केलें ; व बरोबर दोन हस्तक घेऊन तो पोलिस अधिकारी नेव्हेलच्या मागोमाग निघाला. अगदीं बरोबर रस्ता माहीत असल्याप्रमाणें, कोणालाहि न विचारतां व कुठेंहि न अडखळतां त्या खलाशानें त्या शिपाई मंडळीस एका झोपडीजवळ आणून सोडलें. त्या झोपडींत लाइटफूट नांवाचे दोन बंधु राहात होते. त्यांपैकीं एका भावानें दार उघडून नेव्हेलचा चेहरा पाहिला तेव्हां आपण ज्याचा बळी घेतला त्या माणसासारखाच असलेला नेव्हेलचा चेहरा पाहून तो अगदीं भेदरून गेला आणि त्यानें ताबडतोब आपला गुन्हा कबूल केला.

लाईटफूट बंधूंवर पुढें रीतसर खटला भरण्यांत आला. साक्षीदार म्हणून नेव्हेलनें आपल्या स्वप्नांत पाहिलेली त्या खुनाची जी साद्यंत हकीकत सांगितली, त्यांतील सर्व बारकावे अगदी अक्षरशः खरे असल्याचे गुन्हेगारांनीं आश्चर्यचकित होऊन कबूल केलें. लाइटफूट बंधूंना देहांताची शिक्षा झाली.

ह्या खटल्यामुळें अिंग्लंडमधील त्या वेळच्या हुषार लोकांत फार मोठी खळबळ झाली. स्वप्नांत अशा गोष्टी दिसूं शकतात यावर ज्यांचा मुळींच विश्वास नव्हता अशा कित्येक विद्वानांनीं नेव्हेलच्या पुराव्याला व्यावहारिक स्वरूप देण्याचा जारीनें प्रयत्न केला. परंतु खून झालेल्या ठिकाणापासून नेव्हेल शेकडो मैल दूर होता, जाग्रदवस्थेंत आपल्या भावाची मृत्यूवार्ता कळण्यापूर्वी ओरिएन्ट बोटीवरील कप्तानानें ती कागदावर लिहून ठेविली होती, त्यामुळें बऱ्याचशा पंडितांना तोंडांत बोट घालून, हें कांहीं तरी अद्‌भुत आणि अवर्णनीय आहे असें म्हणणें भाग पडलें.

* * *

नेव्हेलच्या हकीकतीनंतर सुमारे वीस वर्षांनीं बेलजम् देशांतील गेक शहराच्या पोलिस अधिकाऱ्यांनीं एका दहा वर्षांच्या मुलीच्या स्वप्नांतील पुराव्यावरून खुनी माणसांना पकडल्याचें वृत्त नमूद करून ठेवलें आहे. ती गोष्टहि मोठी चटकदार आहे.

गेक येथें जोसेफ नांवाचे दोन भाऊ राहात असत. एके दिवशीं ते दोघे बंधु ग्रॉसवॉरडीन नामक शहरीं असलेल्या एका शाळेंत आपल्या मुलींना ठेवण्यासाठीं म्हणून निघाले. गेकपासून ग्रॉसवॉरडी-नचा प्रवास थोडा दूरचा होता. परंतु जोसेफ बंधु स्वतः मजबूत असल्यामुळें आणि ज्या गाडींतून ते चालले होते, तो गाडीवानहि अतिशय राकट आणि शस्त्रें बाळगणारा असल्यामुळें तो प्रवास त्यांना धोक्याचा वाटला नाहीं.

जोसेफ बंधूंनीं घर सोडलें त्याच रात्रीं दहा वाजतां वडील भावाची मुलगी झोपेंत घाबरून किंचाळत उठली. आपला बाप, बहीण व काका यांना कुणी तरी मारल्याचें स्वप्नांत दिसलें असें ती आपल्या आईला म्हणाली. पोरीला उगीच कांहीं तरी भीति वाटल्याचें

समजून तिच्या आईनें तिला थोपटून निजविण्याचा प्रयत्न केला. परंतु स्वप्नांतील भीषण देखाव्यामुळें ती मुलगी इतकी भ्याली होती कीं तिनें आपलें सर्व म्हणणें ऐकून घेण्याचा आपल्या आईपाशीं आग्रह धरला. मग तिच्या आईनें तिचें स्वप्न ऐकून घेतलें. त्या मुलीनें तिच्या वयाला साजेल त्यापेक्षां किती तरी व्यवस्थित व सूक्ष्म रीतीनें आपल्या स्वप्नांतील देखावा आपल्या आईस निवेदन केला. ग्रॉसवॉरडीनकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अरण्यांत शिरतांक्षणींच गोळ्या घालून दोन माणसांनीं त्या सर्व प्रवाशांचा प्राण घेतला होता आणि गोळ्या घालणारे ते दोघेजण दुसरे तिसरे कोणी नसून त्यांचे शेजारीच होते, हेंच त्या मुलीला मुख्यत्वेंकरून सांगावयाचें होतें. परंतु हा वृत्तान्त ऐकून देखील तिच्या आईला आपली मुलगी झपाटली असावी असेंच वाटलें.

सकाळीं उठल्यानंतर त्या दहा वर्षांच्या मुलीनें पुनः आपलें स्वप्न वर्णन केलें, तेव्हां तिची आई तिला घेऊन नगराध्यक्षाकडे गेली. गेकमधील ज्या दोन खुनी माणसांचीं नांवें त्या मुलीनें सांगितलीं होतीं ते दोघे नगराध्यक्षाच्या ओळखीचे होते. नगराध्यक्षानें सहज कुतूहल म्हणून त्या दोघांना बोलावणें पाठविलें, तेव्हां ते घरीं नसल्याचें समजलें. आता मात्र जोसेफ बाईंना आपल्या मुलीचें स्वप्न आपण समजत होतों त्याप्रमाणें खोटें नसून कांहीं तरी विचार करण्यासारखी बाब आहे असें वाटूं लागलें.

ताबडतोब पोलिसांस वर्दी देण्यांत आली व सहा पोलिस अधिकारी चौकशीसाठीं ग्रॉसवॉरडीन शहराजवळील अरण्याकडे धांवले. त्या वनप्रदेशांत धुंडतां धुंडतां त्यांना पांच माणसांचीं बोटें दिसलीं. खुनी इसमांनीं प्रेतांना जाळून टाकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु प्रेतांचे जे अवशेष सांपडले त्यांवरून तीं प्रेतें जोसेफ

कुटुंबांतील माणसांचींच होतीं याबाबत त्यांना संशय राहिला नाहीं.

इतका पुरावा सांपडल्यानंतर पोलिसांना त्या मुलीच्या स्वप्नाची सत्यता पटली आणि त्यांनीं ज्या दोन खुनी इसमांचीं नांवें तिनें सांगितलीं होतीं, त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. कर्मधर्मसंयोगानें मयतांच्या आंगांवरून लुबाडलेल्या द्रव्याची वांटणी करीत असतांनाच ते खुनी पोलिसांना सांपडले.

गुन्हेगारांस देहान्त शासन झालें तेव्हा " कांही तरी अपूर्व अशा ईश्वरी योजनेमुळेंच आपल्यावर आरोप शाबीत करतां आला. नाहीं तर आम्ही कायद्याच्या कचाट्यांत सांपडलोंच नसतों ! " असे खेदोद्गार त्यांनीं काढले.

हें आश्चर्यजनक स्वप्नवृत्त ऐकल्यानंतर कित्येक शास्त्रज्ञांनीं त्याची ऐहिक कारणें शोधून काढण्याचा प्रयत्न केला. मुलीला हिस्टीरिया वगैरे झाला होता कीं काय हेंहि त्यांनीं तपासून पाहिलें; परंतु ती मुलगी पूर्ण निरोगी असल्याचें त्यांना आढळून आलें. बेलजममधील कांही अध्यात्मवाद्यांनीं त्या मुलीचा परलोकविद्येसाठीं उपयोग करण्याचा प्रयत्न केला; पण ती मुलगी त्या कामीं त्यांच्या उपयोगी पडली नाही, किंवा जगाला थक्क करून सोडण्यासारखें दुसरेंहि स्वप्न पुन्हां कधी तिला पडलें नाही. मात्र ती पुढें बाई झाली तरी आपल्या वयाच्या दहाव्या वर्षी पडलेल्या त्या भयंकर स्वप्नाची हकीकत अगदी ताजी घडल्याप्रमाणें तिला आठवत होती.

* * *

माणसाचा पार्थिव देह एके ठिकाणीं शांत झोपला असतां कित्येक मैलांवर घडणारी हकीकत तो आपल्या सूक्ष्म देहानें त्या ठिकाणीं जाऊन पाहूं शकतों व सूक्ष्म देहांतले अनुभव आणि जाणीव तो आपल्या मेंदूत उतरवूं शकतो, हें वरील हकीकतीवरून सिद्ध होतें.

चार्ल्स् किंग्जटन यांनीं आपल्या पुस्तकांत स्वप्नांतील दृश्यांच्या आणखीहि कित्येक हकीकती सत्य आणि संशयातीत म्हणून वर्णन केल्या आहेत. त्यांपैकीं फ्रान्समधील एम्. बर्नार्ड या कायदेपंडिताचा अनुभव विचारांत घेण्यासारखा आहे. एम्. बर्नार्ड हे एका रात्रीं एक भयंकर स्वप्न पाहून जागे झाले. एम्. बर्नार्ड यांस असें दिसलें होतें कीं आपण एका खाणावळींत झोपलों आहोंत. इतक्यांत खाणावळीचा मालक व त्याची बायको आपल्या पलंगापाशीं आलीं. त्या बाईनें आपले हात धरले आणि त्या मालकानें आपल्या गळ्यावर एक लांब तीक्ष्ण सुरी फिरविली. नंतर त्या दोघांनीं आपल्याला खोलीबाहेर फरपटत नेलें आणि मागल्या बाजूस आधीच खणून ठेवलेल्या एका खड्डयांत आपणांस पुरून तो खड्डा कचऱ्यानें भरून काढला. बर्नार्ड जागे झाले तेव्हां त्यांना दरदरून घाम सुटला होता. आणि जागृत झाल्यानंतरहि तो खाणावळवाला आणि त्याची बायको या दोघांचे क्रूर चेहरे त्यांच्या मनश्चक्षु पुढें तरळत होते.

एम्. बर्नार्ड यांस हें स्वप्न पडल्यानंतर एक वर्षाचा अवधि लोटला. त्यांना दुय्यम न्यायाधिशाची जागा मिळाली आणि एके ठिकाणीं त्यांची बदली झाली. ज्या ठिकाणीं त्यांची बदली झाली होती त्या ठिकाणचे पोलिस अधिकारी सुमारे एक वर्षापूर्वी नाहीशा झालेल्या एका वकिलाच्या शोधांत होते. त्यांनीं रात्रंदिवस हें गूढ उकलण्याचा प्रयत्न केला होता. परंतु अद्यापि त्या बाबतींत त्यांना यश आलें नसल्यामुळें हताश होऊन या बाबतींतला तपास सोडून देण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. परंतु आणखी एक शेवटचा उपाय म्हणून त्यांनीं तेथील एका खाणावळवाल्याला मॅजिस्ट्रेटपुढे बोलावून कांहीं चौकशी करण्याचें ठरविलें होतें. या चौकशीच्या वेळीं नवे दुय्यम न्यायाधीश एम्. बर्नार्ड यांसहि बोलाविण्यांत आलें.

त्या खाणावळवाल्याची चौकशी करून कांहींहि निष्पन्न होणार नाहीं अशी खुद्द मॅजिस्ट्रेट यांची खात्री होती. त्या कोर्टाच्या आवारांतील ज्या खोलींत ही चौकशी होणार होती त्या खोलींत शिरतांक्षणीच बर्नार्ड यांस दोन माणसें दिसलीं. त्यांना एक वर्षापूर्वी स्वप्नांत दिसलेलाच तो खाणावळवाला आणि त्याची ती बायको होती ! मॅजिस्ट्रेटसाहेबांची परवानगी घेऊन एम् बर्नार्ड यांनी बोलावयास सुरुवात केली व त्या खणावळवाल्यास त्यांनीं दोषी ठरवून त्यानें त्याच्या पत्नीच्या साहाय्यानें त्या वकिलाचा खून कसा केला याची साद्यंत हकीकत सांगितली. ती ऐकून त्या खुनी दंपतीस या माणसानें आपलें कृष्णकृत्य कुठें तरी अदृश्य राहून पाहिलें असलें पाहिजे अशी खात्री झाली व गर्भगळीत होऊन त्यांनी गुन्हा कबूल केला. बर्नार्ड यांनीं ज्या ठिकाणीं स्वप्नांत स्वतःला पुरलेलें पाहिलें होतें, ती त्या खाणावळीच्या आवारातील जागा अचूक दाखविली आणि खणून पाहिल्यानंतर माणसाचीं हाडें त्या ठिकाणी आढळलीं !

बर्नार्ड यांच्या स्वप्नांवरून एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत येते ती ही कीं त्यांनीं त्यांच्या स्वप्नांत, वास्तविक खून दुसऱ्या माणसाचा झाला होता तरी, तो स्वतःचाच झाला असल्याचें पाहिलें होतें. हा घोटाळा कदाचित् त्यांच्या सूक्ष्म देहांतील जाणीव त्यांच्या मेंदूंत उतरतांना झाला असावा. स्वप्नांत अनुभवलेले प्रसंग जागृदवस्थेंत जसेच्या तसे स्मरत नाहींत हा अनुभव बहुतेक वाचकांना असेलच. त्याचप्रमाणें स्वप्नांतील व्यक्तिदर्शन हेंही कधीं कधीं शंभर टक्के बरोबर असूं शकत नाहीं. एखादा मनुष्य कुणाला तरी अपघात झाल्याचें स्वप्नांत पाहातो आणि थोड्याच दिवसांनीं त्याला कल्पना नसतांना त्याच्या एखाद्या नातलगाला अपघात झाल्याचें वृत्त त्याच्या कानीं पडतें. कुणीतरी एखादी व्यक्ति मेलेली पाहतो आणि मग कांहीं

दिवसांनीं त्याच्या ओळखीच्या एखाद्या माणसाचा संसार विस्कळित झाल्याची हकीकत त्याच्या कानावर येते. याचें कारण स्वप्नांतल्या त्या विशिष्ट प्रकारच्या जाणिवेनें व्यवहार करण्याची माणसाला सवय नसते, त्या जाणिवेची त्याला कल्पनाही नसते.

सुप्रसिद्ध टिटानिका बोटीनें जलसमाधि घेतली ही हकिकत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होण्यापूर्वी न्यू यॉर्कमधील एका बाईनें आपली आई 'लाइफ बोट' मध्यें बसून समुद्रांतून चालली आहे व तिचा जीव धोक्यांत आहे असें पाहिलें. तिनें तें स्वप्न सकाळीं उठल्या-बरोबर आपल्या नवऱ्यास सांगितलें. तेव्हां तो म्हणाला,' कसलं स्वप्न घेऊन बसलीस. तुझी आई इंग्लंडच्या कोरड्या जमिनीवर अगदी सुखरूप आहे.' परंतु त्या बाईला मनांतल्या मनांत तें स्वप्न फार भयंकर असल्यासंबंधीच्या एकसारख्या संवदना होत होत्या. आपण जें पाहिलें ते खरंच असलें पाहिजे, अशी तिची जवळ जवळ खात्री झाली होती. आणि तिनें तसें आपल्या नवऱ्याला बोलूनहि दाखविलें. परतु कांहीं केल्या त्याची खात्री पटेना.

दुसऱ्या दिवशीं टिटानिका बोटीच्या अपघाताची बातमी वर्तमान-पत्रांत प्रसिद्ध झाली. ज्या उतारूंचे जीव वाचले होते त्या उतारूंच्या यादींत त्या बाईच्या आईचें नांव होतें.

न्यू यॉर्कला आल्यावर तिच्या आईनें तिला खरी हकीकत सांगि-तली सर्वांना थक्क करून सोडण्यासाठीं ती म्हातारी आधीं न कळव-तांच इंग्लंडहून टिटानिका बोटीनें न्यूयॉर्कला यायला निघाली होती. आणि वाटेंत जो खरा प्रकार घडला तो तिच्या मुलीला स्वप्नांत दिसला होता.

लाइफ बोटमध्यें असतांना म्हातारीच्या मनांत एकसारखे आपल्या लेकीच्याचसंबंधीं विचार येत होतें व त्या विचारामुळें जणूंकाय खेचले

गेल्यामुळे न्युयार्कमधील त्या बाईला चर्मचक्षूव्यतिरिक्त अन्य साधनांनीं दूरवर प्रत्यक्ष घडत असलेली घटना पाहतां आली (William Oliver Stivens कृत The mystery of Dreams)

स्वप्नांतील दूरदर्शनाचा अनुभव मिसेस ग्रीन नांवाच्या एका बाईला ९ जानुआरी १८८५ च्या रात्रीं आला. त्यासंबंधीं तिनें मिस रिचर्डसन नांवाच्या आपल्या एका मैत्रिणीला लिहिलें होतें—

"उत्तम पोषाख केलेल्या दोन सभ्य स्त्रिया एक गाडीं हांकीत असतांना मला दिसल्या. वाटेंत एका जलाशयाजवळ त्या गाडीचा घोडा पाणी पिण्याकरितां थांबला परंतु त्या ठिकाणीं त्याला पाय ठेवण्यासाठीं जागा नसल्यामुळें त्या घोड्याचा तोल गेला. आंतील बायांना एकदम धक्का बसला व मदतीसाठीं त्यांनीं बोंब मारली. त्यांच्या डोक्यावरील टोप्या उडाल्या आणि त्या खालीं पडत असलेल्या मला दिसल्या मला ते अपघाताचें दृश्य बघवेना म्हणून मी तोंड वळवले व रडत रडत म्हणाले, 'त्या बिचाऱ्यांना मदत करण्याला कोणीच कां नव्हतें?' स्वप्नांतील त्या भयानक दृश्यामुळें मी दचकून एकदम जागीं झाले. 'काय झालं म्हणून पतिराजांनीं मला विचारलें. मी सर्व स्वप्न वृत्तान्त त्यांना निवेदन केला तेव्हां त्यांनीं मला विचारलें, 'स्वप्नांत पाहिलेल्या त्या स्त्रिया तुझ्या ओळखीच्या होत्या काय?' मी म्हणाले, 'नाहीं त्या माझ्या ओळखीच्या नव्हत्या' आणि खरोखर जागृदवस्थेंत त्यांना कधीं पाहिल्याचेंहि मला आठवत नव्हतें. त्या स्वप्न दर्शनामुळें माझ्या मनाला जो धक्का बसला होता तो आख्खा दिवस तसाच होता. मी अंथरुण सोडून उठले तेव्हां जानुआरीची १० तारिख उजाडली होती. तो माझा व माझ्या मुलाचा जन्म दिवस असल्याकारणानें स्वप्नाची तारीख माझ्या बरोबर लक्षांत राहिली.

"तें स्वप्न पडल्यानंतर तीन महिन्यांनीं माझा ऑस्ट्रेलियांत

राहणारा भाऊ अलेन याच्याकडून एक पत्र व वर्तमानपत्राचा अंक आला. त्या पत्रांत त्यानें आपली मुलगी व तिची मैत्रीण यांना बुडून कसा मृत्यू आला त्याची भीषण हकीकत लिहिली होती आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, ती हकीकत माझ्या स्वप्नाशीं अगदीं जुळती अशी होती. माझ्या भावाची मुलगी ऑस्ट्रेलियांतच जन्मली होती व तिला मी प्रत्यक्ष असें कधींच पाहिलें नव्हते.

" इंग्लंड देशांतील रात्र म्हणजे ऑस्ट्रेलियांतील दिवस ही गोष्ट लक्षांत घेतां ज्या क्षणीं तो अपघात ऑस्ट्रेलियांत घडला त्याच क्षणीं तो मला स्वप्नांत जसाच्या तसा दिसला हें सिद्ध होतें. माझ्या भावानें लिहिलें होतें——

" त्या अपघाताची हकीकत प्रसिद्ध करणारा शुक्रवार दिनांक ११ जानुआरी १८७८ रोजीं संध्याकाळीं प्रसिद्ध झालेला Inglewood Advertiser चा अंक सोबत पाठवीत आहे. तो वाचून झाल्यावर परत करावा."

त्या वर्तमानपत्रांत अपघाताचें जें वृत्त प्रसिद्ध झालें होतें तें असें——

" परवां बुधवारीं वेडरबर्नच्या जवळपास एक मोठा अपघात घडला. त्या अपघातांत लेहीं ( Lehey ) व अलेन ( Allen ) नामक दोन स्त्रियांस मृत्यू आला. असें दिसतें कीं किनिपिअलच्या ( Kinipial ) च्या बाजूनें वेडरबर्नकडे दोन स्त्रिया घोड्याच्या गाडींतून येत होत्या. वाटेंत घोड्याला पाणी पाजण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. ज्या जलाशयाजवळ त्यांची गाडी थांबली तो जलाशय १० ते १२ फूट खोल होता आणि त्या जलाशयांत चुकून त्यांनीं आपली गाडी हांकली असावी कारण मिस्टर डब्ल्यू मॅक्केचनी नांवाचे एक गृहस्थ त्या ठिकाणीं गेले असतांना त्यांना घोडा व गाडी पाण्यांत बुडाली असून पाण्याच्या पृष्ठभागावर स्त्रियांच्या दोन टोप्या तरंगत असलेल्या

दिसल्या पुढें तपास केल्यानंतर एकमेकांना बिलगलेली स्त्रियांचीं दोन प्रेतें त्या ठिकाणीं सांपडलीं." ( Frederic W. N. Myers कृत Human Personality & its Survival after bodily death खंड १ ला, हकीकत क्रमांक ४२०.. )

ऑस्ट्रेलियांत घडलेला हा अपघात ज्या क्षणीं घडला त्याच क्षणीं इंग्लंड देशांतील बाईला कोणत्याही तऱ्हेची कल्पना नसतांना जसाच्या तसा दिसला. त्या अपघातांत सांपडलेली एक तरुणी त्या स्वप्न पाहणाऱ्या बाईची भाची होता व तिला तिनें प्रत्यक्ष कधीं पाहिली नव्हती. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां आपल्या इंद्रियांना जड सृष्टींत जें साधत नाहीं तें स्वप्नसृष्टींत सहज साध्य होतें हें लक्षांत येईल.

## : ७ : स्वप्नांत भेटणारीं जिवन्त माणसें

मागील प्रकरणांत डोळे बंद असतांना स्थूल देह अंथरुणावर झोपला असतांना माणूस आपल्या सूक्ष्म देहानें दूरवर जाऊन पाहतो, ऐकतो व निरनिराळे व्यवहार करूं शकतो हें आपण पाहिलें. आपण घराबाहेर पडलो म्हणजे आपण कांहीं कामानिमित्त किंवा सहज दुसऱ्या कांहीं माणसांना भेटतो. त्या भेटीगांठींची आपणाला व त्या दुसऱ्या माणसांना आठवण असू शकते. घराबाहेर गेलेला माणूस जसे दुसऱ्यांचे व्यवहार पाहूं शकतो. त्याप्रमाणें रात्रीं किंवा दिवसा झोपेंत आपल्या स्थूल देहाबाहेर पडलेली माणसें एकमेकांस भेटूं शकतात एकमेकांचे व्यवहार पाहूं शकतात व जागेपणीं ज्या माणसांला आपण भेटलो जें आपण स्वप्नांत पाहिलें तें खरें होतें. तो निव्वळ भास नव्हता याचा कांहीं माणसांना प्रत्यय आलेला आहे त्याचा परामर्श आपण या प्रकरणांत घ्यावयाचा आहे.

साधारणपणें कोणतेंहि स्वप्न पडलें म्हणजे उठल्यानंतर त्याची जेवढी आठवण असेल तेवढेंच जवळपासच्या माणसांना सांगितलें तर सांगावयाचें नाहींतर विसरून जावयाचें, असाच बहुतेक लोकांचा नियम आहे. स्वप्नांविषयीं कुणी फारसा विचार करीत बसत नाहीं. परंतु ज्या माणसांना नेहमीं स्वप्नें पडत असतात, त्यांनीं आपल्या स्वप्नांतील अनुभवांकडे जर बारकाईनें लक्ष दिलें तर त्यांना त्याच्या स्वप्नांत कांहींतरी खोल बाजू असल्याचा प्रत्यय येणें शक्य आहे.

नेहमींच्या परिचयांतलीं किंवा कोठेंतरी केव्हांतरी पाहिलेलीं किंवा

कधींहि न पाहिलेलीं माणसें स्वप्नांत भेटलीं, म्हणजे, तो केवळ आभास, पूर्वस्मृतीचा तरंग, मनोवांछिताची काल्पनिक सफलता अशा तऱ्हेचा कांहीं प्रकार असतोच असें नाहीं. त्यांत कधीं सुचकता, प्रेरकता विद्यमान वस्तुस्थितीचें किंवा भवितव्याचें प्रत्यक्ष दर्शन घडत असतें. श्री. आनंदघनराम यांनीं आपल्या एका पुस्तकांत स्वप्नांचीं कांहीं मजेदार उदाहरणें दिलीं आहेत.

" गाडींतून जात असतां १२-१२-१८९३ च्या रात्रीं दौंडच्या पुढें आईच्या पायाखालीं दोन पिशव्या ठेवून आगगाडींत मी समोरच्या दुसऱ्या बाकावर निजलों. सुमारें अर्ध्या तासांत माझ्यासमोर एक गृहस्थ आला आणि तो म्हणाला; " तू निजलास काय ? तुझ्या पिशव्या चोर चोरतोय ना !" त्यासरसा मी, " आई ! पिशव्या !" म्हणून ओरडतच उठलों. पण पाहतों तो दोन्ही पिशव्यांवर पाय ठेवून आई बसली होती. ती म्हणाली, " मी पाय ठेवून बसलें आहे ना ?" या वेळीं मध्यें निजलेला एक मनुष्य उठून गेला. सकाळीं मनमाडास उतरतांना पाहिलें, तों पिशव्या कापून आंतील दोन कपडेहि कापले होते. पण दागिन्यांच्या डब्यापर्यंत हात घालून तो घेण्यापूर्वींच मी " आई ! पिशवी ! " म्हणून ओरडलों आणि त्यामुळें मध्यें निजलेला खिसेकातरू उठून गेला. याप्रमाणें स्वप्नानें तो डबा वाचला." ( स्वप्नमीमांसा, पृष्ठ ९२ )

वरील वृत्त वाचून एखादा चिकित्सक म्हणेल कीं, आनंद-घनराम यांना निजण्यापूर्वीं पिशव्यांच्या सुरक्षिततेविषयीं धास्ती वाटत होती म्हणून त्या धास्तींतूनच स्वप्नाचा उद्‌भव झाला. गोष्ट खरी आहे, परंतु तें स्वप्न केवळ धास्तीमुळें पडलें नव्हतें. आनंदघनरामांनीं स्वप्नांत जें पाहिलें, तो केवळ आभास नव्हता तर तें वस्तुस्थितीचें प्रत्यक्ष दर्शन होतें आणि त्यांच्या स्वप्नानें त्यांना जागें करून चोराला पळून जाणें भाग पाडलें.

मानवी जीवनांत इच्छा ही एक मोठी प्रेरकशक्ति आहे या इच्छातृप्तीसाठीं माणसांची कोण धडपड चाललेली असते. आपली भलीबुरी इच्छा माणसाला जागेपणीं पुरी करितां आली नाहीं तर ती स्वप्नांत कशी पुरी करितां येते याचें एक उदाहरण पाहूं—

१८५४ सालीं घडलेली ती गोष्ट. एक युरोपियन गृहस्थ आपली हिंदुस्थानांतील नोकरी संपवून आपल्या पत्नीसहवर्तमान परत आपल्या मातृभूमीस चालला असतांना वाटेंत इजिप्त देशांत त्या गृहस्थाची पत्नी आजारी पडली. त्या आजारानं ती अशक्त होऊन तिच्या सुधारण्याची आशा उरली नाहीं. बाईलाहि आपण आतां जगत नाहीं अशी खात्री पटली. मरणापूर्वी एकदां आपल्या डोळ्यांनीं मुलें पहावींत अशी तिची इच्छा होती. आणि ती तिनें बोलूनहि दाखविली. परंतु तीं तिचीं मुलें दूरदेशी असल्यामुळें तिची व मुलांची गांठ घालणें शक्य नव्हतें. तिला औषधपाणी देणाऱ्या जवळपासच्या माणसांस ती सारखी ७–८ दिवस सांगत होती, "माझ्या मुलांना मी एकदां डोळे भरून पाहिलं म्हणजे माझे प्राण सुखानें जातील."

अशा रीतीनें ती तळमळत असतांना तिच्या आयुष्याचा तो शेवटचा दिवस उजाडला. त्या दिवशीं तिला दीर्घ आणि गाढ निद्रा लागली. त्या निद्रेंतून तिला जागें करणेंहि कठीण होते. तिचा देह बिछान्यावर अगदीं शांत पडला होता. दुपारच्या वेळी ती एकदम जागी झाली आणि म्हणाली, "मी त्या सर्वांना पाहिलं ! पाहिलं मी त्यांना ! ईश्वराची स्तुति केली पाहिजे ! " एवढें म्हणून ती पुन्हां जी झोपली ती संध्याकाळपर्यंत. त्याच संध्याकाळीं तिचें प्राणोत्क्रमण झालें.

त्या बाईचीं मुलें इंग्लंड देशांत टॉर्क्वे येथें शिक्षण घेत होतीं. त्यांच्या कुटुंबाचा एक स्नेही त्यांच्यावर देखरेख ठेवीत होता. त्या

दिवशीं तीं मुलें आपल्या घरांतील प्रशस्त दालनांत एका मोलकरणीच्या देखरेखीखालीं मौजेचे खेळ खेळत होतीं. त्या मोलकरणीनें मुलांच्या आईबापांना कधींच पाहिलें नव्हतें. एकाएकीं एक सफेद कपडे घातलेली बाई त्या खोलींत सर्वांनीं पाहिली. तिनें प्रत्येक मुलाकडे पाहून स्मित केलें. नंतर हळूहळूं बाजूला जाऊन ती अदृश्य झाली. तिघां मोठ्या मुलांनीं त्या बाईला आपली आई म्हणून ओळखलें. तिचें अकल्पित दर्शन, तिचा शांतपणा आणि तिथें एकदम नाहींसें होणें याचा त्या मुलांच्या मनावर परिणाम झाला.

हा प्रकार १० सप्टेंबर १८५४ रोजीं घडला. त्या मुलांच्या कुटुंबांतील बायबलच्या प्रतीच्या मलपृष्ठावर ही हकीकत नमूद करून ठेवण्यांत आली होती आणि त्यावरूनच डॉक्टर एफ्. जी. ली यांनीं ती आपल्या “ ग्लिम्पसेस ऑफ दी सुपर नॅचरल ” ( व्हॉल्यूम २ रा पान ६४ ) या पुस्तकांत घेतली.

या मरणाऱ्या आईला आपल्या मुलांना पाहाण्याच्या अतिवोत्कंठेमुळें तिनें आपल्या मनश्चक्षूंसमोर आपल्या मुलांचें चित्र उभें केलें असल व आपलीं खरीखुरीं मुलें दिसलीं, असा केवळ भास होऊन तिला त्या अखेरच्या इच्छातृप्तीमुळें समाधान झालें असेल असें म्हणावें तर शेंकडों मैल दूर असलेल्या आपल्या मुलांच्या वसतिस्थानीं ती प्रत्यक्ष जाऊन आली इ. पुरावा आहे. यावरून माणसांना आपल्या उत्कंठा पुऱ्या करण्याची निसर्गाची योजना लक्षांत येऊन मोठा अचंबा वाटतो.

रात्रीं झोंपतांना आपल्या एखाद्या जिवलग माणसाला भेटण्याचा विचार आपल्या मनांत प्राबल्यानें आला किंवा तसा विचार करून आपण अंथरुणावर अंग टाकलें आणि जागेपणींचा तो अगदीं शेवटला विचार असला तर त्या माणसाला भेटतां येतें. मि. हडसन यांच्या

" सायकिकल फेनॉमेना " या पुस्तकांतील विषयासंबंधीचा एक भाग वाचून खिस्ती धर्मोपदेशकाच्या एका पत्नीनें स्वतः प्रयोग करून पाहिला होता व तो यशस्वी झाला होता. त्या धर्मोपदेशकानें लिहिलेली ही हकीकत " जर्नल ऑफ दि अमेरिकन सोसायटी फॉर सायकिकल रिसर्च (डिसेंबर १९०७) मध्यें प्रसिद्ध झाली आहे:—

" रविवारीं पहांटे १ वाजतां कुणीतरी आपल्या खोलींत आल्याचा भास होऊन मीं गाढ निद्रेंतून जागा झालों. पूर्ण जागा होऊन पाहतो तों माझी पत्नी माझ्या बिछान्यापाशीं पायालगत उभी होती; सकाळीं घरकाम करीत असतांना ज्या प्रकारचे कपडे ती अंगावर घाली, त्याच प्रकारचे कपडे तिच्या अंगावर मला दिसले.

मी उठून बसलों आणि म्हणालों, " तूं काय करतेस तिथें ! ' ती म्हणाली. ' मी तुमची हकीकत विचारायला आलें आहे. ' नंतर ती माझ्याजवळ आली, वांकली, तिनें मला कवटाळलें, आणि ती नाहींशी झाली ! मी ताडकन् पलंगावरून उडी मारली. खोलींत कु काळोख होता. दुसरें कोणींहि नव्हतें मी दिवा लावला. थरथर का लागलों. थंड घाम फुटल्यामुळें न्हाऊन निघालो."

" सकाळीं नाश्ता करतेवेळीं डॉ. के. व मिस्टर पी. यांना मी तो प्रकार निवेदन केला. बुद्धीला कितीहि ताण दिला तरी या प्रकाराचा मला उलगडा होईना म्हणून माझ्या पत्नीला तार करण्याचा मी विचार केला. कांहीं तासानें, " आम्ही सर्व ठीक आहोंत. " अशा अर्थाचें तिचें उत्तर आलें. "

" त्यानंतर कित्येक दिवसांनीं मी जेव्हां माझ्या घरीं गेलों, तेव्हां मला असें कळून आलें कीं, मी सुखानें झोंपलों आहे कीं नाहीं हें जाणण्याच्या इच्छेनें माझ्या बायकोनें त्या रात्रीं तो यशस्वी प्रयोग करून पाहिला होता."

अशा रीतीनें माणसाचें व्यक्तिमत्व द्विविध आहे. हें सिद्ध करून देणारे अनेक पुरावे संशोधक शास्त्रज्ञांना सांपडले आहेत. देह निद्रिस्त असतांना माणूस दुसरीकडे दूरवर जाऊन अनुभव घेऊं शकतो, हें सत्य प्रतीत झाल्यावर अभ्याससकाला रात्रीच्या वेळेचाहि सदुपयोग करितां येईल.

जड देहानें कितीहि दूर असलीं तरी ज्यांच्या अंतःकरणाचे रज्जू एकमेकांशीं प्रेमानें बांधले गेलें आहेत, तीं माणसें स्वप्नसृष्टींत एकमेकांच्या जवळ येतात. मानसशास्त्रदृष्ट्या अशा प्रसंगाना फार महत्व आहे. ज्या वाचकांना असले अनुभव आले असतील त्यांनीं तें जर वेळोवेळीं लिहून ठेवले तर या शास्त्रांत संशोधन करणाऱ्यांना त्यांचा पुष्कळच उपयोग होईल.

### संयुक्त संवेदना—

एक माणूस दुसऱ्या माणसाला स्वप्नांत भेटतो आणि त्या दुसऱ्या माणसालाहि आपण एकमेकांस स्वप्नांत भेटल्याची आठवण होते. असे प्रकार स्वप्नशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास करणाऱ्यांनीं नमूद करून ठेवले आहेत.

मिस्टर एस्. आर. विलमॉट यांनीं लिहिलें आहे— " ३ ऑक्टोबर १८६३ च्या रात्रीं " सिटी ऑफ लियरिक " या बोटीनें मी लिव्हरपूलहून न्यूयॉर्क येथें जात होतों. बोट लिव्हपूलहून सुटल्याच्या दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं एका समुद्रांत एकाएकीं वादळ झालें व तें जवळजवळ नऊ दिवस टिकलें. या नऊ दिवसांत आम्हांला चंद्र, सूर्य, तारे वगैरे कांहीं दिसले नाहींत. आठव्या दिवसानंतर जी रात्र आली, त्या वेळीं वादळ थोडेंसें शांत झाले होतें आणि त्यामुळें एका आठवड्याच्या जागरणानंतर मला प्रथमच चांगली झोंप लागली होती. पहाटेच्या सुमाराला मला स्वप्न पडलें. अमेरिकेंत ज्या माझ्या

बायकोला मी ठेवून आलों होतों, ती माझ्या खोलींत आलेली मी पाहिली. रात्रीं झोंपावयाचा पोषाख तिनें केला होता. खोलीच्या दारांतच आल्यावर तिला असें आढळलें कीं, माझ्या खोलींत मी एकटाच नव्हतों. त्यामुळें ती थोडीशी दचकली. परंतु लगेच पुढें होऊन व वांकून तिनें माझें चुंबन घेतलें आणि माझ्या अंगावर लाडिकपणें हात फिरवून ती निघून गेली!

मी जागा झालों, तेव्हां वरच्या बाकावर झोंपलेला सहप्रवासी विलियम जे. टेट माझ्याकडे मोठ्या कौतुकानें पहात म्हणाला, 'मोठा सुखी माणूस आहेस बुवा तूं. गुपचुप येऊन एक बाई तुझ्याशीं शृंगार चेष्टा करून जाते!'

"तुला काय दिसलं?" म्हणून मी त्याला विचारल्यावर मी जें स्वप्नांत पाहिलें होतें तेंच त्यानें बरोबर सांगितलें. मिस्टर टेट माझ्या-बरोबर न्यूयॉर्कपर्यंत होता. मी स्वप्न पाहिलें होतें; परंतु त्याला तर माझी बायको उघड्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष दिसली होती. न्युयॉर्कहून लोहमार्गानें मी वॉटरटाऊन येथें माझ्या मुलास व पत्नीस भेटलों. माझ्या पत्नीनें मला पहिला प्रश्न विचारला एक आठवड्यापूर्वी मंगळ-वारीं मीं तुम्हांला भेटलें होतें ना?

"एक आठवड्यापूर्वी तर आपण दोघें एकमेकांपासून हजार मैल दूर होतों. मी म्हणालों. "तें मला माहीत आहे." ती म्हणाली, "परंतु मी आपणांला नक्की भेटलें."

'तुला असं कशामुळं वाटतं!' मी तिला विचारलें. तेव्हां मला तिनें सांगितलें कीं वादळाच्या भयंकरपणाबरोबर 'आफ्रिका' बोट बुडाल्याचीहि हकीकत तिच्या कानावर आली होती. त्यामुळें माझ्या-विषयीं तिला काळजी वाटूं लागली. ज्या रात्रीं मला स्वप्न पडलें त्या रात्रीं माझ्याबद्दल वाटणाऱ्या धास्तीमुळें तिला बऱ्याच काळपर्यंत डोळा

लागला नाहीं आणि ती सारखा माझ्याविषयीं विचार करीत होती. पहांटे चाराच्या सुमाराला तिला स्वप्न पडलें आणि त्या स्वप्नांत ती बोटीवरील माझ्या खोलींत येऊन मला सुखरूप पाहून माझें चुंबन घेऊन व मोठ्या प्रेमानें माझ्या अंगावर हात फिरवून निघून गेली. माझ्या खोलीचें तिनें अगदीं बरोबर वर्णन केलें. ' वरच्या बाकावर झोंपलेला एक मनुष्य माझ्याकडे सारखा टक लावून पाहत होता म्हणून मला क्षणभर थोडी भीति वाटली. हें विलियम टेंटचेंहि वर्णन तिनें अगदीं बरोबर केलें. ( फेडरिक मायर्स कृत ह्युमन पर्सनॅलिटी खंड १ ला, पृ. ६८२-८३ )

आपल्या नवऱ्यावरील निरतिशय प्रेमामुळें मिस्टर बिलमॉट यांची पत्नी जड देह झोंपी गेल्यानंतर सूक्ष्म देहानें आपल्या पतीस जाऊन भेटली, ज्याअर्थीं मिस्टर टेट यांना ती उघड्या डोळ्यानें दिसली, त्याअर्थीं लिमरिक बोटीवर गेलेला तिचा देह कृत्रिम रीतीनें जड ( मटेरिअलाइज ) आला होता. प्रेमाचे लागे—बांधे जितके दृढ असतील त्या मानाने माणसांना असे आणि असल्या प्रकारचे अनुभव येऊ शकतात.

मिस्टर जे. पाइक यांनीं लिहिलें आहे—"कांहीं वर्षांपूर्वीं मी एके रात्रीं आगगाडीनें प्रवास करीत होतों. मी डब्यांत एकटाच असल्यानें कॅमडेन टाउन स्टेशनवर मला जागें करण्याची गार्डाला विनंती करून हात-पाय ताणून मी खुशाल झोंपी गेलों. मला अगदीं गाढ झोंप लागली असली पाहिजे. कॅमडेन स्टेशनवर गाडी थोडी उशीरानेंच आली असल्यामुळें गार्डाचे ते मला घाईघाईनें उठविणें थोडेसें त्रासदायकच वाटलें. गार्ड मला उठवावयास आला त्यावेळीं मला स्वप्न पडत होतें—'सकाळ झाली होती, मी माझ्या घरी होतों. माझ्या झोंपावयाच्या खोलींत मी कपडे करीत होतों, आणि सन्हा नांवाच्या घरच्या मोलकरणीला

दोनदां हांका मारून मी गरम पाणी आणावयास सांगितलें होतें.'

" मी जेव्हां प्रत्यक्ष घरीं आलों तेव्हां मला असें समजलें कीं, ज्या सन्हा मोलकरणीला मी स्वप्नांत दोनदां हाकां मारली होती, ती तिनें दोनदां स्पष्ट ऐकली आणि मी घरांत नाहीं हें विसरून ती धांवत धांवत माडीवर गेली आणि भुतासारखा पांढरा चेहरा करून खालीं आली. मी माडीवर नाहीं असें पाहून ती फारच दचकली होती. घरांतील मुलांनाहि तिच्या त्या कृतीचा मोठा अचंबा वाटला होता. कारण, त्यांना माझा आवाज ऐकूं आला नव्हता." ( फँटॅझम्स् ऑफ लिव्हिंस, बाय एडमंड गुर्नें, व्हाल्यूम २ रा पान १०५ ).

वरील उदाहरणांत सन्हानें आपल्या मालकाचा निव्वळ आवाज ऐकल्याचा पुरावा आहे. मिस्टर पाइक यांचा देह त्या गाडींत झोंपी गेला असतांना ते वस्तुस्थिति विसरून सूक्ष्म देहानें आपल्या घरीं गेले असले पाहिजेत. मिस्टर पाइक यांचा आवाज सन्हाला ऐकूं येण्यापुरताच जडत्व पावला होता. या प्रकाराला एडमंड गुर्नें यांनीं सब्जेक्टिव्ह हॅल्यूसिनेशन ) Subjective Hallucination "वैयक्तिक अविद्यमान वस्तुसंवेदन असें नांव दिलें आहे.

ज्यांची अतिशय चिकित्सक आणि संशयी म्हणून ख्याती होती, अशा रेव्हरेंड पी. एच्. न्यूनहॅम साहेबांनीं अदृश्य सृष्टीसंबंधी स्वतःचे कांहीं अनुभव आपल्या स्मरणवहींत लिहून ठेवले आहेत. त्यांपैकीं खालील उतारा पहा —

" १८५४ सालच्या मार्च महिन्यांतली गोष्ट. त्या वेळीं मी ऑक्सफर्डच्या वसतिगृहांत राहात होतों. एका रात्रीं मला असें स्वप्न पडलें कीं, जी पुढें माझी पत्नी झाली, तिच्या माहेरच्या मंडळींत मी रहात होतों. घरांतील सर्व बाबालोक झोंपी गेले होते आणि मी शेगडीजवळ तिच्या आईबापांशीं बोलत होतों. थोड्या वेळानें मी त्यांना सलाम

केला आणि मेणबत्ती घेऊन माडीवर झोपण्यासाठीं गेलों. माझी वाग्दत्त वधु त्याच वेळीं त्या माडीची वरची पायरी चढत होती. मी धांवत जाऊन तिला गांठलें आणि मागाहून तिच्या कमरेला मिठी मारली. त्या वेळीं माझ्या डाव्या हातांत मेणबत्ती होती परंतु तिचा मला अडथळा आला नाहीं."

"हें स्वप्न पाहून मी जागा झालों आणि तावडतोब घड्याळांत दहाचे ठोके पडलेले ऐकले. स्वप्नांतला तो रोमांचकारी अनुभव माझ्यावर इतका परिणाम करता झाला कीं, दुसऱ्या दिवशीं उठल्या-बरोबर मी माझ्या प्रियेला त्या स्वप्नाची साद्यंत हकीकत लिहून कळ-विली. माझें तें पत्र तिला पोंहोचण्याच्या आंतच तिचें मला पत्र आलें. त्यांत तिनें लिहिलें होतें, 'काल रात्रीं दहाच्या सुमारास तुम्ही माझें चिंतन करीत होतात काय? कारण, त्या वेळीं मी माडीवर झोंपण्याकरितां जात होतें, इतक्यांत मला तुमचीं पावलें जिन्यावर स्पष्ट ऐकूं आलीं आणि मला असें वाटलें कीं, माझ्या कमरेभोंवतीं तुम्ही विळखा घातलात!' (ह्यूमन पर्सनॅलिटी, बाय एफ्. मायर्स, पृष्ठ ४१८.)

वरील प्रकारास फ्रेडरिक मायर्सनें 'आत्मिक हल्ला' (सायकिकल् इन्व्हेंजन) असें नांव दिलें आहे. प्रबल अशा इच्छाशक्तीनें प्रियकर आपल्या प्रेयसीच्या घरीं गेला आणि त्याच्याविषयींचा विचारदेखील तिच्या चित्तांत नसतांना त्याचीं अदृश्य पावलें तिला ऐकूं आलीं आणि त्याच्या सुखस्पर्शाच्या संवेदना तिला झाल्या. असल्याच प्रकारची आणखी एक हकीकत मिस् गिडिंग्ज नांवाच्या एका मुलीनें एके ठिकाणीं प्रसिद्ध केली आहे. ती लिहिते—

"कांहीं वर्षांपूर्वी मी माझ्या एका मैत्रिणीच्या घरीं पाहुणी म्हणून गेलें होतें. एके दिवशीं माझी यजमानीण मिसेस् जे. ही एकाएकी

आजारी झाली. घरच्या डॉक्टरांना बोलावणें पाठविण्यांत आलें; परंतु ते बाहेर गेले असल्यामुळें दुसऱ्याच एका डॉक्टरांना मिसेस् जे. यांची प्रकृति दाखविण्यांत आली. मध्यरात्रीं मिसेस जे. यांचे नेहमींचें डॉक्टर आले व नवे डॉक्टर आणि ते या दोघांनीं मिळून मिसेस जे यांच्या प्रकृतीसंबंधीं आपापसांत चर्चा केली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मिसेस जे यांच्या बाहेरगांवीं गेलेल्या अविवाहित बहिणीकडून एक तार आली. ती तार अशी होती, ' घरीं कांहीं गडबड झाली आहे काय ? त्वरित उत्तर पाठवा. ' ' मी उत्तर पाठविलें आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं त्या तार करणाऱ्या मिसेस जे यांच्या बहिणीकडून एक पत्र आलें त्यांत पुढील मजकूर होता––

" मला एक चमत्कारिक परंतु स्पष्ट असें स्वप्न पडलें. ॲनी जेनेस फार आजारी असल्यामुळें पलंगावर पडलेली मी पाहिली आणि तिच्या खोलींत दोन डॉक्टर आपापसांत चर्चा करीत होते. त्यांपैकीं एक आपलें नेहमींचें घरचे डॉक्टर एल. हे होतें. दुसरे तिऱ्हाईत डॉक्टर उंच आणि सावळ्या वर्णाचें होते. त्याचें नांव डॉक्टर रॉइस असें असावें. कारण, त्याच नांवानें डॉक्टर एल् त्यांना संबोधित होते. "

" हें स्वप्न म्हणजे मिसेस जे यांच्या घरीं त्या रात्रीं प्रत्यक्ष घडलेल्या प्रकाराचेच चित्र होय. त्यांत चूक अशी फक्त एकच होती. दुसऱ्या डॉक्टरचें नांव ' राइस ' नसून ' राइड ' असें होतें. ( दी मेटॅफिजिकल मॅगेझिन, सप्टेंबर, १८९५ )

उद्दाम मनोवाञ्छिताचा स्वप्नांशीं अत्यंत निकटचा संबंध आहे. हें जाणून माणसांनीं आपल्या वृत्तीला जाणूनबुजून ठराविक दिशेनें वळण लावलें तर त्यापासून फार फायदे होण्यासारखें आहेत. नाटकातील त्या त्या प्रसंगाशीं तद्रूप होऊन कुशल नट हा जसा साजेसा अभिनव करतो तसा, वाटेल त्या माणसाला करितां येत नाहीं; परंतु

हर्षशोकादि संवेदनांनीं कोणत्याहि माणसाचें मन भारावलें म्हणजे त्या संवेदनांचीं प्रतिबिंबें चेहेऱ्यावर उमटल्यावांचून राहात नाहींत. याचा अर्थ असा कीं, निसर्गनियम लक्षांत घेऊन एखाद्या माणसानें गाढ अभ्यास केला तर आपल्यांतील सुप्त शक्ति जागृत करून कोणत्याहि माणसाला स्वप्नांत दुसऱ्या माणसाची गांठ घेणें शक्य आहे. परंतु प्रयत्न न करितां सुद्धां सामान्य माणसाच्या जीवनांत इच्छेचा जोर अनावर झाला म्हणजे स्वप्नांत शेंकडों मैल दूर असलेल्या व्यक्तीशीं भेटण्याचे व बोलण्याचें अनुभव येत असतात; श्री. आनंदघनराम यांनीं आपल्या 'स्वप्नमीमांसा' नामक ग्रंथांत अशा प्रकारचे आणखी कांहीं अनुभव दिलें आहेत—

" माझी मावशी १५ वर्षांची असतांना सासरीं हरिपूर गांवीं गोवरानें फार आजारी पडली होती. 'आपले वडील ( माझे आजोबा चिंचणींतील रा. कान्होपंत पागे ) वैद्य आहेत, ते आले तर बरें, पण त्यांना कोण कळविणार ?' अशा रीतीनें तिचें लक्ष वडिलांकडे वेधलें होतें. इकडे त्या रात्रीं कान्होपंतांना स्वप्न पडलें. त्यांच्या स्वप्नांत येऊन मावशी म्हणाली, " तात्या दुपारपासून मी गोवराच्या तापानें भाजत पडलें आहे हो ! "

" हें स्वप्न पाहतांच ते उठले. घरांत स्वप्न सांगितलें. आणि हरिपुरास सकाळीं ११ वाजतां जाऊन पोंहोचले. तेथील मंडळींत स्वप्न सांगतांना त्यांना आश्चर्य वाटलें. मावशी व तात्या यांच्या तोंडांतून मी हें ऐकिलें आहे. हरीपुरी गेल्या वेळीं वे. शा. सं. महादेवभटजी डबळकर यांनीहि मी ही हकीकत विचारून घेतली आहे.-" ( स्वप्नमीमांसा पृ. ६७-६८ )

ज्याला इंग्रजींत " वुइशफुल थिंकिंग " म्हणून म्हणतात तो प्रकार वरील स्वप्नांत घडून गोवरानें पीडलेल्या त्या तरूण स्त्रीला तिच्या

वडिलांकडून उपचार झाला.

जड देहाला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यास वेळ लागतो. मनाची धाव मात्र वायुवेगाहूनहि जबर असते. त्यामुळें एका माणसानें दुसऱ्या माणसाला प्रत्यक्ष देहानें भेटण्यापूर्वीं मन आधींच पुढें जाऊन स्वप्नाचा बोलपट कसा तयार करते त्याचें आणखी एक उदाहरण पाहूं. श्री. आनंदघनराम यांनीं दिनांक २८ मे १८८९ रोजी रोजनिशींत आपला अनुभव असा लिहिला आहे—

" मी तासगांवीं कुलकर्णी कामावर नमूद होतो. वरील तारखेस दुपारीं तक्क्यावर टेकून पडलों असतां सुमारें १०।१५ सेकंद गुंगी आली. त्या वेळीं मी असें पाहिलें कीं, माझे मित्र श्री. विनायक बळवंत आपटे हे मजजवळ आले आणि म्हणाले, " आतां घरीं चला, काम आहे. मी तुम्हांस बोलावण्यास आलों " त्याबरोबर मी डोळे उघडले व जागा झालों. मी त्यांच्याबद्दल पूर्वीं मनांत कल्पनाहि आणली नव्हती. तरी नेहमींच्या अनुभवावरून हें स्वप्न अर्थपूर्ण असावें असें ठरवून त्यांच्या तपासास निघालों. असें स्वप्न पडण्याचें मूळ कारण काय ? विनायकरावांनीं माझी आठवण काढली आहे काय किंवा माझ्याबद्दलच्या कांहीं गोष्टी तिथें निघाल्या आहेत काय ? याचा तपास करावा म्हणून मी तसल्या उन्हाचा निघालों. सावकाश गेलों तर न जाणों, नीट तपास लागणार नाहीं असें वाटून धूम पळत चाललों. कारण, उशीर झाल्यास त्यांच्या मनांत जरी माझी कल्पना त्यावेळीं आली असली, तरी दुसऱ्या गोष्टींत तिचें विस्मरण होईल. ते न व्हावें हा हेतु होता. इतक्यांत नं. १ चे शाळामास्तर बाळाजी नाथजी शिंदे यांची गांठ पडली. त्यांनीं पळतां कां ? ' म्हणून विचारलें. मी तसाच त्यांचा हात माझ्या काखेंत धरून, ' चला सांगतों ' म्हणून पळतांपळतांच सांगत त्यांना

बरोबर नेलें आणि म्हणालों, ' या स्वप्नाच्या कारणाचा कांहीं सुगावा लागला तर पाहूं.' निम्म्या वाटेच्या सुमाराला गेलों तोंच विनायकराव आपटे यांना समोरून येतांना पाहिलें व ते जवळ आल्यावर लिहिल्याप्रमाणें शब्द बोलले. ते मजकडेच येत होते. स्वप्न पाहिलेल्या वेळीं त्यांचें मन या विचारानेंच पूर्ण भरून जाऊन त्यांचें लक्ष मजकडेच वेधलें होतें. ( स्वप्नमीमांसा पृ. ६८-६९ )

जागृदवस्थेंत जशीं दोन माणसें एकमेकांना सहज भेटतात आणि त्या भेटींतले परस्पर व्यवहार जसे एकमेकांच्या लक्षांत राहतात, त्याप्रमाणें स्वप्नसृष्टींत कधीं कधीं दोन माणसें एकमेकांना भेटतात व अनुभविलेल्या स्वप्नांची दोघांना सारखी जाणीव असते. असल्या प्रकारचे कांहीं अपूर्व अनुभव संशोधकांनीं नमूद केलेले आहेत.

७ ऑक्टोबर १९३८ रोजीं मॉशे एक्स हे ब्रसेल्स शहरीं मादाम वाय् यांच्या घरीं झालेल्या एका स्वागत समारंभाला हजर होते. त्या रात्रीं १०॥ वाजतां एक्स् यांनीं मादाम वाय् बाईचा निरोप घेतला. त्याच रात्रीं मादाम वाय् यांना एक स्वप्न पडलें. तें असें—

" आपण एका अनोळखी सद्गृहस्थाबरोबर स्टेशनवर आहोंत, आपणाला पुष्कळ मंडळी निरोप देण्यासाठीं जमलीं आहेत, त्यांत मॉशे एक्स्देखील आहेत. इतक्यांत गाडी सुटते. आपले सर्व सामान डब्यांत घेण्यास आपणाला वेळ पुरत नाहीं. तेव्हां डब्याच्या खिडकींतून तोंड काढून आपण मॉशे एक्स् यांना म्हणतो; ' कृपा करून माझें सामान घेऊन या आणि तेवढी माझी पिवळी सूट—केस विसरूं नका.

" मुक्कामावर पोंहोचल्यावर आपण आपलें सामान घेण्यासाठीं जातों, तों सर्व नग मिळतात परंतु पिवळ्या सूट—केसचा पत्ता

नाहीं असें आपणास आढळून येतें. मॉशे एक्स् हे तिथें असतात आणि आपण त्यांच्या निष्काळजीपणाबद्दल त्यांना खूप टाकून बोलतों."

दुसऱ्या दिवशीं सकाळीं म्हणजे ८ ऑक्टोबर १९३८ रोजीं मादाम वाय् यांनीं आपलें स्वप्न मॉशे झेड् यांना सांगितलें आणि मॉशे झेड् हे हजर असतांनाच मॉशे एक्स् हेहि त्या ठिकाणीं प्राप्त झाले. मादाम वाय्च्या स्वप्नाची त्यांना कल्पनादेखील नव्हती. कारण, मॉशे झेड् व मादाम वाय यांचा संवाद त्यांनीं ऐकलादेखील नव्हता. आदल्या रात्रीं आपणाला एक वैशिष्ट्यपूर्ण स्वप्न पडलें. तें त्या दोघांना सांगावें म्हणून मॉशे एक्स म्हणाले, स्वप्नांत मी रेल्वे स्टेशनवर होतों आणि मादाम वाय् याचें सर्व सामान माझ्या ताब्यांत होतें. त्या सामानांतल्या पिवळ्या सूट–केसची त्यांनीं मला विशेष खबरदारी घ्यावयास सांगितली होती. मी तें सर्व सामान गाडींत मोठ्या कष्टानें चढविलें; पण कशी चूक झाली कुणास ठाऊक, ती पिवळी सूट–केस बेपत्ता झाली. सामान ताब्यांत घेण्यासाठीं मी जेव्हां रेल्वेच्या लोकांपाशीं गेलों, तेव्हां मादाम वाय् यासुद्धां त्या ठिकाणीं होत्याच. ती पिवळी सूट–केस नाहींशी झालेली पाहून माझ्या गैरवर्तणुकीबद्दल त्यांनीं मला खूप वाक्ताडन केलें !"

हा आपला अपूर्व अनुभव मग त्या दोघांनीहि स्वतःच्या व साक्षीदार झेड् यांच्या सहीनिशी न्यूयॉर्कच्या सायकिकल रिसर्च सोसायटीला कळविला. मादाम वाय्. यांच्या मालकीची खरोखर एक सूट–केस होती. परंतु मॉशे एक्स यांना ती कधीं पाहिल्याचें आठवत नव्हतें. ( दी पर्सनॅलिटी ऑफ मॅन; बाय जी. एन्. टायरेल पृष्ठें ९८।९९ )

वस्तुस्थितीचा कांहीं एक विचार न करतां असले प्रकार म्हणजे केवळ योगायोग होत, असें म्हणणाऱ्यांनीं वरील स्वप्नांतले सहा मुख्य मुद्दे लक्षांत ठेवण्याजोगे आहेत ( १ ) अनुभवणाऱ्या दोघांनाहि स्वप्नांतलें तें सामान मादाम वाय् यांचें असल्याची जाणीव होती (२) मॉशे एक्स् यांच्या ताब्यांत तें सामान देण्यांत आलें होतें ( ३ ) दोघांच्याहि स्वप्नांत खास निर्देश केला गेला तो पिपळ्या सूट केसचा ( ४ ) दोघेहि सामानाच्या गुदामाजवळच एकमेकांस भेटतात ( ५ ) दोघानाहि स्वप्नांत पिवळी सूट–केस तेवढीच गमाविल्याचें माहीत असतें आणि ( ७ ) मॉशे एक्स् हे दोघांच्या स्वप्नानुसार मादाम वायकडून शब्दांनीं ताडिले जातात. केवळ योयायोगांत एखादी गोष्ट जमेल, परंतु एवढ्या गोष्टी एकसमयावच्छेदेकरून जमणार नाहींत. फ्राइडचा अनुयायी वरील स्वप्नांचें पृथक्करण करतांना कदाचित् त्या पिवळ्या बॅगचा आणि लैंगिक प्रवृत्तीचा कुठें संबंध लागतो कीं काय तें पाहील ! शास्त्रज्ञांनादेखील प्रत्यक्ष दिसत असलेलें सत्य अजमावून भलतीकडे धांव घेण्याची संवय जडलेली आहे.

माणसांचे परस्पर संबंध निकट असले म्हणजे एकाच्या उत्कट इच्छेमुळें दुसऱ्याला स्वप्न पडतें. मानवी जीवनांत इच्छा ही एक मोठी प्रभावी शक्ति आहे. त्या शक्तीची यथार्थ कल्पना नसल्यामुळें धबधब्याच्या फुकट जाणाऱ्या पाण्याप्रमाणें कितीतरी चांगल्या माणसाच्या आयुष्यांत ही शक्ति वाया जात असते. स्वतःला पडलेल्या एका आश्चर्यजनक स्वप्नाची हकीकत राइट ऑनरेबल सर जॉन ड्रुमॉंड ( हे इंग्लंडच्या राजाचे मोरोक्को येथील मंत्री ) यांनीं नमूद करून ठेवली आहे. ते लिहितात.

" १८७९ सालीं माझा मुलगा रॉबर्ट हा मॉगोडोर येथें आपल्या कुटुंबासह राहात होता. ते फेब्रुवारी महिन्याचे दिवस होते. थोड्याच

दिवसांपूर्वी माझ्या मुलाच्या मंडळींच्या खुशालीचें वृत्त मला कळलें होतें. माझीसुद्धां प्रकृति त्या वेळीं उत्तम होती. एके रात्रीं मी गाढ झोपेंत असतां माझ्या सुनेचे, "रॉबर्ट आजारी आहे हें पपांना कळलं तर किती बरं होईल!" हे शब्द कानीं येऊन मी जागा झालों. उठून बसलों आणि कोण बोलत आहे तें पाहूं लागलों. त्या वेळीं घड्याळांत रात्रीचा एक वाजला होता. माझ्याजवळ कुणी नव्हतें. फक्त माझी पत्नी पलंगावर गाढ झोपली होती. सर्वत्र शांतता होती. मला जो आवाज आला, तो फक्त भास होता, अशी खात्री झाल्यावर ईश्वराचे आभार मानून मी झोंपी गेलों. मी डोळे मिटतों न मिटतों तोंच मला तो आवाज आणि ते शब्द पुन्हां ऐकूं आले आणि मग मात्र मी उठलों. पत्नीला जागे करून त्या खोलीला लागून असलेल्याच माझ्या अभ्यासाच्या खोलींत गेलों आणि घडलेला सर्व प्रकार रोजनिशींत लिहून काढला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझ्या मुलीला मी तें स्वप्न सांगितलें; आणि एकंदरींत स्वप्नावर माझा विश्वास नसतांनादेखील मॉगोडोरहून येणाऱ्या पत्राची आतुरतेनें वाट पाहात राहिलों. मी त्या वेळीं टँजिएर येथें राहात होतों. नकाशांत नजर टाकली तर कुणाच्याही लक्षांत येईल कीं, टँजिएर मॉगोडोरपासून सुमारें ३०० मैल अंतरावर आहे.

"तो प्रकार घडल्यानंतर थोड्याच दिवसांनीं मला माझ्या सुनेकडून पत्र आलें. त्यांत तिचा नवरा टायफॉईडनें आजारी असल्याचें लिहिलें होतें व ज्या रात्रीं तिचा आवाज मी स्वप्नांत ऐकला त्याच रात्रीं त्याला वात होऊन तो बडबड करीत असल्याचेंहि तिनें कळविलें होतें.

"तिला मी जें उत्तर पाठविलें, त्यांत मला त्याच रात्रीं पडलेल्या चमत्कृतिजनक स्वप्नाची हकीकत कळविली. तिनें पुन्हां माझ्या पत्राला प्रत्युत्तर देतांना लिहिलें होतें, "या परदेशांत त्या रात्रीं रॉबर्टची तशी भयंकर अवस्था पाहून मी फार भेदरून गेलें होतें आणि त्या परि-

स्थितींत तुम्ही जवळ असतां तर बरें झालें असतें अशा अर्थाचे शब्दहि माझ्या तोंडून पुटपुटले गेले होते. ( जर्नल एस्. पी. आर व्हॉल्यूम ५ वा, पृष्ठ ४०. )

जिवन्त माणसें भेटलीं किंवा बोललीं अथवा त्यांनीं कांहीं सांगितलें तर तें खरें कीं, खोटें हें ताडून पाहणें शक्य असतें. परंतु आपले मेलेले सगेसोयरे कितीतरी वेळां आपल्या स्वप्नांत दिसतात. केवळ त्यांची आठवण आल्यामुळें ते आपणांस दिसतात कीं त्यांची स्वप्नांतील भेट म्हणजे एक विचार करण्यासारखी बाब आहे; हा विषय स्वतंत्र आहे त्याचा पुढील प्रकरणांत विचार करूं.

## : ८ : स्वप्नांत भेटणारीं मृत माणसें

तसें पाहिलें तर हा विषय ज्याचा त्यानें अभ्यास करण्यासारखा आहे. आणि ज्या माणसांना स्वप्न पडण्याची संवय आहे त्यांनीं आपणाला पडणाऱ्या स्वप्नांचीं चिकित्सा केली तर त्यांना स्वतःच्या मनोव्यापारांचे यथार्थ ज्ञान होऊं शकेल. जशा प्रत्येक माणसाच्या आवडीनिवडी असतात त्याचप्रमाणें निरनिराळ्या व्यक्तींना पडणाऱ्या स्वप्नांचे वैचित्र्यही अपूर्व असते.

' स्वप्न ' या विषयाच्या विविध बाजू मागील एकेका स्वतंत्र प्रकरणांत हाताळल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणांत जे आपलें मेलेले आप्त राहून राहून किंवा कालांतरानें दिसतात त्या बाबत सत्य काय आहे तें पाहण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

जिवंत माणसांच्या उत्कट इच्छेंतून जसा स्वप्नाचा उद्भव होतो तसा मृताच्या राहून गेलेल्या जिवंतपणींच्या आशा वासनांतून त्याच्याविषयीं स्वप्नें पडण्याचें प्रकार घडतात. एका जिवंत माणसानें आपली इच्छा दुसऱ्या जिवंत माणसाला कळविणें जितकें सोपें आहे तितकें मृताला आपली इच्छा जिवंत माणसास कळविणें सोपें नाहीं. मृताला आपला संबंध जिवंत माणसांशीं घडवून आणण्याचें जे विविध प्रकार आहेत त्यांपैकीं स्वप्न हा एक सोपा मार्ग आहे. त्याचाच प्रामुख्यानें या लेखांत विचार करावयाचा आहे. स्वप्नांत जिवंत माणूस आपला जडदेह अंथरुणांत निद्रिस्त ठेवून सूक्ष्मदेहानें वावरून अनुभव घेत असतो आणि मृताच्या परलोकींचा देह व जिवंत माणसाचा सूक्ष्म देह यांचे द्रव्य एकच असल्यामुळें मृत आणि जिवंत माणसाची

भुवर्लोकीं पडलेली गांठ हवेंतून उडतांना एका वैमानिकानें दुसऱ्या वैमानिकाला खुण करावी किंवा समुद्रांत एका जहाजावरील माणसानें दुसऱ्या जहाजावरील माणसाशी हस्तांदोलन करावें तशा प्रकारची असते.

## अखेरच्या इच्छा

वास्तविक जो मनुष्य मेला त्याचा इहलोकाशीं संबंध तुटला; परंतु ज्या गांवांत आपण अनेक वर्षें राहिलों तें गांव जरी आपण सोडून दूर दुसऱ्या गांवीं गेलों तरी त्या पूर्वीच्या गांवांतले अनेक लागेबांधे व मित्रत्वाची ओढ जशी मधून मधून कांहीं वर्षें तरी त्या गांवांकडे आपणाला खेचीत असते तसाच प्रकार मृताच्या बाबतींत होतो.

स. १८९२ सालीं कुणा एका माणसाचा खून झाला. आपल्या देहाला सद्गति लाभावी व आपला खून करणाऱ्या माणसाला योग्य तें शासन व्हावें म्हणून त्या मृतानें संबळपूर लाइनीवर लांब असलेल्या आपल्या आईला स्वप्नांत भेटून असें सांगितलें कीं " तालुके कर्जत-पैकीं लोहझरे येथें खून झालेला असतां आपणांस मारून आपला मुडदा शिरण्याचें डोंगरांत ठेविला आहे." या स्वप्नांतील पुराव्या-वरूनच पुढें सर्व कृत्य उघडकीस आलें व कोर्टांत केस चालून गुन्हेगारास योग्य ती शिक्षा झाली. (साद्यंत हकीगत नेटीव्ह ओपि-नियन वर्तमान पत्राच्या १३-१०-१८९२ च्या अंकांत प्रसिद्ध झाली होती.)

दुसऱ्यानें आपणांस इजा केली. म्हणजे त्याचे पारिपत्य करावें असें सर्वसामान्य माणसाला वाटणें साहजिकच आहे. खून झालेल्या माण-साला खुनी माणसाबद्दल जबरदस्त द्वेष वाटत असला पाहिजे आणि म्हणूनच खुनी माणसाचा सूड उगविण्याबद्दल मृताच्या आपल्यापरी खटपटीं चालत असतील. त्या सर्वांच्याच खटपटीला यश येतें असें नाहीं. तें तसें झालें असतें तर जगांत अनेक अनर्थ झाले

असतें. परंतु जी कांहीं थोडीं माणसें मरणोत्तर आपल्या शत्रूचा सूड उगविण्याच्या बाबतींत यशस्वी झाली आहेत त्यांच्या हकीकती देशो-देशीच्या वाङ्मयांत उपलब्ध आहेत.

एक खुनी माणूस लंडन शहरीं गेला असतां माझा खून करून पळालेला अमुक मनुष्य हल्लीं अमुक नांव धारण करून अमुक एके ठिकाणीं आला आहे. ही बातमी तूं पोलीसला दे, असे एका म्हाता-रीच्या स्वप्नांत येऊन मृत माणसानें सांगितले. (साद्यंत माहिती केरळ कोकीळ मासिक पुस्तक अंक ५ वर्ष १८९१ ऑगष्ट यांत मिळेल.)

मूल लहान असततांना जर त्याची आई वारली तर परलोकी गेलेल्या त्या आईला इहलोकी राहिलेल्या त्या मुलाविषयीं फार काळजी वाटते आणि वात्सल्यामुळें प्रेरित होऊन ती माता कुणाच्या तरी स्वप्नांत येऊन आपल्या बाळाचें प्रेमानें संगोपन करण्याविषयीं सूचना देत असते. अनेक वर्षेंपर्यंत मोठ्या प्रेमानें संसार केलेल्या दांपत्यापैकीं म्हणजे मागे राहिलेल्या आपल्या जोडीदाराची किंवा सहचारिणीची कुणीतरी काळजी वहावी असें परलोकीं गेलेल्या व्यक्तीस वाटत असते आणि म्हणून ती व्यक्ती कुणाच्या तरी स्वप्नांत येऊन आपली उत्कंठा प्रकट करीत असते.

## मृत्यूनंतरची सूडबुद्धि

माझे एक स्नेही श्री. रामभाऊ हे १९२८ सालीं एका खुनाच्या खटल्यांत पंच होते. एका गरीब माणसाचा गोळी घालून खून केला होता. खून झालेल्या माणसाला रामभाऊंनीं पूर्वीं कधींहि पाहिलेलें नव्हतें. त्या खटल्यांत ते पंच नेमले गेल्यापासून रात्रीं अंथरुणावर पडल्यावर त्यांना रोज एक व्यक्ति त्याच्या तीन मुलांसह दिसूं लागली; साडेचार फूट उंचीचा, भक्कम बांध्याचा, लंगोटी नेसलेला व मळकट कुडते घातलेला तो माणूस होता. त्याच्या गळ्यांत लहानसें एक चाकूचें पातें

अडकविलेलें असे व त्याची ती लहान मुलें त्याच्याबरोबर असत. कोर्टांत खटला जसजसा रंगत चालला तसतशी त्या मृताविषयीं अधिकाधिक माहिती बाहेर येऊं लागली. ह्या माणसाच्या प्रेतावर सांपडलेलें तें गळ्यांतलें पातें व अंगांतलें कुडतें कोर्टांत दाखविण्यांत आलें. त्याचप्रमाणें मृताच्या पाठीमागें त्याचीं तीन मुलें उघडी पडलीं आहेत हाहि पुरावा कोर्टांत आला. तेव्हां रामभाऊंना आपणाला रोज दिसणारा माणूस तो दुसरा तिसरा कोणी नसून ज्याचा खून झाला तोच गणू पोशा असावा याबद्दल खात्री होऊन चुकली. आरोपी सूर्याजीराव मोठा श्रीमंत माणूस होता. व त्यानें आपली सुटका करून घेण्यासाठीं मोठा नामांकित व हुशार वकील दिला होता. 'सूर्याजीरावानें मज गरीबाचा खून केला. माझी ही पोरं पोरकी झालीं. सूर्याजीराव खुनी आहे असें तुम्ही कोर्टांत सांगा' हें शब्द जरी गणू पोशाच्या पिशाच्चाला कधीं उच्चारतां आले नाहींत तरी त्याच्या चेहेऱ्यावरचा हा आविर्भाव रामभाऊंनी बरोबर ओळखला होता.

एके दिवशीं रामभाऊंचा एक नातलग त्यांच्या घरीं आला व त्यांना तीनशें रुपये देऊ करून 'आरोपी दोषी नाहीं' असें तुम्हीं कोर्टांत सांगा म्हणून विनवूं लागला. रामभाऊंनीं त्या माणसास हाकून लावला. रामभाऊंना फितविण्याकरितां आणखी दुसऱ्या एका माणसाकडून प्रयत्न झाला; परंतु रामभाऊ फितूर झाले नाहींत.

खटल्याचा निकाल जसजसा जवळ येऊं लागला. तसतसा गणू पोशा आपल्या आर्जवीं चेहेऱ्यानें रामभाऊंस अधिकाधिक त्रास देऊं लागला. रामभाऊंना त्याची कींव येई. पण त्यांच्या हातीं काय होते? रामभाऊखेरीज सर्व पंचानीं तीनतीनशें रुपयांची लाच घेतली होतीच. याशिवाय जरूर त्या माणसाचे सूर्याजीरावच्या माणसांनीं ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणें भरे भरले होते.

अखेर सरकारी वकील व आरोपीचा वकील यांचीं भाषणें होऊन न्यायमूर्तींनीं पंचास तो खटला बाहेर आलेल्या पुराव्यानिशी समजाऊन सांगितला. विचार विनिमयासाठीं पंच एका खोलींत गेले. रामभाऊ खेरीज बाकीचे सर्वजण 'आरोपी निर्दोषी आहे.' असें सांगणार होते. रामभाऊना आपल्या बाजूला ओढण्यासाठीं त्यांनीं जवळ जवळ एक तास प्रयत्न केला, परंतु त्यांनीं सत्याग्रह सोडला नाहीं. शेवटीं पंचमंडळी बाहेर आली. न्यायमूर्तींनां "आपले सर्वांचे एकमत आहे काय ?" असा सरपंचास प्रश्न केला असतांना त्यानें "होय, आरोपी निर्दोषी आहे." म्हणून उत्तर दिलें. 'सरपंच खोटें बोलत आहेत. आरोपी दोषी आहे असें मला वाटतें' हे शब्द रामभाऊंच्या तोंडावर आले होते. परंतु त्या वेळचा तो कोर्टातला गलबला पाहून रामभाऊंच्या तोंडून शब्द उमटेनात शिवाय दोन बाजूंच्या दोन पंचानीं रामभाऊ उभे राहण्याचा प्रयत्न करीत असतांना त्यांना त्यांचा कोट धरून खालीं खेचून बसविलें आणि त्या खटल्यांत श्रीमंताच्या बाजूचें न्यायदान झालें !

बिचारा गणू पोशा आपला शत्रू गळफासांतून सुटला म्हणून तडफडला असेल, आपला खून करणाराला योग्य ती शिक्षा मिळावी म्हणून मृत माणसाची कशी धडपड चालते याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. गणू पोशा मारला गेला होता तेव्हां रामभाऊस जें दिसत होतें तें गणू पोशाचें पिशाच्च होतें पण त्याच्याबरोबरचे ते मुलगे तर जिवंत होते. अर्थात् त्या मुलांच्या आकृति म्हणजे पिशाच्चें नव्हतीं. मुलांवरील अत्यंतिक प्रेमामुळें गणू पोशाला त्यांचा सतत ध्यास लागून राहिला होता व त्यामुळें त्यांची विचार चित्रें सतत त्यांच्या भोंवतीं तरळत होतीं. रामभाऊंना जीं दिसत ती गणू पोशाच्या विचा-

होणारें बरेवाईट विचार नेहमीं त्याच्या भोंवतीं असें तरळत असतात. यावरून सद्विचार, सद्वासना व सद्भावना यांचे महत्व लक्षांत येईल.

प्रस्तुत विषयांशीं संबंध नसलेली परंतु जातां जातां सहज सांगण्यासारखी एक गोष्ट अशी कीं सुर्याजीराव दोषमुक्त होऊन सुटल्यानंतर लवकरच त्यांचा एक करता सवरता मुलगा त्याच्या दुसऱ्या मुलाकडून बंदुकीनें ठार मारला गेला. दोघेही भाऊ शिकारीला गेले असतांना चुकून चाप उडाला व भावाकडून भाऊ चुकीनें मारला गेला असा त्या प्रकरणीं पुरावा प्रस्थापित झाला होता. आर्थिक दृष्ट्या सूर्याजीरावाची परिस्थिते आजही उत्तम असली तरी संसारातल्या विविध अडचणींनी तो फार गांजलेला माणूस आहे आणि तीनतीशशें रुपयांची लांच घेणारे ते सर्व पंच अन्नाला मोताद झाले आहेत. रामभऊ मात्र आपल्या उतार वयांत आनंदांत आहेत.

## परलोकवासीयाकडून मदत

सुप्रसिद्ध इटालियन महाकवी डॅन्टे हा इसवि सन १३२१ सालीं खिस्तवासी झाल्यानंतर त्याच्या Paradiso या महाकाव्याचें सर्व खंड एकत्र करण्याचें काम त्याचें दोन मुलगे जॅकोपो आणि पिएत्रो यांनीं आपल्या अंगावर घेतलें. त्या काव्याचे तेरा खंड त्या दोघांना महाप्रयत्नांनींही सांपडले नाहींत. अशा रीतीने शोधतांशोधतां कित्येक महिने गेले आणि जॅकोपो यांस एके रात्रीं स्वप्न पडले. त्या स्वप्नांत आपला बाप त्यानें जवळ आलेला पाहिला. त्याच्या अंगावर शुभ्र वस्त्रें होतीं आणि त्याचा चेहेरा दिव्य तेंजानें उजळलेला होता. अशा प्रकारें बापाची स्वप्नांत भेट झाल्यावर ज्याचा चटका जॅकोपोच्या मनाला लागून राहिला होता ते पॅराडिसोकाव्याचे न सापडणारे खंड कुठें ठेवण्यात आले आहेत असें त्यानें आपल्या मृत पित्यास विचारिलें. नंतर सूक्ष्म देहधारी असा जो स्वप्नसृष्टींतील डॅन्टे त्यानें आपल्या

पुत्राचा हात धरून तो जिवन्तपणीं झोंपत असे त्या खोलींत त्याला नेलें आणि तेथील भिंतींतील एक विवक्षित जागा त्याला दाखविली. त्याच क्षणीं जॅकोपोच्या स्वप्नाचा शेवट झाला आणि जॅकोपो आपल्या बिछान्यावरून जागा होऊन उठला. आपण पाहिलेलें स्वप्न जवळच असलेल्या आपल्या एका मित्राला जागें करून त्यानें सांगितलें आणि ताबडतोब आपल्या बापानें दाखवून दिलेल्या त्या भिंतीपाशीं ते दोघेजण गेले. जी विवक्षित जागा त्यांच्या बापानें जॅकोपोला स्वप्नांत दाखविली होती त्या जागीं एक चटईचा पडदा लावण्यांत आला होता. तो पडदा हळूच उचलल्यानंतर त्यांना एक लहानशी खिडकी दिसली. ही खिडकी त्यांनीं पूर्वीं कधींही पाहिलेली नव्हती; किंवा त्या ठिकाणीं एखादी खिडकी असेल अशी कुणाला कल्पनाही नव्हती. त्या खिडकींत त्यांना डॅन्टेची कितीतरी हस्तलिखितें सांपडलीं. भिंतीच्या दमटपणामुळें त्या हस्तलिखितांची थोडीफार खराबी झाली होती आणि तीं जर आणखी कांहीं दिवस तिथेंच पडून राहातीं तर त्यांचीं अगदींच नासाडी होऊन गेली असती. त्यांवर पडलेली धूळ झाडून टाकल्यानंतर ज्या तेरा खंडांचा जॅकोपोनें इतके दिवस सतत शोध चालविला होता ते त्याच्या हातीं लागले. ( बोकेशिओकृत डँटेचें चरित्र )

## मरणोत्तर अस्तित्वाचा पुरावा

मिस आय. सोलास नांवाच्या एका तरुणीला १९३७ च्या मे महिन्यांत स्वप्न पडलें व ती हकीकत तिनें १४ जानेवारी १९३९ च्या पत्रांत न्युयॉर्क येथलि सायकिकल रिसर्च सोसायटीला कळविली. त्या तरुणीनें लिहिलें आहे--

" या स्वप्नांत माझे वडील एक पसाभर स्वयंटाक घेऊन माझ्या-पाशीं आले. त्यांच्या इच्छेप्रमाणें ते स्वयंटाक घेऊन मी काय करा-

वयाचें होतें तें मला समजेना. ते आपल्या खोलींत गेले आणि पुन्हां एक पसाभर स्वयंटाक घेऊन आले व उत्सुकतेनें मला म्हणाले, ' हे त्याच पत्त्यावर पाठव ' मी जागी झाल्यावर विचार करूं लागले त्यावेळीं मला असें आठवलें कीं, मरणापूर्वी त्यांनीं रुपेरी कागदांत बांधलेलें एक पुडकें माझ्या हातीं दिलें होतें व त्या वेळीं ते म्हणाले होते, ' यांत चांगले चांगले स्वयंटाक आहेत. तूं ते माझ्यासाठीं इस्पितळांत नेशील काय ? ' मी त्यांना विचारलें होतें इस्पितळाचा पत्ता काय ? ते म्हणाले होते मला जर पत्ता माहीत असता तर तें पुडकें मीच नेलें नसतें कां ? २० ऑक्टोबर १९३६ रोजीं माझ्या वडिलांचें देहावसान झालें होतें. म्हणजे त्यांच्या मृत्यूनंतर सुमारे सात महिन्यांनीं मला तें स्वप्न पडलें. सकाळीं उठल्यानंतर मी वडिलांच्या खोलींत जाऊन तपास केला तेव्हां ' जुनें स्वयंटाक ' अशी पट्टिका मारलेली एक पेटी मला तिथें आढळली आणि त्यांत खरोखरीच एक पसाभर स्वयंटाक होते. स्वप्नांत अनुभविलेल्या वस्तुस्थितीचा अशा रीतीनें प्रत्यक्षांत मेळ जमल्यावर मला थोडी मौज वाटली. नंतर त्या खोलीच्या दुसऱ्या एका निजा-वयाच्या भागांत तशीच एक पटिका लावलेली मला आढळली आणि तिच्यांतही एक पसाभरून स्वयंटाक होते आणि ते मी स्वप्नांत वडिलांच्या हातीं पाहिलेल्या टाकांसारखे होते. मी माझ्या एका मैत्रि-णीला ' जुनें स्वयंटाक ' विकत घेऊन किंवा गोळा करून गरजूंना वाटणारी एखादी संस्था तुला माहीत आहे काय ' असें विचारलें तेव्हां तिनें कांहीं दिवसांपूर्वीं स्वयंटाकाची मागणी करणारी एक जाहिरात वाचल्याचें सांगितलें.

" मरणापूर्वीं कांहीं महत्त्वाचे कागद लपवून ठेऊन त्यांच्या अस्तित्वाचा मरणोत्तर अस्तित्व सिद्ध करण्यासाठीं प्रयोग केल्याचे माझ्या वडिलांनीं ऐकलें होतें व आपणही अशाच प्रकारचा परंतु अधिक साधा

असा एखादा प्रयोग करूं असें ते जिवन्तपणीं म्हणत असत. मला वाटतें मरणोत्तर अस्तित्वाची साक्ष देण्याकरिताच त्यांनीं हा स्वयं-टाकांचा प्रयोग केला असावा."

मिस् सोलास हिनें आपल्या वडिलांना त्यांच्या अभ्यासाच्या खोलीं तून दुसऱ्यांदा स्वयंटाक आणण्यासाठीं झोंपावयाच्या खोलींत जातांना पाहिलें होतें. पहिली पेटी तिला अभ्यासाच्या खोलींत आडळली होती व दुसरी निजावयाच्या खोलींत टेबलाच्या मागच्या बाजूस होती. मिस् सोलास हिचें म्हणणें असें कीं वडिलांच्या अभ्यासाज्या खोलींतील ती प्रथम सांपडलेली पेटी तिनें पूर्वीं कधींतरी कदाचित पाहिलेलीहि असेल. तिच्यांत काय आहे हें मात्र तिनें पाहिलें नव्हतें, परंतु दुसऱ्या पेटीचा शोध मात्र स्वप्न पडल्यानंतर लागला.

( G. N. M. Tyrell कृत Personality of man पृष्ट १९१–१९२ ).

वरील वृत्तांतावरून मरणोत्तर माणसाची स्मृति कायम असते असें म्हणावें लागतें,

स्वप्नांत मृताकडून कांहीं माणसांना संदेश व मदत मिळाल्याच्या कांहीं हकीकती प्रसिद्ध झाल्या आहेत. न्यूयॉर्क येथील Herald of Health पत्राचे संपादक मिस्टर एम्. एल हॉलब्रूक एम्. डी यांनीं अशा तऱ्हेचा आपला एक अनुभव सांगितला आहे. तें म्हणतात–

" १८७० सालच्या उन्हाळ्यांत मला खोकल्याचा तीव्र विकार झाला. बहुतेक दरवर्षी थंडीत व उन्हाळ्यांत खेकल्याची माझ्यावर धाड पडायची परंतु या वेळच्या माझ्या खोकल्याची उमळ इतकी जोराची होती कीं या खोकल्यानें माझा अंत होणार अशी जवळ जवळ माझी खात्री पटली त्यावेळीं मी तरुण होतों आणि आयुष्यांतला माझा आवडता उद्योग मी हातीं घेतला होता. अशा वेळीं आपला अंत

होणार म्हणून मला अतिशय खेद वाटत होता. अशा दुःखमय मनस्थितींत एकदां मी झोंपलों असतांना, माझी वीस वर्षांपूर्वीं मृत झालेली बहीण-कीं जिला मी जवळजवळ विसरून गेलों होतों ती माझ्या बिछान्यापाशीं येऊन म्हणाली, "तुझ्या प्रकृतीविषयीं मला घाबरण्याचें कांहींच कारण नाहीं. आम्ही तुला बरें करण्याकरितां आलों आहोंत कारण तुला जगांत अजून पुष्कळ कामें करावयाचीं आहेत." इतकें बोलून ती जशी एकाएकी आली तशी अदृश्य झाली आणि नंतर माझ्या डोक्याला जसा एखादा विजेचा झटका बसावा तसा एकदम झटका बसला. तो झटका दुःखदायक नव्हता. डोक्यांतून तो झटका उतरत उतरत खालीं माझ्या छातींत आला; व त्यामुळें मी जागा होऊन पाहातों तो आपल्याला बरें वाटत आहे अशी जाणीव माझ्या ठिकाणीं निर्माण झाली. आणि खरोखरींच त्या स्वप्नसृष्टींतील झटक्यानें मी बरा झालों होतों. त्यानंतर पुढें कधींहि मला खोकला झाला नाहीं.' ( Proceedings S.P.R. Vol. III पृष्ठ ३७४ )

आपल्या मृत आप्ताकडून माणसाला स्वप्नद्वारा कसें संदेश मिळूं शकतात याचें दुसरें एक उदाहरण दुर्गाबाई जोशी जी. ए. ( 'विधिमंडळाच्या सभासद ) यांच्या स्वप्नसाक्षात्कर या पुस्तकांत मला आढळलें. दुर्गाबाई लिहितात—

"माझी आई स्वर्गवासी होऊन सुमारें वीस दिवस झाले असतील ....मला एक सीता नांवाची दीड वर्षांची लहान बहीण होती .... तिची सर्व व्यवस्था ठेवण्याकरितां हरी नांवाचा एक गडी ठेवला होता; कारण आई आजारी होती. आई आपल्या देखरेखीखालीं हरीकडून सीतेचे दूध तापवून आपल्या समोर तिला ते पाजण्यास लावी."

"सुमारें चाराचा सुमार असेल मी गाढ झोपेंत होते. माझी आई आली व मला ओणव्यानें हलऊन तिनें उठविलें. तो सुखस्पर्श आई-

चाच आहे हें मी ओळखलें. मी आश्चर्यानें उद्गारलें " ताई " ( मी माझ्या आईला ताई म्हणत असे ) मी पूर्ण जागी झालेली पाहून ती म्हणाली, " दुर्गे आधीं ऊठ आणि तुझ्या आजीला विचार कीं सीतेचें दूध तर त्यांनीं तोडलें नाहीं ना ? "

" इतकें शब्द बोलून आई जाण्याच्या इराद्यानें ओणव्याची उभी झालेली दिसली.

" तें पाहून थोडी घाबरूनच मी उठलें. व म्हणालें, " ताई तू कशी ग आलीस ? " सर्वांनीं मला सांगितलें कीं तूं देवाकडे दूर दूर गेली आहेस व पुन्हां कधीं, येणार नाहींस.

" आई म्हणाली, ' तें खरें पण असें कधीं कधीं येतां येतें. पण ' मी सांगितलें तें तूं आधीं आजीला विचार पाहूं ' इतकें बोलून ती झपाझप पावलें उचलून क्षणांत दरवाजाबाहेर गेली."

" ती जाऊं लागलेली पहातांच मी ' आतां पुन्हां जाऊं नको ग ताई ' म्हणून खूप मोठ्यानें ओरडत उठलें—झोंपेंत मी भ्यालें असेन अशा समजुतीनें मला निजविण्याचा प्रयत्न वडिल करूं लागले."

वरील सर्व हकीकती वाचून कुणी आपला असा समज करून घेऊं नये कीं कुणीही मेलेला माणूस स्वप्नात दिसला किंवा त्यानें कांहीं सांगितलें कीं तें सर्व खरेंच. आपल्या मृत आप्तांचें किंवा मित्रांचें काल्पनिक चित्र आपल्या अंतःकरणांतील उत्कट इच्छेमुळें स्वप्नसृष्टींत आपल्या डोळ्यांपुढें तरळूं लागतें व आपल्या मनोवांछिताप्रमाणें तें बोलूंही लागते. खरे खोटें, आभास आणि सत्य बरोबर ओळखण्याची कला त्याला ज्याला अवगत नाहीं तो माणूस व्यवहारांत कसा आणि केव्हां फसला जाईल तें त्याचें त्याला कळणार नाहीं.

' स्वप्न ' या विषयाचा मनापासून विचार करणाऱ्या माणसाला मला आणखी एक गोष्ट स्पष्टपणें सांगाविशीं वाटतें कीं एकाद्या मृत

आप्ताने स्वप्नांत कांहींही सांगितलें व तें आपल्याला पटण्याजोगें नसलें तर त्याप्रमाणें वागलेंच पाहिजे असें नाहीं. मेल्यानंतर माणूस एकदम देव होतो या कल्पना भ्रामक आहेत. माझ्या एका मित्राला त्याच्या मृत आईनें स्वप्नांत येऊन सांगितलें होतें कीं, ' तूं अमुक मुलीशीं लग्न कर.' त्या माझ्या मित्रानें त्याची आई जिवंत असतांना तिला शतशः धुडकावून लावलें होतें परंतु तीच मेल्यानंतर तिचा शब्द त्याला ग्राह्य वाटूं लागला होता. मी माझ्या त्या मित्राला त्या वेळीं असें सांगितलें होतें कीं, " बाबारे, तुझी मेलेली आई तुला वाटेल ते सांगो, ती मुलगी तुला जर आवडत नसली तर तिच्याशीं लग्न करून एका मृताच्या सांगण्यावरून दुसऱ्या जिवंत जीवाच्या सुखांत माती कां कालवतोस ! "

भावनाप्रधान आणि श्रद्धाळू मनाला भलभलते अनुभव वेडावून सोडतात. ' स्वप्न ' म्हणजे निद्रिस्ताचा अनुभव. त्या अनुभवांतले सत्य प्रतीत होण्यासाठीं तो अनुभव घेणाऱ्याचें मन स्वच्छ असलें पाहिजे. पूर्वग्रहदूषिततेपासून तें अलिप्त असलें पाहिजे. म्हणजेच त्या निद्रेंतील जागृतींत त्याला शास्त्रीय सत्याचा प्रत्यय येईल.

## : ९ : दिवास्वप्न

कधीं कधीं माणूस डोळे उघडे असून स्वप्नांत जसें कांहीं पहावें तसें पाहातो आणि मग आपण स्वप्नांत आहोंत कीं जागे आहोंत याची त्याला भ्रांत पडते. याचें एक उदाहरण १८७० च्या ऑक्टोबरांत 'रॅाबर्ट लोबे' नांवाच्या बोटीवर घडलें.

या बोटीवरील मिस्टर पीअर्स नांवाचा एक इंजीनिअर फार आजारी होता व त्या आजारांत मिस्टर डी. ब्राऊन नांवाचा त्याचा मित्र त्याची सेवाचाकरी करीत होता. ब्राऊन साहेबाला पीअर्सच्या मृत्यूच्या एक दिवस अगोदर जो विचित्र अनुभव आला तो त्यानें नमूद करून ठेवला आहे.

" पीअर्सच्या बिछान्याच्या एका बाजूला मी उभा होतो. त्याला वात झाला होता. तो बडबड करीत उठूं पाहात होता आणि मी त्याला उठूं देत नव्हतो. अशा वेळीं त्या बिछान्याच्या दुसऱ्या बाजूला पीअर्सची पत्नी दोन मुलें आणि आई मला दिसली. त्या सर्वांचे चेहरे खिन्न दिसत होते. त्या आकृती अगदीं हुबेहुब माणसासारख्या होत्या. पिशाच्याप्रमाणें त्या पारदर्शक नव्हत्या परंतु नेहमीपेक्षां त्या व्यक्ती फिक्कट दिसल्या. पीअर्सची आई मला ऐकूं येण्याइतक्या आवाजांत म्हणाली, ' गुरुवारीं बारा वाजतां त्याला खोल पाण्यांत गाडण्यांत येईल ' दोन दिवस अगोदरच पीअर्सची शुद्धी गेल्यामुळें पीअर्स त्या त्याच्या मंडळींना पाहूं शकला नाहीं. ती माणसें फार थोडा वेळ दिसून एकदम अदृश्य झाली. त्या प्रकारानें कावरा बावरा होऊन मी खोलीबाहेर झटकलों आणि पीअर्स जिवन्त असेपर्यंत पुन्हां त्या

खोलींत शिरण्याची माझी छाती झाली नाहीं. त्याच्या आईच्या सांगण्याप्रमाणें तो गुरुवारीं न मरतां मंगळवारीं मेला आणि त्याला बाराच्या-ऐवजीं चार वाचतां पुरण्यांत आले. असला चमत्कार मी माझ्या ह्यातींत कधीं अनुभविला नव्हता. ” ( Proceedings S. P. R. Vol X Pape 75 )

ब्राऊन साहेबाला पीअर्सच्या घरचीं माणसें ज्या क्षणीं दिसलीं त्या क्षणीं त्या मंडळींच्याही मनांत आपल्या माणसाला मरण्यापूर्वीं पाहण्याची अतीवोत्कंठा सामुदायिकरित्या उत्पन्न झाली असली पाहिजे आणि त्या वेळीं तीं माणसें जरी आपल्या घरीं जागीं असलीं तरी त्यांच्या बाह्य मनाला क्षणभर सुप्तता येऊन अंतर्मनानें तीं बोटीवर येऊन गेलीं असलीं पाहिजेत. विचारांच्या उद्दामतेमुळें त्यांच्या आकृति क्षणभर जडत्व पावू शकल्या. ब्राऊनला पिअर्सच्या आईच्या तोंडून ऐकूं आलेले वाक्य कदाचित् त्याचा स्वतःचा भ्रमही असावा. त्या वाक्यानें पीअर्सचें भविष्य सुचविलें होतें; परंतु तें तंतोतंत बरोबर ठरलें नाहीं. पीअर्सच्या आईच्या मनाला तो आतां नक्की मरणार अशी खात्री असल्यामुळें तिच्या तोंडून उच्चारलेलें तें वाक्य म्हणजे तिच्या मनांतील विचारांचा आविष्कार असूं शकेल.

सृष्टीमध्यें कुठेंतरी कांहींतरी सारखें घडतच असतें. त्या घडलेल्या गोष्टी कर्णोपकर्णीं आपल्या कानीं येतात, वर्तमानपत्रांत वाचावयास मिळतात. चित्रपटद्वारा पहावयास मिळतात. शेंकडों मैलांवर घडलेल्या गोष्टी चर्मचक्षुंना प्रप्यक्ष पाहतां येत नाहींत; परंतु त्या माणसांना दाखविण्याची निसर्गाची एक अपूर्व योजना दिसते. एका बाईनें आपला अनुभव सांगितला आहे—

“ फिसोल येथें मी माझ्या लहान मुलांना रात्रीं जेवावयास वाढीत होते. तीं मुलें जेवावयास बसलीं होतीं आणि मी उभ्या उभ्या त्यांना

वाढीत होतें. मी सहज समोरच्या भिंतीकडे पाहिले तों काय चमत्कार ती भिंत उघडली गेली असें मला वाटलें. आणि माझी आई तिच्या लहानशा घरांतील बिछान्यावर मृत होऊन पडलेली मला दिसली. तिच्या छातीवर आणि बाजूला थोडीशीं फुलें होतीं. तिचा मृत चेहरा अगदीं शांत दिसत होता आणि तिच्या प्रेतासाठीं आणलेलीं पेटीही जवळच होती. हें दृश्य इतकें स्पष्ट होते कीं माझ्यासमोर विटांची खरीखुरी भिंत होती याचा मला विसर पडला." त्या बाईला नंतर कळून आलें कीं तिची आई सहा दिवसांपूर्वी इंग्लंड देशांत ख्रिस्तवासी झाली होती. ( Myers Memorial Lecture VII by G. N. M Tyrrell पृष्ठ ३३ ).

आपल्या आईच्या मृत्युच्या वेळीं ती बाई आपल्या आईपाशीं नव्हती. ते दु:खद वृत्तही तिला पांचसहा दिवसपर्यंत समजले नव्हते. वृत्त कळविण्याच्या विद्यमान पार्थिव साधनाहून भिन्न तऱ्हेनें घडलेला प्रकार तिच्या अंतरात्म्यानें तिला जशाच्या तसा दाखविला होता.

बंद दाराच्या फटींतून एखादाच किरण आंत यावा तद्वत् सामान्य माणसाला पूर्णपणें अगम्य अशा त्याच्या भवितव्याची अस्पष्ट जाणीव कधीं होत असते. माणसाची जाणीव जितकी प्रगल्भ असेल त्या मानानें असल्या संदेशांचा त्याला उपयोग करून घेतां येतो. जॉन व्हॅन मेनन यांचा भवितव्यसूचक अशा दिवास्वप्नाचा खालील एक नमुना पहा :—

### दिवास्वप्नाचा वैशिष्ट्यपूर्ण नमुना

"मी सकाळीं पोषाख करीत असतांना मला माझ्या दृष्टीसमोर समुद्र किनाऱ्यावर एक लहान आकृति दिसली. त्या वस्त्रहीन आकृतीकडे मी बराच वेळ टक लावून पहात होतों—माझ्या मनश्चक्षूनें किंवा कशानें तरी म्हणा ती आकृति मी पहात होतों. वस्तुस्थितींत जवळपास किनारा नव्हता कीं एखादें चित्रहि नव्हतें; तरी मला ती आकृति

आणि तो किनारा दिसत होता. ती लहान चमकणारी आकृति सुमारे एक किंवा दोन इंच उंच असावी, कारण ती खिडकीच्या तावदानांतून मला दिसत होती. ती आकृति म्हणजे मी होतों. त्या आकृतीकडे मी पहात असतां मला असें नक्की वाटत होतें कीं, त्या व्यक्तीला कांहीं तरी करावयाचें होतें; परंतु ती व्यक्ती उगीचच वेळ घालवीत होती. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, तो आकार धारण करणारा पुरुष नुसतीच वाट पहात कांहीं एक न करतां वेळ फुकट दवडीत होता. मला हें नक्की दिसत होतें कीं कांहीं तरी काम त्याच्यावर सोपविण्यांत आलें होतें. पण तो कांहींच करीत नव्हता, बऱ्याच काळानें त्यानें कांहीं तरी विचार केला आणि जोराची उडी घेऊन दिवाळींत दारूची चिडी जशी उंच एकदम उडते त्याप्रमाणें तो उंच उडाला आणि तुटलेल्या ताऱ्यांच्या पाठीमागें कांहीं वेळ जशीं एक चकचकीत पट्टी दिसते तशी पट्टी दिसली, आणि उंच आकाशांत डौलानें वळण घेऊन तो अदृश्य झाला. ''

या स्वप्नाचा अर्थ व्हॅन मेनन साहेबांनां जसें तें स्वप्न एकाएकीं दिसलें त्याप्रमाणेंच एकाएकी प्रतीत झाला. ते लिहितात--

" मी बराच काळ--कदाचित् तो कित्येक जन्मांचाहि असेल--निव्वळ फुकट घालविणार आहें; परंतू असा वेळ फुकट घालविला तरी मी साधु पुरुष ज्या मार्गानें गेले त्या मार्गावर येईन आणि मग माझी प्रगति फारच झपाट्यानें होईल ( ' Some Ocooult Experiences पृष्ठें १५-१६ ).

## : १० : प्रतीकात्मक स्वप्नें

कित्येक स्वप्नांतलीं भाषा प्रतीकात्मक असतें; आणि तद्वारा माणसाला भवितव्याचा संदेश मिळतो म्हणजे असें कीं, एखाद्या बाईला वैधव्य प्राप्त व्हावयाचें असेल तर तिला स्वप्नांत आपला नवरा मेलेला दिसत नाहीं; तर आपल्या कपाळावरील कुंकू सापानें चाटल्याचें ती पाहतें. किंवा आपली सौभाग्यद्रव्याची पेटी कुणी तरी चोरून नेल्याचें तिला स्वप्नांत दिसतें. अशा तऱ्हेची स्वप्नें अर्थात हिंदू संस्कृतींत वाढलेल्या बाईला पडतील. ख्रिश्चन पार्शी मुसलमानांना त्यांच्या त्यांच्या संस्कृतीला धरून असलेल्या प्रतीकात्मक भाषेंत स्वप्नांतील संदेश मिळतात.

माझ्या एका मुसलमान मित्राला एकदां असें स्वप्न पडलें कीं, तो एका काळोख्या रात्रीं एका हिंदू प्रेतांबरोबर चालला होता. प्रेत अगदीं काळोखांत एकाकी रस्त्यावरून चार माणसांच्या खांद्यावरून वाहिलें जात होतें. स्मशानांत त्या प्रेतास भडाग्नी देण्यांत आला. प्रेताबरोबरच्या माणसांनीं कुट्ट काळोखानंतर पहिला उजेड पाहिला तो तोच. तो उजेड पाहताच माझ्या त्या मुसलमान मित्राला जरा बरें वाटलें आणि तों स्मशानांतून बाहेर पडला तो लखलखीत दिव्यांच्या झगमगाटांत ताबुताची मिरवणूक चालली होती त्या मिरवणुकींत तो सामील झाला. आणि नाचणाऱ्या इतर लोकांबरोबर नाचतां नाचतां जागा झाला.

" तूं सध्या अज्ञानांधकारांतून चालला आहेस, त्या अज्ञानाचा नाश करून ते अज्ञान तूं निःशेष जाळून टाकलेंस म्हणजे ज्ञानाच्या चकचकीत प्रकाशांत येऊन तूं आनंदानं नाचूं लागशील. " अशा

तऱ्हेचा संदेश त्या माझ्या दोस्ताला त्याच्या आत्मराजानें दिला होता. स्वप्नांतील प्रतीकात्मक भाषा कशी असते यासंबंधीं पवित्र जुन्या करारातील दोनतीन उदाहरणें या ठिकाणीं उद्धृत करतों.

एकदां असें घडलें कीं, इजिप्तच्या फारो राजाच्या भटारखान्यांतील वाढपी आणि आचारी या दोघांवर राजाची इतराजी होऊन त्यांना तरुंगांत टाकण्यांत आलें. एके रात्रीं त्या दोघांनींही एक एक स्वप्न पाहिलें. त्या वेळीं ज्यू लोकांचा एक ज्ञानी तरुण जोसेफ हा फारोच्या कैदेंत होता. त्यानें दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या वाढप्याला व आचाऱ्याला खिन्न मन स्थितींत पाहून त्यांच्या खिन्नतेचें कारण विचारलें. तेव्हां त्यांनीं आपापलीं स्वप्नें जोसेफला निवेदन केलीं.

प्रथम वाढपी म्हणाला, " मी काल रात्रीं स्वप्नांत एक द्राक्षाची वेल पाहिली आणि तिला तीन फांद्या होत्या. पाहातां पाहतां ती वेल मोहोरली, तिला द्राक्षें लागलीं आणि तीं पिकून तयार झालीं. राजाचा प्याला माझ्या हातांत होता त्या प्याल्यांत मी त्या द्राक्षांचा रस पिळून प्याला महाराजांच्या हातीं दिला."

मग जोसेफनें त्या स्वप्नाचा अर्थ उकलून सांगितला—" त्या तीन फांद्या म्हणजे तीन दिवस. आणखी तीन दिवसांनीं तुझी या कारावासांतून सुटका होईल. आणि पूर्वीप्रमाणें तूं आपल्या वैभवशाली राजाच्या हातांत मद्याचा प्याला देशील ! "

नंतर आचाऱ्यानें आपलें स्वप्न जोसेफला सांगितलें. तो म्हणाला, " मी स्वप्नांत असें पाहिलें कीं, माझ्या डोक्यांवर तीन टोपल्या होत्या सर्वांत वरच्या टोपलींत राजासाठीं मी मांसखंड भरून चालविलें होते आणि माझ्या डोक्यावरच्या त्या टोपलीवर झडप घालून पक्षी तें मांस खात होते. "

तेव्हां जोसेफनें त्या स्वप्नाचा अर्थ विशद करून सांगितला—

" त्या तीन टोपल्या म्हणजे तीन दिवस. आजपासून बरोबर तीन दिवसांनीं फारो राजा तुझें डोकें धडापासून वेगळें करील आणि पक्षी तुझ्या प्रेताचे लचके तोडतील."

जोसेफने जसें सांगितलें तसें तीन दिवसांनी घडलें ! ( जुना करार – उत्पत्ति – प्रकरण ४० )

*　　*　　*

त्यानंतर दोन वर्षांनीं फारो राजाला एक स्वप्न पडलें.

राजा नदीच्या काठावर उभा होता आणि त्या नदींतून सात लठ्ठ गाई वर आल्या आणि त्या किनाऱ्यावरील कुरणांत चरू लागल्या. त्यानंतर आणखी थोड्या वेळाने दुसऱ्या सात रोड गाई त्याच नदींतून वर आल्या आणि त्या प्रत्येक रोड गाईने पूर्वीची एकेक लठ्ठ गाय खाऊन टाकली. तो प्रकार पाहून राजा जागा झाला; परंतु घडलेला प्रकार खरा नसून तें फक्त स्वप्नच आहे अशी खात्री झाल्यावर तो पुन्हा स्वस्थ झोपी गेला. तेव्हा पुन्हा त्याला स्वप्न पडलें –

त्याने एक शेत पाहिलें. त्या शेतांत सात भरघोस कणसें होती. लगेच त्या भरघोस कणसांच्या शेजारीं सात पोंची कणसें त्याला दिसलीं. मग पूर्वेकडून सोसाट्याचा वारा आला आणि त्या सात पोच्या कणसांनी तीं सात भरघोस कणसें खाऊन टाकली ! तो चमत्कार पाहून फारो राजा जागा झाला आणि मग त्याच्या लक्षांत आलें कीं त्यानें जें पाहिलें तें स्वप्न होतें.

त्या दोन स्वप्नांमुळें फारो अत्यंत अस्वस्थ झाला. आपल्या राज्यांतील सर्व शहाण्या लोकांना बोलावून त्यानें त्या स्वप्नाचा अर्थ विचारला; परंतु कोणालाहि कांहीं सांगतां आले नाहीं. मग राजाच्या बाटप्याने आपण कारावासांत असतांना जोसेफने आपणाला पडलेल्या स्वप्नांचा अर्थ कसा उकलून सांगितला व तो कसा बरोबर होता

त्याची हकीकत सांगितली. तेव्हा राजानें जोसेफला बोलावून आपल्या स्वप्नाचें स्पष्टीकरण विचारलें. तेव्हां जोसेफ म्हणाला. " सरकार, आपण पाहिलेल्या दोन्ही स्वप्नांचा अर्थ एकच आहे. त्या सात लठ्ठ गाई आणि तीं सात भरघोस कणसे म्हणजे सात वर्षे. त्या सात वर्षांत आपल्या राज्यांत सुकाळाचें पीक येईल आणि आपल्या राज्यांतील गाई आपण स्वप्नांत पाहिल्या तशा लठ्ठ दिसतील; परतु त्या सात लठ्ठ गाईंच्या आणि भरघोस कणसांच्या पाठोपाठ आपणाला ज्या रोड गाई आणि पोची कणसें दिसलीं तीं सात भरभराटीच्या वर्षांनंतर येणाऱ्या सात दुष्काळाच्या वर्षांची निदर्शक आहेत. महाराज, ईश्वरानें आपल्या स्वप्नांत आपणांस भवितव्याची जाणीव करून दिली आहे. तेव्हां त्याचा पूर्णपणें बोध घेऊन प्रथम येणाऱ्या सात भरभराटीच्या वर्षांत पुढें येणाऱ्या सात दुष्काळी वर्षांकरितां साठा करून ठेवावा. "

वाचकांच्या लक्षांत येईल कीं, उपरिनिर्दिष्ट स्वप्नांची भाषा प्रतीकात्मक असून त्यांत कांहीं अतिशयोक्ति असेल असें वाटत नाहीं. अशा प्रकारें भविष्य सूचविणारी किती तरी स्वप्नें सामान्य माणसांना आजकालहि पडत असतात; परंतु त्याकडे कुणी फारसें लक्ष देत नाहीं इतकेंच.

फ्रॉयडनें म्हटलें आहे कीं, भविष्य सुचविणारें स्वप्न माणसाला कधींच पडणें शक्य नाहीं. माणसाला पडणारीं सारीं स्वप्नें गतानुभवविषयकच असतात. फ्रॉयडच्या या म्हणण्याला कांहींएक किंमत नाहीं. मोठ्या माणसाचे तें एक दुराग्रहाचें विधान आहे. माणसाला स्वप्नांत भवितव्यदर्शन घडतें त्याचीं अनेक उदाहरणें आहेत.

## सांकेतिक दर्शन

ठाणें येथील पोस्ट ऑफिसांत सध्या काम करणारे माझे मित्र

श्री. देगांवकर यांस एकदां असें स्वप्न पडलें कीं, ते आपला एक मुलगा व पत्नी यांसमवेत कुठून तरी चालले होते. जातां जातां वाटेंत त्यांना एक नदी दिसली. तेव्हां श्री. देगांवकरांच्या चिरंजीवानें आपल्या आईस विचारलें, " मी या नदींत उडी मारूं का ? " मुलाचें तसें विचारणें त्याच्या निधड्या आणि अचपळ स्वभावास अनुसरून होतें. आईनें त्या मुलाला " उडी मार " अशी परवानगी दिली व तत्क्षणीं त्या बेडर वृत्तीच्या मुलानें त्या नदीच्या प्रवाहांत उडी मारली. तें पाहून श्री. देगांवकर भांबावून आपल्या पत्नीस म्हणाले, " तूं हें काय केलेंस ! "

मुलगा नदीच्या पात्रांत बुडत असलेला त्यांना दिसला. त्याचें डोकें दिसत नव्हतें. मात्र जगण्याच्या धडपडीनें त्यानें दोन हात वर केले होते. श्री. देगांवकर यांनीं आपल्या मुलाचे दोन हात धरून त्याला वर काढण्याचा प्रयत्न केला परंतु ते हात त्यांच्या हातून सुटून मुलास जलसमाधि मिळाली. आपला सशक्त आणि आनंदी मुलगा असा एकाएकी मृत्यूच्या जबड्यांत गेलेला पाहून श्री. देगांवकरांचें अंतःकरण दुःखानें अतिशय भारावलें आणि त्या दुःखमग्न स्थितींतच ते स्वप्नांतून जागे झाले. त्यांनीं दिवा लावून पाहिलें तों त्यांचा मुलगा त्यांच्या जवळच गाढ झोंपला होता. तेव्हां स्वप्नांतील दृश्यामुळें झालेलें त्यांचें दुःख नाहींसें होऊन ते सुखानें झोंपीं गेले.

श्री. देगांवकर यांस आपल्या बुडणाऱ्या मुलाचें डोकें दिसत नव्हतें व त्यानें दोन हात वर केले होते या प्रकाराची अगदीं स्पष्ट जाणीव होती. या स्वप्नांत श्री. देगांवकर यांस, " तुझा मुलगा दोन महिन्यांनीं मरणार आहे व त्याला डोक्याचा कोणता तरी विकार होऊन मरणार आहे " असा संदेश मिळाला होता. हें स्वप्न पुढें कसें सत्य ठरलें तें पहा.

तें स्वप्न पडल्यानंतर सुमारे दोन महिन्यांनीं श्री. देगांवकरांचा मुलगा मेनेंजाइटिसच्या विकारानें आजारी पडला. मुलगा आजारी पडतांच त्यांना प्रथम त्या स्वप्नाची आठवण झाली व हा आपल्या हातून जाणार याची त्यांना खात्री पटली. मात्र त्या मुलाला बरा करण्यासाठीं त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले व शेवटीं तो मुलगा हातचा गेलाच. श्री. देगांवकर असें सांगतात कीं, त्या मुलाला प्रथम थोडा डोकें खीचा आजार उत्पन्न झाला व तो त्याच वेळीं कोणत्या तरी परीक्षेचा अभ्यास करीत होता. त्यानें आपल्या आईला विचारलें, "मी यंदा परीक्षेला बसूं का?" ती म्हणाली, "बैस." मुलगा अभ्यास करूं लागला व अभ्यास करतां करतांच त्याच्या डोकें खीचा विकार वाढून प्रकरण मेनेंजाइटिसवर गेलें. स्वप्नांत त्याच्या आईनें त्याला "उडी मार असें सांगितलें होतें. वस्तुस्थितींत 'अभ्यास कर' असा त्याच्या आईचा आदेश त्याला मिळाला.

## भवितव्यदर्शनाचा आणखी एक नमुना

स्वप्नांतील भवितव्यदर्शनासंबंधीं प्रत्यक्ष अनुभवास आलेली आणखीहि एक गोष्ट या ठिकाणीं नमूद करावीशी वाटते—

माझे मित्र डॉ. प्रियोळकर यांची पुतणी सुलोचना हिला नेहमीं अर्थपूर्ण आणि सूचक अशीं स्वप्नें पडत. डॉ. महाशयांस तिच्या स्वप्नाचा पूर्ण अनुभव असल्यामुळें पुष्कळदां ते तिला पडलेल्या स्वप्नांसंबंधीं माझ्याजवळ चर्चा करीत. ही मुलगी अत्यंत हुशार व चलाख होती. १९४२ च्या चळवळींत तिनें भाग घेतला होता व ती कारागृहांतहि गेली होती. त्या पितृविहीन मुलीच्या लग्नाबद्दल डॉक्टरांनी फार काळजी लागून राहिली होती. सुलोचनेला मात्र डॉक्टरांच्या काळजीची कल्पना नव्हती. एके रात्रीं सुलोचनेची मृत आत्या तिच्या स्वप्नांत येऊन म्हणाली, "अण्णांना म्हणावं काळजी करण्याचं कारण

नाहीं, तुला श्रीमंत घराणं मिळणार आहे." ही गोष्ट कांहीं महिन्यांनीं खरी ठरली.

सुलोचनेच्या आयुष्यांतील अत्यंत महत्वाचें असें खालील स्वप्न मी माझ्या स्मरणवहींत लिहून ठेवलें आहे.

बुधवार दि २२-९-१९४३ रोजीं हिंदु पंचांगाप्रमाणें भाद्रपद वद्य ९ मी ( अविधवा नवमी ) होती. त्या रात्रीं सुलोचनेच्या स्वप्नांत कोणी एक विधवा बाई येऊन म्हणाली, "मला जेवायला वाढतेस काय ?"

"नाहीं." सुलोचनेनें तिला स्पष्ट सांगितलें. "बरें आहे तर, सव्वा वर्षपर्यंत मी बंगल्यावर जातें. नंतर मी येईन." असें बोलून ती अदृश्य झाली.

डॉक्टर प्रियोळकरांचें एक स्नेही श्री. रामचंद्रपंत मंडलीक हे त्यांच्या घराण्यापासून सुमारें दहा मिनिटांच्या अंतरावर असलेल्या एका बंगल्यांत राहातात. आणि डॉक्टरांची सर्व मंडळी मंडलीकांच्या मंडळींचा उल्लेख करितांना बंगल्यावरील लोक असा उल्लेख करितात. हाच प्रचारांतला शब्द सुलोचनेच्या स्वप्नांत असलेल्या त्या विधवेनें उच्चारला हे विशेष होय. डॉक्टरांनी हें स्वप्न मला दिनांक २३-९-४३ रोजीं संध्याकाळीं सांगितलें. मंडलीकांच्या घरावर कोणतेंतरी अरिष्ट येणार असा स्पष्ट अर्थ त्या स्वप्नांत होता.

सुलोचनेला स्वप्न पडण्यापूर्वीं कांहीं दिवस अगोदर श्री. रामचंद्रपंत मंडलीक यांनीहि असें स्वप्नांत पाहिलें होतें कीं, अंगणांत मुलें विटी-दांडू खेळत होती. त्यांची विटी शेजारच्या घरावर उडाली आणि तें घर पेटलें, आणि बोलतां बोलतां ती आग चटकन् त्यांच्या घराला लागली. श्री. मंडलीक हे अत्यंत सच्छील व प्रामाणिक गृहस्थ आहेत व अत्यंत हलाकीच्या परिस्थितींतून त्यांनीं डोकें वर काढलें

आहे आपल्या नशिबांत अजूनहि भोक्तव्य आहे असा त्या स्वप्नावरून शंका येऊन त्यांना थोडे वाईट वाटलें.

दिनांक २५-९-४३ रोजीं माझ्या कानावर बातमी आली कीं, रामचंद्रपतांचा भाऊ गंगाराम हा आजारी आहे. तो अस्वस्थ आहे असें मला कळलेंच नाहीं. मला त्याला भेटावयास जावयाचें राहूनच गेलें, कारण गंगाराम आपल्या सर्व कुटुंबाचा भार रामचंद्रपंतांवर टाकून २९-९-४३ रोजीं म्हणजे भाद्रपद वद्य अमावस्येस दिवंगत झाला. अशा रीतीने कुमारी सुलोचना प्रियोळकर हिने सात दिवस अगोदर स्वप्नांत पाहिलेल्या विधवेने बंगल्यावर जाऊन तेथील एका बाईस वैधव्य प्राप्त करून दिलें.

मे, जून १९४४ च्या सुमारास डॉक्टर प्रियोळकरांच्या घरची सर्व मुलें टॉयफॉयडने एकदम आजारी पडली. त्यांचा विकार इतका विकोपास गेला की, डॉक्टरांच्या घरांत आता दोन तीन तरी मृत्यु घडणार असें स्पष्ट चिन्ह दिसूं लागलें. परंतु ते सर्व रोगी दोन महिन्यांनीं बरे झाले आणि नुकतीच विवाहित झालेली सुलोचना आपल्या सासरीं टायफॉयडने आजारी पडली. सप्टेंबर १९४४ त सुलोचना वारली व तिच्या शोकामुळें अत्यंत विव्हळ झालेली तिची आई तिच्या पाठोपाठ तीन दिवसांनी परलोकवासी झाली. अशा रीतीने जी अवदसा सुलोचनेच्या स्वप्नांत आलीं होती ती बंगल्यावर जाऊन सव्वा वर्षाऐवजीं एकच वर्षाने परत आली व तिने तिची व तिच्या आईची इहलोकांतून उचलबांगडी केली.

ही आपत्ति सव्वा वर्षाऐवजीं एक वर्षाने आली याला कारण असें संभवतें की, स्वप्नांतील आठवण मेंदूत जशीच्या तशी उतरत नाही व त्यामुळें स्वप्नांतील संख्या आणि काळ यांचा व्यवस्थित मेळ जमत नाही. कुणाहि ज्योतिष्याला सांगतां येणार नाही इतक्या व्यवस्थितपणें कधी

कधी माणसाला स्वप्नद्वारा भवितव्य सूचित केलें जातें आणि म्हणूनच सर्व प्रकारच्या स्वप्नांत भवितव्यसूचक स्वप्नें हीं अत्यंत महत्त्वाची असतात. सर्व सामान्य माणसें आपल्या भविष्याच्या माहितीसाठी इतकीं हपापलेलीं असतात कीं शेकडों रुपये खर्च करून ते वेळोवेळीं निरनिराळ्या लोकांना आपले हात आणि पत्रिका दाखवीत असतात; परंतु जर यदाकदाचित् स्वप्नद्वारा एखादा अपूर्व संदेश त्यांना मिळाला तर तो जाणण्याची ते कधीही खटपट करीत नाहीत.

प्रत्येक माणसाच्या स्वप्नांची तऱ्हा कांहीं वेगळीच असते; कारण हें ज्याच्या त्याच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून आहे. म्हणून आपल्या स्वप्नाचा ज्यानें त्यानें स्वतंत्र अभ्यास केल्यास पुष्कळ फायदा होणें शक्य आहे.

## माझीं स्वप्नें

मला स्वतःला आजपर्यंत भवितव्यसूचक अशीं अनेक स्वप्नें पडलीं आहेत. अगदीं लहानपणापासून मला माझी आजी व आई अशीं दोनच छत्रें होतीं. पैकीं आजी म्हणजे एक जीर्ण झालेलें पान. तें केव्हां गळून पडेल याचा नेम नव्हता. आणि आई वेळोवेळीं आजारी पडावयाची. आई अस्वस्थ झाली म्हणजे जगांत आपण आतां पूर्ण-पणें पोरके होणार अशी मला धास्ती वाटे आणि एकदम एखाद्या रात्रीं स्वप्न पडे कीं आईचे प्राण देहाला सोडून गेले. घामाघूम होऊन मी जागा होई, आईचा निजलेला देह मला प्रेत वाटे आणि आतां उजाडल्यावर तिला माणसें येऊन उचलून घेऊन जातील या कल्पनेनें अंगावर शहारे येत. आपण पाहिलें तें स्वप्न अशी समजूत होण्यास बराच वेळ लागे आणि मग मी उठून आईचा श्वासोच्छ्वास चालला आहे की नाहीं, आईच्या अंतःकरणाचे ठोके चालू आहेत कीं नाहींत

याची खात्री करून घेऊन दुःस्वप्न पडल्यानंतर झोपी जावें अशा त्या वेळच्या माझ्या समजुतीप्रमाणें मी पुन्हां झोपी जात असें. अशा प्रकारचीं स्वप्नें कांहीं वेळां अनुभविल्यानंतर मला असा प्रत्यय आला कीं आई मेल्याचें स्वप्नांत पाहिल्यानंतर तिच्या प्रकृतींत थोडा आराम पडूं लागे व थोड्याच दिवसांनीं तो पूर्णपणें बरी होई.

मुंबईच्या म्युनिसिपालिटींतील पाणीपुरवठ्याच्या खात्यांतील माझे एक स्नेही श्री. महेश्वरपंत ताटके यांच्या अनुभवाशीं मी माझे अनुभव ताडून पाहतां आजारी माणूस स्वप्नांत मेलेला दिसल्यास तो बरा होतो, व तो बरा झाल्याचें दिसल्यास इहलोक सोडून जातो असें त्यांचें म्हणणें पडलें.

माझ्या नेहमीच्या जाण्यायेण्याच्या वाटेवर श्री. पुरुषोत्तमपंत नांवाचे एक गृहस्थ राहात होते. " बरोबर किती वाजले हो ? " " आज सुट्टी का ? " " काय भाजी आणली ? " असा आणि असल्या प्रकारचा एक प्रश्न त्यांनीं दररोज विचारावयाचा व मी त्याचें उत्तर द्यावयाचें असा आमचा कित्येक वर्षांचा नियम होता. हे पुरुषोत्तमपंत रक्तदाब व त्यामुळें उत्पन्न झालेली डोकेदुखी यामुळें एकदा अत्यंत आजारी झाले. त्यांना बरें करण्याच्या शक्य त्या खटपटी चालू असतां एका शनिवारीं पहाटेस मला स्वप्न पडलें—

मी माझ्या दुचाकीवरून बाजारांत चाललों होतों तों वाटेंत पुरुषोत्तमपंत हातांत पिशवी आणि आळूची भाजी घेऊन परत येतांना मला दिसले. पुरुषोत्तमपंतांचा चेहेरा नेहमीसारखा आनंदी दिसत होता. आणि त्यांचे शरीरहि एखाद्या सुखी माणसाप्रमाणें त्या वेळीं मला पुष्ट दिसलें.

सकाळीं अंथरुणावरून उठतां क्षणींच मीं तें स्वप्न आठवून पाहिलें आणि नेहमीच्या अशा प्रकारच्या स्वप्नाच्या अनुभवावरून मी मनाशीं

म्हणगांठ बांधिली की पुरुषोत्तमपंत आपला पीडलेला देह सोडून परलोकांत जाऊन मात्र सुखी होणार. त्याच दिवशीं पुरुषोत्तमपंतांच्या मेहुण्याला पुरुषोत्तमपंतांचा मृत्यु जवळ आला असल्याचें माझ्या स्वप्नानें सूचित केलेलें वृत्त मी सांगितलें. मला स्वप्न पडल्यानंतर बरोबर पंधरा दिवसांनी आलेल्या शनिवारी सायंकाळीं पुरुषोत्तमपंतांचें प्राणोत्क्रमण झालें. कुडी सोडून गेल्यानंतर पुरुषोत्तमपंत किती सुखी झाले ते मला माहीत नाहीं परंतु त्यांचे प्रेत घरांत असतांना त्यांच्या मुखावर स्मित आणि आणि आनंद विलसत होता हें त्या वेळीं तिथे जमलेल्या सर्व मंडळींच्या अजून लक्षात आहे.

स्वप्नसृष्टींतील अनेक उदाहरणें विचारांत घेतल्यानंतर जडसृष्टींतील व त्या सृष्टींतील नियम भिन्न आहेत असें म्हणावें लागतें. विचारसंक्रमण (Thought Transference) मानसिक दुर्बलता, अतृप्त कामवासना, यामुळें स्वप्नें पडतात अशी आजकालच्या केवळ जडसृष्टीवरच विश्वास ठेवणाऱ्या शास्त्रज्ञांनी दिलेली कारणें अपुरीं वाटतात.

---

## : ११ : स्वप्नांतील भवितव्य दर्शन

पुढें घडणारे प्रसंग माणसाला स्वप्नसृष्टींत निरनिराळ्या प्रकारच्या प्रतीकांनीं कसे सूचविलें जातात तें आपण मागील प्रकरणांत पाहिलें. स्वप्नांच्या प्रतीकात्मक भाषेचा माणसाला सहसा उलगडा होत नाहीं. दुःखद भवितव्याचें ज्ञान झाल्यामुळें कदाचित माणूस एकदम गडबडून जाईल म्हणूनच जणू काय स्वप्नांतील प्रतीकात्मक भाषेनें भवितव्याची जाणीव देण्याची योजना निसर्गानें केली असवी असें म्हणावें तर स्वप्नांत भवितव्याचें जसेच्या तसें दर्शन झाल्याचीही कित्येक उदाहरणें आहेत. त्यांचा परामर्ष प्रस्तुत प्रकरणांत घ्यावयाचा आहे.

जागृदवस्थेंतील मनाची तळमळ थांबली म्हणजे मनाचीं जाणीव वाढल्याचा कांहीं लोकांस कधीं कधीं प्रत्यय येतो. कधीं कधीं हे प्रत्यय अत्यंत महत्वाचें असतात; परंतु स्वप्नाची आठवण ठेवण्याचा फारसा कोणीच प्रयत्न करीत नाहीं. कुणाला तरी स्वप्नांतला अनुभव सांगितला तर सांगावा नाहींतर त्याची कांहींच दरकार बाळगूं नये अशीच सर्वसामान्य माणसाची रीत असते. परंतु स्वप्नाची फारशी परवा न करणाऱ्या माणसांना देखील कधीं कधीं अशीं अद्‌भूत स्वप्नें पडतात कीं त्याची आठवण त्यांना जन्मभर राहते.

मुंबईतील एक सुप्रसिद्ध डॉक्टर सुरेंद्र तळवळकर यांनीं एकदां मला त्यांनीं स्वतःला व त्यांच्या कुटुंबांतील कांहीं जबाबदार व्यक्तींना पडलेल्या कांहीं वैशिष्ट्यपूर्ण व अभ्यासनीय स्वप्नांचा मनोरंजक इतिहास सांगितला. त्यांतला कांहीं महत्वाचा भाग मी त्यांच्या परवानगीनें या ठिकाणीं जिज्ञासूंसाठीं सादर करीत आहे.

श्री. सुरेंद्र तळवळकर हे १९२? सालीं बडोदा हायस्कूलमध्यें विद्यार्थी असतांना त्यांना एके रात्रीं असें स्वप्न पडलें कीं, 'आपणांस महाराजांचें बोलावणें आलें आहे.' 'आपण तर एक साधे विद्यार्थी. आपणांस महाराज कशाला बोलावतील?' हाच विचार त्यांच्या मनांत वेळोवेळीं आला व त्या स्वप्नाचा कांहींच अर्थ नसावा असेंहि त्यांस वाटलें. परंतु स्वप्नांतल्या त्या आमंत्रणाचा ठसा त्यांच्या मनावर इतका उमटला होता कीं त्यांना अर्थशून्य वाटणारें तें स्वप्न त्यांच्या मनांतून जाईना. इतकेंच काय; पण तें 'स्वप्न कदाचित् महत्वाचें असेल!' असाहा एक विचार मनांत येऊन त्यांनीं तें आपलें स्वप्न कुणालाही निवेदन केलें नाहीं. कारण महत्वाचीं स्वप्नें कोणाला सांगूं नयेत अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती. (कांहीं दृष्टांत जाहला। तरी तो सांगो नये दुसरियाला। जरी नेणतेपणें सांगितला। तरी पुन्हां होणार नाहीं॥ अशी समर्थ रामदासांची आपल्या शिष्यवर्गाला स्वच्छ शिकवण होती. या ठिकाणीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं समर्थांच्या 'दृष्टांत' या शब्दांत योगमार्गावरील गुपीत असा अर्थ अभिप्रेत आहे. सर्वसामान्य माणसांना असे दृष्टांत होण्याची शक्यता जवळजवळ नसतेच. ज्या एखाद्या घटनेमुळें सगळे जग हादरलें जाईल अशी पुढें होणारी निश्चित घटना एखाद्या माणसाला स्वप्नांत दिसली तर त्यानें ती बोलून न दाखविणेंच शहाणपणाचें ठरेल.) बरोबर पांच दिवसांनीं त्यांचें स्वप्न खरें ठरलें. महाराजांना राजपुत्रा-साठीं शाळा काढावयाची होती. त्यासाठीं त्यांना बरोडा हायस्कूलमधील दोन हुषार विद्यार्थ्यांची जरूर होती. एके दिवशीं महाराजांचे कारभारी व आणखी एक गृहस्थ शाळेंत आले व बरोडा हायस्कूलच्या चालकांच्या सांगण्यावरून हुषार विद्यार्थी म्हणून तळवलकरांसकट दोन विद्यार्थ्यांना ते महाराजांसमोर घेऊन गेले. फ्राइडसारख्या महान् परंतु हट्टी व जडवादी मानसशास्त्रज्ञांनीं पूर्वीं कधीं येऊन गेलेल्या अनुभवाच्या आधारावरच

स्वप्नांची उभारणी होते. स्वप्नांचा नैसर्गिक भावनेशीं संबंध असतो, पुढें होणाऱ्या गोष्टी स्वप्नांत कधीं दिसणें शक्य नाहीं अशा अर्थाचीं जीं विधानें केलीं आहेत तीं किती चुकीचीं व भ्रामक आहेत हें श्री. तळवलकरांच्या या एकाच उदाहरणावरून सिद्ध होण्यासारखें आहे.

स्वप्नांत भवितव्य दर्शन देऊं शकतें यासंबंधींचा डॉक्टरांना आणखी एक प्रत्यय नुकताच १९५२ च्या फेब्रुवारी महिन्यांत आला. डॉ. सुरेंद्र तळवलकर हे शस्त्रक्रियेच्या वेळीं रोग्यांचीं इंद्रियें बधिर करण्याच्या शास्त्रातले खास तज्ज्ञ आहेत. मुंबईचे सुविख्यात डॉ. कैलासवासी मुळगांवकर मोठमोठ्या व कठीण शस्त्रक्रियेच्या वेळीं डॉ. सुरेंद्र तळवलकरास मदतनीस म्हणून घेत असत. दोन्ही डॉक्टराचे संबंध सलोख्याचे व निकटचे होते. परंतु डॉ. मुळगांवकरांचा अंतकाल समीप आला आहे याची जाणीवही डॉक्टर तळवलकर यांस नव्हती. ती तशी असती तर मुळगांवकरांच्या आयुष्याच्या शेवटच्या तासांत किंवा जरा अगोदर ते स्वत: त्यांस भेटावयास गेले असते किंवा आपल्याकडील एखादा तरी माणूस त्यांनीं मुळगांवकरांची वास्तपुस्त करण्यासाठीं पाठविला असता.

दिनांक ४–२–१९५२ रोजीं डॉ. सुरेंद्र तळवलकर यांच्या पोटांतील नेहमीचा विकार उपटला व ते तळमळत माटुंग्यास आपल्या बंधूंच्या एका रुग्णालयांत औषधोपचारासाठीं पडले. पहांटे ४॥ वाजेपर्यंत त्यांचा डोळा लागला नाहीं. पांचाच्या सुमारास जरा बरें वाटलें म्हणून जवळ ओढून घेतलेले पाय त्यांनीं लांब केलें व त्यांचा डोळा लागला. त्याच वेळीं त्यांना स्वप्न पडलें,

Eminent Suregon of Bombay died

‘अशीं स्वच्छ अक्षरें त्यांनीं वर्तमानपत्रांत वाचलीं. बाजूला मुळगांवकरांचें छायाचित्र होतें. पुढें आलेल्या पट्टीची जी गोल टोपी

डॉक्टर जिवंतपणीं डोक्यावर घालीत तीच त्या छायाचित्रांत होती. डॉ. मुळगांवकरांच्या स्वर्गवासाची ती हकीकत वांचून स्वप्नांत डॉ. तळवलकर यांस फार वाईट वाटलें व त्यांस जाग आली. परंतु आपण जागें झालों आहों व आपण पाहिलें तें स्वप्न होतें याची त्यांस जाणीव न होतांच त्या विषण्ण अवस्थेतच त्यांस पुनः झोंप लागली.

सकाळीं उठल्याबरोबर डॉ. सुरेंद्र तळवलकर यांचे बंधू त्यांच्या कॉटपाशीं येऊन म्हणाले, 'तुला कळलं कां रे?'

'कळलं कीं, डॉक्टर मूळगांवकर वारलें तेंच ना ?' डॉ. सुरेंद्र म्हणाले. या वाक्यानें त्यांच्या बंधूंना मोठे आश्चर्य वाटून ते म्हणाले 'अरे, तूं नुकता उठतो आहेस ना ? तूं कधीं वाचलास टाईम्स !'

'वाचला कीं— ?' आणि मग कांहीं वेळ विचार केल्यानंतर त्यांना कळून आलें कीं आपण जें वाचलं तें स्वप्नांत. त्यांच्या बंधूंनीं त्यांना जी ताजी बातमी म्हणून सांगितली ती बातमी त्यांना ताजी नव्हतीच. मग डॉ. सुरेंद्र तळवळकर यांनीं तो ५-२-१९५२ या टाइम्सचा अंक पाहिला त्यांत त्यांना स्वप्नांत पाहिलें तेंच शब्द दिसले.

डॉ. तळवळकरांस डॉ. मूळगांवकरांच्या मृत्यूची आगाऊ कल्पना असती व त्यास जर तें पहाटेचें स्वप्न पडलें असतें तर त्यांच्या मनांतील विचारांवरूनच त्या स्वप्नाची निर्मिती झाली असें कदाचित् म्हणतां आलें असतें. परंतु तसा प्रकार नसल्यामुळें माणसाला स्वप्नद्वारा दूर अंतरावर घडलेले व पुढें प्रसिद्ध होणारे प्रकार भौतिक साधनाव्यतिरिक्त अन्य तऱ्हेनें कळूं शकतात हें सिद्ध होतें.

डॉ. तळवळकर हे दिनांक ४-२-१९५२ रोजीं दिवस असतांना अंथरुणावर पडून होते. डॉ. मूळगांवकरांची प्रकृति रात्रीं ११-३० च्या सुमारास विकोपास गेली आणि त्याच वेळीं त्यांनीं घरांतल्या मंडळीस 'मी आतां चाललों. माझी आशा सोडा—' असें सांगून टाकलें.

मणोत्तर डॉ. मुळगांवकर हे डॉ. तळवळकरांस स्वप्नांत तीनदां दिसले होते. परंतु ते त्यांच्याशीं कांहींएक बोलले नाहींत.

माणसाला पडणाऱ्या स्वप्नांत सर्वांत महत्त्वाचीं स्वप्नें जर कोणतीं असतील तर ज्यांत त्याला भवितव्याचा संदेश मिळतो तीं. असल्या तऱ्हेच्या स्वप्नांचा अनुभव दुनियेंतील कितीतरी लोकांना अद्यापपर्यंत आलेला असेल. परंतु या विषयीं लोकांना फारशी आस्था नसल्यामुळें हजारो लोकांनीं आपले अनुभव लिहून न ठेवतां व कुणालाहि न सांगतां फुकट घालविले आहेत. पाश्चात्यांनीं ह्या विषयावर लिहिलेल्या अनेक ग्रंथांत स्वप्नांतील भवितव्यदर्शनासंबंधीं गोष्टी वाचावयास मिळतात. मिस्टर डब्ल्यू. टी. स्टेड्स् यांनीं आपल्या 'रिअल घोस्ट स्टोरीज' नामक ग्रंथांत ७७ व्या पृष्ठावर खालील सत्यकथा वर्णन केली आहे.

### अखेर खरें ठरलें

एक लोहार एका पाणचक्कींत कामाला होता. एके दिवशीं त्या गिरणीचें चाक बिघडलें. त्याच रात्रीं त्याला असें स्वप्न पडलें कीं, दुसऱ्या दिवशीं काम संपल्यानंतर त्या गिरणीच्या मालकानें त्याला रहावयास सांगितलें व तें चाक दुरुस्त करण्याचा त्याला हुकूम केला. तें चाक दुरुस्त करतां करतां त्याचा पाय सरकला आणि तो दोन चाकांच्या मध्यें अडकून इतका पिचला कीं, शेवटीं तो पाय कापावा लागला !

दुसऱ्या दिवशीं उठल्यानंतर त्यानें तें स्वप्न आपल्या पत्नीला सांगितलें आणि तो कामावर गेला, तो याच विचारानें कीं संध्याकाळीं मालकाच्या मुळी दृष्टीसच पडायचें नाहीं. म्हणजे चक्र दुरुस्त करण्याचा प्रसंग येताच कशाला !

मालकाने दुपारींच ताकीद दिली कीं, "आज संध्याकाळीं काम बंद झाल्यावर तें बिघडलेलें चक्र दुरुस्त झालेंच पाहिजे!" त्यामुळें

त्या लोहाराच्या मनांत धडकी भरली. मात्र संध्याकाळच्या वेळीं आपण मालकाला तोंड दाखवायचें नाहीं. हा निश्चय त्यानें कायम केला. दुपारच्या सुट्टींतच तो त्या गिरणीजवळच्या झाडींत जाऊन कांहीं तास लपून बसला. त्या ठिकाणीं गिरणीच्या मालकाची लाकडाची एक रास पडली होती. त्या राशींतून कांहीं लांकडें चोरून नेत असलेला एक मुलगा त्याला दिसला. त्या मुलाला पकडण्याकरितां म्हणून तो धावला व धांवतां धांवतां भान विसरून नेमका संध्याकाळच्या वेळीं गिरणीच्या आवारांत शिरून मालकाच्या दृष्टिपथांत आला. तो मुख्य लोहार असल्यामुळें मालक त्याचीच वाट पहात होता. आणि त्याला मालकाच्या आज्ञेनुसार तें बिघडलेलें चक्र दुरुस्त करण्याचें काम हातीं घेणें भागच पडलें; त्या वेळीं त्याला आदल्या रात्रीचें स्वप्न आठवलें व अत्यंत काळजीपूर्वक तो त्या चक्रावर काम करू लागला; परंतु त्या बिचाऱ्याचा पाय अगदीं अनपेक्षितपणें घसरला, त्याचीं हाडें पिचलीं आणि गुढघ्याच्या वरच्या भागापर्यंत त्याचा पाय अखेर कापावा लागला !" अशा रीतीनें त्या लोहारानें आधीं जें स्वप्नांत पाहिलें होतें तें अखेर खरें ठरलें.

वरील उदाहरणांतील लोहाराला त्याचें भवितव्य जसेंच्या तसें कळलें होतें.

सुप्रसिद्ध इंग्रज साहित्यिक रूडयार्ड किपलिंग याला एकदां असें स्वप्न पडलें कीं एका भव्य दिवाणखान्यांत कसला तरी समारंभ चालला असतांना आपण त्या ठिकाणीं उपस्थित आहो. आपण रांगेंत उभे आहो व त्या रांगेंतून आपणाला कांहींही दिसत नाहीं. इतक्यांत कुणीतरी मनुष्य येऊन आपला हात धरून म्हणतो ' मला तुमच्याशीं कांहीं बोलायचं आहे— एवढें स्वप्न अनुभवून किपलिंग जागा झाला.

त्यानंतर बरोबर दीड महिन्यांनी वेस्ट मिन्स्टर अबेमधें युद्ध स्मारकाची प्रार्थना होती. त्या समारंभास किपलिंग गेला असतां त्याच्यापुढें एक जाडजूड व उंच माणूस उभा असल्या कारणानें किपलिंगला रांगेतून कांहीं दिसेना. समारंभ संपल्यावर कुणीतरी एक मनुष्य त्याच्याजवळ आला व खांद्यावर हात ठेवून म्हणाला, ' मला तुमच्याशीं कांहीं बोलायचं आहे.

दींड महिन्यापूर्वी किपलिंगनें जें स्वप्नांत पाहिलें तोच प्रकार प्रत्यक्षांत जसाच्या तसा घडला होता. ( ही हकीकत किपलिंगनें Something about myself या आत्मवृत्तांत दिली आहे. )

महत्वपूर्ण अशी स्वप्नें कितीतरी माणसांना वेळोवेळीं पडतात. परंतु त्यांची कुणी फारशी दखल घेत नाहीं. अत्यशनामुळें अपचनामुळें, चिंता अथवा आधिव्याधीग्रस्ततेनें पडलेली फोल स्वप्नें पुष्कळांनीं अनुभविलीं असतील. परंतु सामान्य माणसांना-देखील आयुष्यांत वेळोवेळीं येणाऱ्या अडचणींतून व सुखदुःखातून सुटण्याचा मार्ग दाखविणारीं स्वप्नें कधींकधीं पडत असतात. मानस-शास्त्राचा गाढ अभ्यास करणाऱ्या फ्राइडसारख्या पाश्चात्य विद्वानानें " स्वप्नांत पाहिलेलीं चित्रें गतानुभवावरच अनुभवलेलीं असतात. भवि-तव्यसूचक असें स्वप्नांत कांहींच दिसणे शक्य नाहीं," असें धादांत वेडें विधान केवळ जडवादाला उराशीं बाळगून धरल्यामुळें केलें आहे ! परंतु ज्यांना म्हणून स्वप्नें पडतात. त्यांना आयुष्यांतून चारदोन वेळां तरी अडचणींतून सुटकेचा मार्ग दाखविणारीं, दुःखाच्या वेळीं धीर देणारी किंवा येणाऱ्या आपत्तीची सूचना देणारीं स्वप्नें पडलीं असतील. नागपूरचे एक सिव्हिल इंजिनिअर श्री. द. वि. दाते यांनीं आपल्या मित्राला आलेल्या एका सूचक स्वप्नांचा अनुभव त्यांच्या २२-४-४९ च्या पत्रद्वारें मला कळविला होता. ती हकीकत अशी—

• नागपूर येथील एम्प्रेस मिलमध्यें काम करणारे श्रीयुत ए. आर. दामोदर मुदलियार ( मुक्काम नाना सोनी लेन, सीताबर्डी, नागपूर ) यांना कचेरीच्या कामानिमित्त १९२८ च्या आक्टोंबरमध्यें मुंबईस जाणें भाग पडलें. काम न संपल्यामुळें डिसेंबर महिना आला तरी ते परत नागपुरास जाऊं शकले नाहींत. डिसेंबर १० पासून डिसेंबर १६ च्या दरम्यान त्यांना एकच स्वप्न वेळोवेळीं पडलें. त्या स्वप्नात त्यांना आपली बहीण विधवा होऊन रडत असलेली दिसे. आपल्या पोरांबाळांचे कसें होईल. आपल्या नशिबांत आतां पुढें दु:खच वाढून ठेवलें आहे. या जाणिवेनें ती स्फुंदून स्फुंदून रडे. श्री. मुदलियार यांनीं प्रथम या स्वप्नाचा फारसा विचार केला नाहीं परंतु पांच सहा रात्रीं त्या स्वप्नाची पुनरावृत्ति झाली तेव्हां त्या स्वप्नांत कांहींतरी अर्थ आहे असें समजून ते रजा घेऊन दिनांक २० डिसेंबर १९४८ रोजीं नागपूरला आले.

त्यांची बहीण त्यांच्या घराशेजारींच राहात होती. नागपूरला आल्याबरोबर त्यांनीं तिची चौकशी केली तेव्हां तिच्या घरांत सर्व कांहीं ठीक होतें. त्यांच्या बहिणीचे यजमान श्री. व्ही. सी. मुथुकृष्ण मुदलियार ( पेन्शनर आकौटन्ट जनरल्स् ऑफिस नागपूर-वय वर्षे ५८ ) यांची प्रकृती दिनांक २०-१२-१९४८ रोजीं उत्तम व निकोप होती.

परंतु दिनांक २१ डिसेंबर १९२८ च्या रात्रीं ११ वाजतां त्यांना एकाएकीं हृदयाचा झटका आला आणि त्याच रात्री २ वाजतां त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. २२ तारखेला सकाळीं ११ वाजतां श्री. मुथुकृष्ण मुदलियार यांची प्रेतयात्रा निघाली.

अशा तऱ्हेनें श्री. दामोदर मुदलियार यांना आपली बहीण विधवा होणार याची अकरा दिवसांपूर्वीं स्वप्नद्वारा मिळालेली सूचना खरी ठरली. हें स्वप्न जर दामोदर यांस पडून आगाऊ सूचना मिळाली

नसती तर ते नागपुरास २२ तारखेला सुद्धां येऊ शकले नसते. त्यांच्या नागपुरास येण्यामुळें मृताला मरणकाळीं फार मदत झाली व मृताच्या कुटुंबीयांसही तशा आकस्मिक दुःखाच्या वेळीं धीर देणारा माणूस लाभला.

स्वप्नद्वारा सुचविले गेलेले प्रसंग माणसाच्या आयुष्यांत किती कालाने येतील त्याचा नक्की नियम सांगता येणें कठीण आहे. मी आतां पुढें जी हकीकत देणार आहे ती वारंवार पडणाऱ्या सूचक स्वप्नाची आहे. ज्या बाईनें तें स्वप्न अनुभविलें त्या बी. नांवाच्या बाईच्या नवऱ्यानें व सावत्र बापानें त्याच्या खरेपणाबद्दल साक्ष दिली आहे.

कौमार्यावस्थेंत असतांना बी. चा बाप वारला आणि तिच्या आईनें पुनर्विवाह केल्या कारणानें ती आपल्या काकाकडे रहावयास गेली. बी. नें म्हटले आहे, '१८८२ च्या वसन्त ऋतूंत मला एके रात्रीं असें स्वप्न पडलें कीं मी व माझी बहीण काकांच्या दिवाणखान्यांत बसलों होतों. स्वप्नांत मी पाहिला तो स्वच्छ दिवस होता आणि खिडकींतून मला बाहेरच्या बागेंत पुष्कळ फुलें दिसलीं. साधारणपणें वस्तुस्थितींत एवढीं फुलें त्या खिडकींतून कधींच दिसत नाहींत. बागेवर विरळ हिम पडलें होतें. माझ्या स्वप्नांत मला कळलें होतें, कीं आमच्या घरापासून सुमारें तीन मैलांवर असलेल्या शेतांतील घोडे वाटेवर आमच्या काकांचे प्रेत सांपडलें होतें. जवळच्या एका तलावांत मासे मारण्यास जातांना काका याच रस्त्यानें जात असत. त्यांच्या प्रेताजवळ त्यांचा घोडा उभा होता. आणि त्या दिवशीं काकांनीं आपल्या पाळलेल्या मेंढ्यांच्या अंगावरील लोकरीचीं घरीं विणलेलीं वस्त्रें अंगांत घातलीं होतीं. दोन घोड्यांच्या गाडींतून त्यांचे प्रेत आणलें जात होतें. आणि आम्ही त्यांचें प्रेत येण्याची वाट पाहात होतों. इतक्यांत ती गाडी

दारापाशीं आली आणि दोन माणसांनीं तें प्रेत आमच्या घराच्या अरुंद जिन्यावरून हळूं हळूं वर आणलें. प्रेत उचलणारीं दोन्ही माणसें माझ्या ओळखीची होतीं. एक माळी होता आणि दुसरा कुत्र्यांच्या साहाय्यानें शिकार करणारा होता. माझे काका अतिशय उंच धिप्पाड असल्याकारणानें त्या दोघांना तें प्रेत वाहण्यास कष्ट पडत होते. काकांना जिन्यावरून आणतांना त्यांचा डावा हात लोंबकळत होता आणि कठड्याच्या गजांवर सारखा आपटत होता. स्वप्नांतील या सर्व बारीक सारीक तपशीलानें मला फारच धक्का बसला.' या सर्व गोष्टी मला स्वप्नांत समजल्या होत्या. हें स्वप्न पाहिल्यानंतर बी. ला झोंप लागली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तिच्या चेहऱ्यांत इतका फरक झाला होता कीं तिच्या काकांच्या लक्षांत ती गोष्ट येऊन त्यांनीं तिला चेहेरा पडण्याचे कारण विचारलें. तिनें तें आपल्याला पडलेलें स्वप्न सांगितलें व आपल्या चुलत्यास त्या स्वप्नांत पाहिलेल्या रस्त्यानें कधीहीं जाऊं नये म्हणून आग्रहाची विनंति केली. बी. ला त्यानंतर दोन वर्षांनीं तें स्वप्न जसेच्या तसेंच पडलें आणि त्याही वेळीं तिनें ते आपल्या चुलत्याला सांगितलें. १८८८ च्या मे महिन्यांत विवाहित बी लंडन येथें होती. आणि लवकरच तिला मातृपद प्राप्त होणार होते. त्याच सुमारास तिला तिसऱ्यांदा तें स्वप्न पडलें आणि त्या स्वप्नाच्या जवळ जवळ पाठोपाठच तिच्या चुलत्याला तिने स्वप्नांत पाहिल्याप्रमाणें मृत्यू आला. तिचा सावत्र बाप आणि तिची जुनी घरोब्याची दाई यांजकडून तिला जें वर्तमान कळलें तें त्यावरून स्वप्नांत आधीं पाहिलेला सर्व तपशील—तें दोन घोड्यांच्या गाडींतून प्रेत आणणें, तो लोंबकळणारा प्रेताचा डावा हात जिन्याच्या गजावर आपटणें वगैरे वगैरे—अगदीं जसाच्या तसा वास्तव्यांत उतरला होता. बी. ला तिच्या हयातींत अशी भवितव्यसूचक आणखी दोन

स्वप्नें पडलीं होतीं. बी. च्या कुटुंबांतील माणसांना अनुभव असा होता कीं, फुलें आणि हिम स्वप्नांत दिसलें कीं, कुणातरी आप्तस्वकीयाचा मृत्यू घडून यावयाचा. ( The Personality of man by G. N .M. Tyrell पृ. ७६,७७ )

मानवी व्यक्तिमत्वाच्या कोणत्या तरी कप्प्यांत जागृत मनाला अशा प्रकारें भवितव्याची आगाऊ जाणीव करून देण्याची शक्ति आहे हें वरील हकीकतीवरून सिद्ध होते. आतां असा प्रश्न निर्माण होतो कीं, अशा रीतीनें माणसाला जर भवितव्याची आगाऊ सूचना मिळाली तर त्याला संकट टाळतां येईल काय ? या प्रश्नाचेही निश्चित उत्तर देणें कठीण आहे. यासंबंधांत आणखी एकदोन उदाहरणें लक्षांत घेतलीं म्हणजे मग कदाचित् या प्रश्नावर अंधुक प्रकाश पडेल.

लेडी झेड् या न्यूयॉर्कच्या सायकिकल रिसर्च सोसायटीचे आद्य संस्थापक मिस्टर फ्रेडरिक मायर्स यांच्या सुपरिचित होत्या. त्यांनीं एकदां मायर्स साहेबांस आपला अनुभव सांगितला—

' आम्ही १८८ हेर्टफोर्ड स्ट्रीट मेफेअर इथें राहात होतों. एके दिवशीं मी असें ठरविलें कीं उद्यां आपण आपल्या एका घोड्याच्या गाडींतून आपल्या लहान मुलाला व दाईला घेऊन वुलविच इथें जावयाचे व तो दिवस आपल्या तेथील एका नातेवाईकाच्या घरीं मजत घालवावयाचा. त्याच रात्रीं मला असें स्वप्न पडलें की, पिकॅडिलच्या उत्तरेकडील एका रस्त्यावर आमची बग्गी उलटली. मी माझ्या मुलाला धरून पदपथावर उभी होते आणि आमचा म्हातारा गाडीवाला डोके रस्त्यावर आदळून पडला होता व त्याची हॅट साफ चुरगळली होती. त्या स्वप्नामुळें माझ्या मनाला इतकी उद्विग्नता आली कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं मला वाटूं लागलें बगीनें न जातां आगगाडीन जाव. मी आमच्या जुन्या व विश्वासू गाडीवाल्याला बोलावून विचारलें,

' दहा वाजतां वूलिविचला जाण्याकरितां बगी तयार ठेवशील काय ?' कामचुकारपणा करण्याची त्याला कधीच संवय नव्हती. तरी तो थोडासा कुरकुरू लागला. मी त्याला म्हणाले, ' दहाच्या ऐवजीं अकराला निघूं पाहिजे तर. ' ती वेळ त्याला एकदम पसंत पडली. '

घरीं परत येतांना ती बगी पिकॅडिलीपाशीं आली तेव्हां लेडी झेड् यांनीं घोडा जोरानें ओढीत होता म्हणून कीं काय गाडीवान आपल्या बैठकीवर मागें कलतांना पाहिला. बगी वळण घेऊन डाऊन स्ट्रीटवर आली तेव्हां बाईंना चटकन् आदल्या रात्रीच्या स्वप्नाची स्मृति होऊन त्यांनीं गाडींतून उडी मारली व मुलाला पकडले. आणि जवळच्या शिपायास हांक मारली. तो शिपाई झटकन् धावून आल्यामुळें गाडीवानाचें डोकें जें रस्त्यावर आदळले असते तें वाचलें. त्या दिवशीं त्या गाडीवानाची प्रकृति बरी नसल्यामुळें तो अपघात होणार होता. ( The personality of man by G. N. M. Tyrell. )

स्वप्नद्वारा आगाऊ सूचना मिळाल्यामुळें झेड्-बाईच्या हातून अपघात टाळण्यासारखी कृति घडली असें दिसतें. झेड्-बाईनीं स्वप्नांत आपल्या गाडीवानाला डोक्यावर पडतांना पाहिला होता परंतु समयसूचकता राखून वस्तुस्थितींत गाडीवानाचें डोक्यावर पडणें त्यांनीं वाचविलें होतें. परंतु सूचक स्वप्न पडलें तरी मनुष्य सावध राहतोच असें नाहीं. दैवानें आगाऊच योजून ठेविलेल्या ज्या घटना त्याप्रत तो आपण होऊन जातो. मग ती घटना दुःखाची असो वा समाधानाची असो.

ज्या घटना जगाच्या इतिहासांत गाजल्या त्या घडण्यापूर्वीं त्यांच्या विषयींच्या सूचना कांहीं माणसांना मिळाल्या होत्या असें निरनिराळ्या देशांतील वाङ्मयावरून आढळतें त्या कविकल्पना कित्येक जडवाद्यांनीं त्याचा इन्कार केला तरी आजकालच्या शास्त्रज्ञांनीं पूर्ण चिकित्सापत्रक पध्दतीनें संशोधन करून कित्येक अद्भुत वाटणाऱ्या घटनांवर

प्रकाश पाडला असतां तर त्याकडे कोणत्याही सूज्ञ माणसाचें दुर्लक्ष होणार नाहीं.

सन्माननीय जे. ओ. कोनर यांनीं दिनाक १९ एप्रिल १९१२ रोजी असें लिहिले कीं २३ मार्च १९१२ रोजी त्यांनी व्हाईट स्टार लाईनरच्या टिटानिक बोटीनें न्यू यॉर्कला जाण्याचें तिकिट काढलें ' ती बोट सुटण्याच्या दहा दिवसपूर्वीं,' ते लिहितात, ' मला एक स्वप्न पडलें. स्वप्नांत त्या बोटीचा खालचा पत्रा वरच्या बाजूला येऊन ती बोट पाण्यावर तरंगत आहे व तिच्यांतील माणसें व खलाशी तिच्या भोंवती पाण्यांत पडून पोहत असल्याचें मला दिसले.' आपल्या मित्रांना भय वाटू नये म्हणून त्यांनीं तें स्वप्न सांगितलें नाहीं, परंतु पुन्हां दुसऱ्या रात्रीं त्यांना तेंच स्वप्न पडलें. तरी सुद्धां त्या स्वप्नासंबंधी कुणापाशी ब्र काढला नाहीं. मात्र अमेरिकेहून त्यांच्या धंद्यासंबंधी त्यांना एक तार येणार होती. त्या तारेची ते अपेक्षा करीत राहिले. तार आली आणि जलप्रवास पुढें ढकलला तरी चालेल असें तींत सूचित केलें होतें. म्हणून जे. ओ. कोनर यांनीं आपलें तिकिट रद्द केलें त्यानंतर एका आठवड्यानें बोट सुटावयाची होती. मग त्यांनीं आपलें स्वप्न आपली पत्नी व कांहीं मित्र यांना सांगितलें. या मित्रांपैकीं तिघांनीं टिटानिका बोट सुटण्यापूर्वी यांनीं आपलें स्वप्न सांगितल्याचा पुरावा स्वतःच्या सह्यानिशी न्यू यॉर्क येथील सायकिकल रिसर्च सोसायटीकडे पाठविला आणि मिसेस ओ.' कोनर यांनीं प्रत्यक्ष कबुली देऊन त्या पुराव्याला बळकटी आणली. या चौघांनी केलेली विधानें प्रसिद्धही झाली आहेत ( पहा Journal S. P. R. Vol. 30 Page 98 ) मिसेस ओ ' कोनर यांनीं विधान केलें ' यांना कधीं स्वप्न पडण्याची संवय नाहीं आणि असल्याप्रकारचें सूचक स्वप्न तर त्यांना पूर्वी कधींच पडलें नव्हते. ' मिस्टर ओ ' कोनर याजपाशी

तर ती तार व तिकिट इत्यादि प्रत्यक्ष पुरावा होता. टिटानिका बोटीनें साउथॅम्पटन १० एप्रिल १९१२ ला सोडलें व १४।१५ एप्रिल १९१२ रोजी तरंगत्या हिमखंडावर आदळून ती बुडाली ही गोष्ट इतिहासांत नमूद झाली आहे. मिस्टर ओ ' कोनर यांस बोट बुडविण्यापूर्वी दहा दिवस अगोदर स्वप्न पडल्यामुळेंच त्यांनीं त्या बोटीनें जाण्याचा बेत रहित केला. ओ ' कोनर यांचे प्राण वाचावयाचे होते म्हणून त्यास स्वप्न पडलें. ती केवळ योगायोगाचीं बाब नव्हती.

व्यवहारांत आवडीचे असें जें कांहीं असेल त्यासंबंधीं माणसाला स्वप्न पडलें तर त्यांत आश्चर्याचा भाग जास्त नसतो. परंतु ज्या विष-यांत माणसाचें अजीबात लक्ष नाहीं त्याबाबतही सूचना देणारी स्वप्नें कांहीं लोकांना पडल्याचीं उदाहरणें संशोधकांना सांपडली आहेत.

डलविक येथील जॉन एच्. विलियम्स् नांवाचा एक गृहस्थ ३१ मे १९३३ ला सकाळीं उठला आणि परत ८–२० च्या सुमारास झोपी गेला. त्यावेळीं त्याला स्वप्न पडलें. त्यांत त्यानें रेडिओवर त्या दिवशीं होणाऱ्या डर्बीच्या शर्यतींत पहिले चार नंबर पटकाविलेल्या घोड्यांची नांवें ऐकलीं. हायपेरिऑन व किंग सालमन ही दोन नांवें त्याच्या लक्षांत राहिली. दुसरी दोन तो विसरला. मिस्टर विलि-यम्स् हा घोड्यांच्या शर्यतींच्या विरुद्ध असल्यामुळें तो घोड्याच्या नांवाशी परिचित नव्हता म्हणूनच कदाचित स्वप्नसृष्टींत ऐकलेली दोन नांवें जागृदवस्थेंत आल्यावर त्याच्या स्मृतींतून विरून गेली. मिस्टर विलियम्सनें म्हटले आहे, ' मी स्वप्नांत रेसची हकिकत आरंभापासून जुन्या रेडिओवर ऐकली. लोकांचा ओरडा चालू अस-तांनाच हायपेरिऑन दौडत पुढें गेला आणि जिंकला तेव्हां मला त्रासल्यासारखें झालें. ' ११ ते ११–३० च्या दरम्यान मिस्टर

विलियम्स यानें ती स्वप्नाची हकीकत दोघांतीघांना सांगितली. त्या तिघांपैकीं एकजण विलियन्सचा शेजारीं होता आणि रेस सुरू होण्याच्या कितीतरी अगोदर म्हणजे सुमारें ११ च्या सुमारास तो एका रेस्टा-रंटमधें बसला असतांना त्यानें विलियम्सचे स्वप्न इतरांस सांगितलें. दुसरें दिवशीं मिस्टर सी. ए. यंग आणि मिस्टर डब्ल्यू ई. रोलांड डॉटी यांनीं स्वतःच्या सहीनिशीं डर्बी दिनाच्या दिवशी सकाळींच विलियम्सनें आपणास त्याचे स्वप्न सांगितल्याचा पुरावा दिला आहे. विलियम्सनें स्वप्नांत ज्या रेडिओ सेटवर ती रेसची धावती हकीकत ऐकली होती तो त्याचा घरचा रेडिओ बिघडला होता; परंतु त्या स्वप्नाचा त्याच्या वर इतका परिणाम झाला होता कीं, ‘ आपण रेडिओ लावून तर पाहूं या, लागला तर लागला ’ या विचारानें त्यानें दुपारीं २ वाजतां आपला रेडिओ लावला आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं जी नांवे आणि जो गोंधळ त्यानें स्वप्नांत ऐकला होता तोच अनुभव प्रत्यक्ष जागेंपणीं त्याला मिळाला.

ही झाली भविष्यकाळीं घडणाऱ्या घटनेची स्पष्ट कल्पना देणारी स्वप्नें. परंतु कित्येक माणसांच्या आयुष्यांत स्वप्नद्वारा पुढें होणाऱ्या हकीकतीसंबंधी कांहीं अर्धवट सूचित केलें जातें आणि मग ती माणसें भांबावून जातात.

माझे मुंबईचे एक स्नेही श्रीयुत लक्ष्मीकांत कोठारे यांस १९३८ सालीं एकदां असें स्वप्न पडलें कीं आपल्या उजव्या हाताला कांहींतरी इजा झाल्यामुळें आपला हात बांधला आहे व आपण मुंबईच्या कोरो-नरच्या कोर्टांत काळा झगा घातलेल्या कोरोनरपुढें साक्ष देण्यास उभे आहोत. कोरोनरचा तो काळा झगा. कोर्टांतील तो कठडा आणि बांध-लेला हात या गोष्टीचा ठसा श्री. कोठारे यांच्या मनावर इतका बसला

श्रीं आज या गोष्टीला जवळ जवळ १५ वर्षें झाली तरी त्यांना त्याची अगदीं काल पाहिल्याप्रमाणें आठवण आहे. कोरोनरच्या कोर्टांत श्री. कोठारे पूर्वी कधींच गेले नव्हते व पुढेंही कित्येक वर्षे त्यांना तिथें जाण्याचा प्रसंग आला नाहीं. तें स्वप्न जसेच्या तसें त्यांना दहा पंधरा दिवसांच्या अंतरानें तीनदां चारदां पडलें व या स्वप्नांत कांहींतरी अर्थ असावा असें त्यांस वाटू लागलें म्हणून त्यांनीं आपल्या आईस ते स्वप्न सांगितले, व 'तुझा हात कधीं कधीं झोपेंत पलंगाच्या बाहेर जातो त्यामुळें तो मेहरत असेल किंवा दुसऱ्या कोणत्यातरी संवेदना त्याला होत असतील म्हणून हाताला पट्टी वगैरे बांधल्याचें स्वप्न तुला पडलें असेल' असा कांहींतरी अर्थ त्यांनीं आपल्या चिरंजीवास सांगितला. परंतु लक्ष्मीकांताचें त्यामुळें समाधान झालें नाहीं. त्या पट्टी बांधलेल्या हाताचा आणि कोरोनरचा संबंध काय असावा हें त्यांना उमगेना. अशी कित्येक वर्षें गेली आणि श्री. कोठारे यांस त्या स्वप्नाचा विसरही पडला. पुढें १० सप्टेंबर १९४६ च्या रात्रीं श्री. लक्ष्मीकांत कोठारे यांची बहीण सौ. शालिनीबाई जयकर यांस एक स्वप्न पडलें. त्यांत त्यांनीं घराच्या खिडकींतून अग्नीचा एक गोळा घरांत येतांना पाहिला व घराच्या बाहेरही कांहींतरी गडबड ऐकली. त्यामुळें भीति वाटून त्या जाग्या झाल्या. सौ. शालिनीबाईस त्या अग्निगोलाचें स्वप्न राहून राहून दोनदां तीनदां पडलें. त्यानंतर २५ सप्टेंबर १९४६ अश्विन शुद्ध प्रतिपदेस श्री. कोठारे यांच्या घरीं घटस्थापना झाली. ज्या खिडकींतून सौ. शालिनीबाईंनी तो अग्निगोल घरांत येतांना पाहिला होता त्या खिडकी-समोरच नवरात्राच्या त्या पहिल्या दिवशीं संध्याकाळीं ७ च्या सुमारास श्री. कोठारे यांच्या मातोश्री श्रीमती ताराबाई या भवानीस हार घाल-ण्याच्या तयारींत होत्या आणि त्यांचा पदर एकदम भागाहून पेटला व पाठ भाजली. मुंबईचें डॉक्टर वेलकर, डॉक्टर रेळे व त्यांचे तीन

बंधु, डॉक्टर माणिकराव धैर्यवान् व त्यांचे चिरंजीव इत्यादि एकंदर सात डॉक्टरांनीं श्रीमती ताराबाई कोठारे यांस वांचविण्याची शिकस्त केली. होती परंतु श्री. लक्ष्मीकांत कोठारे यांस आठवड्यांपूर्वी व सौ. शालिनीबाईस पंधरा दिवसांपूर्वी त्यांच्या स्वप्नानें सूचित केलेल्या त्यांच्या मातोश्रीचा मृत्यू दि. २७ सप्टेंबर १९४६ रोजीं घडून आला. श्री. लक्ष्मीकांत कोठारे यांचा उजवा हात आपल्या आईस वांचवितांना भाजला होता म्हणून त्याला पट्टी बांधावी लागली व त्या तशा हातानें साक्ष देण्यास त्यांना कोरोनरपुढें उभें रहावें लागलें. कोर्टांतला तो आठ वर्षांपूर्वी स्वप्नांत पाहिलेला जशाच्यातसा देखावा पाहून त्या स्वप्नानें काय सूचित केलें होते तें त्यास समजलें. सौ. शालिनीबाईस अग्नि-गोल दिसला होता. त्यानें अग्नीपासून मृत्यू सूचित केला होता. मात्र तो कोणाचा हें मागाहून स्पष्ट झालें.

भवितव्य जाणण्याची माणसाला फारच उत्कंठा असते. आपले सर्व व्यवहार भवितव्याकडे लक्ष ठेऊनच केले जातात. साप्ताहिक व मासिक भविष्य छापणाऱ्या वर्तमानपत्रांचा जो अचाट खप होतो तो माण-सांच्या भवितव्य जाणण्याच्या लालसेमुळेंच. उद्यां सूर्य नक्की उगवणार आहे याची आपणाला खात्री असल्यामुळेंच आपण समाधानानें जगतो. पेरल्यानंतर उगवण्याची आणि दसऱ्यानंतर दिवाळीची आपण अपेक्षा करीत असतो. मानवाचे भवितव्य या दोन गोष्टींवर अवलंबून असते. भरती, ओहोटी, सूर्यग्रहणादि गोष्टी निसर्ग–नियम लक्षांत घेऊन आणि पूर्वीच्या अनुभवावरून अगाऊ सूचित केल्या जातात. आपल्याला प्रवास करावयाचा असला म्हणजे निघण्याची वेळ व पुढील सर्व कार्य-क्रम रेल्वे किंवा विमान कंपनींने आगाऊच आखून ठेवलेल्या वेळापत्र-काबरहुकूम आपण आखीत असतो. परंतु वर्तमान आणि भूतकालीन घटनांशीं ज्यांचा संबंध आपणाला जोडतां येत नाहीं अशा कितीतरी

हकीकती आणि प्रसंग माणसांच्या आयुष्यांत भविष्यकाळीं घडावयाचें ठरून गेलेलें असते हें उपरिनिर्दिष्ट अनुभव देशोदेशींच्या लोकांना प्रत्य-यांस आल्याचे वांचून वाचकांच्या लक्षांत आले असेल. ज्योतिष आणि हस्तसामुद्रिक जाणणाऱ्या माणसांनां कितीतरी पैसे देऊन शेंकडों लोक आपलें भविष्य जाणण्याचा प्रयत्न करितात. माणसाच्या जाणिवेच्या कोणत्यातरी कप्यांत हें भविष्य जाणण्याचें सामर्थ्य आहे. तो कप्पा अभ्यासानें आणि प्रयत्नानें माणसांना हुडकून काढतां आला तर ज्ञानार्जनाचें एक अमर्याद दालन त्याला खुलें होईल यांत शंका नाहीं.

## : १२ : उपसंहार

अशा रीतीनें मागील सर्व प्रकरणांत स्वप्न म्हणजे काय तें आपण जाणण्याचा प्रयत्न केला. स्वप्नें ही विविध प्रकारचीं असतात. ती केवळ मनांतल्या कल्पनेमुळें उद्भवलेलीं अतएव अर्थशून्य असतात तर कधीं कधीं ज्याची कल्पनाही नाहीं त्याची अंशतः अथवा संपूर्ण जाणीव करून देणारीं असतात आणि कुणाच्याही जीवनांत याच प्रकारची स्वप्नें ही अत्यंत महत्त्वाची होत. या दृष्टीनें स्वप्नांतील दूरदर्शन, स्वप्नांत भेटणारी जिवंत व मृत माणसें व स्वप्नांतील भवितव्य दर्शन हीं प्रकरणें जिज्ञासूंनीं लक्षपूर्वक वाचावीं.

स्वप्नांतील जाणीव ही कांहीं निराळ्याच प्रकारची असते हें मागील कांहीं प्रकरणें वाचून वाचकांच्या नीट ध्यानांत आलें असेल. कोणत्याही गूढ गोष्टींचा बोध होण्याकरितां सामान्य माणसाला चित्ताची एकाग्रता करावी लागते. देह झोंपी गेला म्हणजे कधीं कधीं चित्ताची एकाग्रता किंवा स्थिरता सहज साधली जाते आणि मग उघड्या खिडकींतून जशी मंद शीतल वाऱ्याची झुळूक यावी त्याप्रमाणें प्रशांत झालेल्या चित्तांत नवे विचार शिरूं शकतात.

जडदेह विषयक स्वप्नांस जीवनांत फारसें महत्त्व नाहीं. फ्राइडसारखे जडवादी स्वप्नांची मीमांसा करितांना विवाक्षित मर्यादेपर्यंत येऊन अटकले आहेत. फ्राइडनें Unconscious म्हणजे अंतर्मनाची किंवा सुप्त

जाणिवेची जी मीमांसा केली आहे, ती मात्र बरोबर आहे असें कबूल करणें अवश्य आहे. कारण सुप्त मनाचें व्यवहार लक्षांत घेऊन त्यानें जें कांहीं प्रयोग केलें त्यामुळें रोगी बरें झाल्याचें प्रत्ययास आलें आहे.

प्रस्तुत ग्रंथाच्या ६ व्या प्रकरणापासून पुढील सर्व प्रकरणांत उच्च जाणीवदर्शक अशा कितीतरी स्वप्नांचे दाखले दिले आहेत. ही उच्च जाणीव माणसांत सारखी नसते. ऋषिमुनींनी अभ्यास करून ह्या उच्च जाणीवेचा प्रत्यय घेतलेला असतो. अनभ्यस्त माणसाच्या हातांत एखादे सुरेल वाद्य दिलें तर त्यांतून हृद्य संगीत त्याला काढतां येत नाहीं. मात्र त्या माणसाचें चुकून एखाद्या स्वरावर बोट पडल्यानें एखादी मधुर लकेर निर्माण व्हावी त्याप्रमाणें सामान्य माणसाला चुकून थोड्याशा उच्च जाणिवेचा प्रत्यय येतो आणि तो येण्यासही माण-साची चित्तशुद्धी त्याच्या मनाची प्रसन्नता व एकाग्रता यांचा चकन माकून समन्वय व्हावा लागतो. उच्च जाणिवेला अवश्यक असणारी चित्ताची एकाग्रता देह झोंपी गेला असतांना किंवा बाह्य व्यवहार बंद झाले म्हणजे साधते म्हणूनच चित्ताची एकाग्रता करण्याचे पतञ्जलीने जे उपाय सांगितलें आहे त्यापैकीं स्वप्न व निद्रा या अवस्थेचा अभ्यास हा एक उपाय आहे.

स्वप्ननिद्राज्ञानालम्बनं वा ॥ पातञ्जल योगसूत्रम

समाधिपाद १–३८

" अथवा स्वप्न आणि गाढनिद्रा या अवस्थांच्या ज्ञानाच्या आश्रय केल्यानें एकाग्र होते "

एकाग्र चित्र झालें म्हणजे त्या चित्ताची जाणीव अनंत पटीनें

वाढत असते. सामान्य माणसाला स्वप्नस्थितींत कधीं कधीं अवाचितपणें चित्ताची एकाग्रता साधत असते आणि म्हणूनच जागृदवस्थेंत न सुटणारी कोडीं सुटतात न घडलेले परंतु पुढें निश्चित घडणारे प्रसंग दिसतात. विज्ञानशास्त्रज्ञांना ज्यांचा अजून पूर्ण तलास लागला नाहीं, असे भूर्लोक, भूवर्लोक, स्वर्लोक, महर्लोक, जनलाक, तपलोक व सत्यलोक अस्तित्वांत आहेत व त्यांचा उल्लेख गायत्री मंत्रांत व इतरत्र केलेला आहे. माणूस हा नुसता जडदेहधारी नसून १ अन्नमय २ प्राणमय ३ मनोमय ४ विज्ञानमय व ५ आनंदमय अशा पांच प्रकारच्या देहांनीं अथवा कोषांनीं तो युक्त आहे. त्या सर्व कोषांचीं वर्णनें तैत्तिरीयोपनिषदांत सांपडतात. ते सर्व कोष एकमेकांशीं निगडित झाले असून सिद्ध पुरुषाला संपूर्ण जाणिवेनें जड देह भूलोकावर ठेवून निरनिराळ्या कोषांसह निरनिराळ्या लोकांत संचार करतां येतो. सामान्य माणूस स्वप्नांत आपल्या प्राणमय किंवा मनोमय कोषाचा उपयोग करून भूवर्लोकांत व स्वर्लोकांत संचार करून येऊं शकतो अशी वर्णनें उपनिषद् वाङमयांत सांपडतात.

प्राणेन रक्षन्नवरं कुलायं बहिष्कुलायादमृतश्चरित्वा ।
स ईयतेऽमृतो यत्र कामꣳहिरण्मयः पुरुषः एकहꣳस ॥
— बृहदारण्यक ४-३-१२

क्षुद्र घरट्याचें ( देहाचें ) रक्षण ( मृत्यूपासून ) करण्याचें काम प्राणवायुवर सोपवून त्या घरट्याबाहेर भटकून तो अमर आत्मा तो ईश्वरासारखा पुरुष स्वेच्छेनुसार जातो.

तद्यथा महामत्स्यः उभे कूले संचरति-पूर्वं चापरं चैवमेवायं पुरुष एतावुभावन्तानुसंचरति स्वप्नान्तं च बुद्धान्तं च ।

ज्याप्रमाणें एखादा मोठा मासा उजव्या बाजूच्या व डाव्या बाजूच्या

अशा दोन्ही तीरांवर वावरत असतो. त्याप्रमाणें हा पुरुष स्वप्न व जागृति या दोन्ही अवस्थेंत संचार करीत असतो.

आत्मेति योऽयं विज्ञानमयः प्राणेषु हृद्यन्तर्ज्योतिः पुरुषः स समानः सन्नुभै लोकाननुसंचरतिध्यायतीव लेलायतीव स स्वप्नोभूत्वेयं लोकमतिक्रामति मृत्यो रूपाणि ॥ –बृह्मारण्यक ४-३-७

—जो हा विज्ञानमयः आत्मा, जो हा हृदयांतील प्रकाश स्वरूप पुरुष तो दोन्ही जगांत संचार करतो. स्वप्न होऊन तो मृत्यूचें सर्व आकार सोडून जातो. ( स्वप्नांत तो मृत्युलोकपासून दूर जातो. )

स्वप्नांतील दूरदर्शन या प्रकरणांत माणूस आपल्या सूक्ष्म देहानें कसा दूरवर जातो, निरनिराळे देखावे पहातो व अनुभव घेतो त्याची कित्येक उदाहरणें आपण पाहिलीं.

स्वप्नेन शरीरमभिप्रहत्यासुप्त : सुप्तानाभिचाकशीति
शुक्रमादाय पुनरेति स्थानं हिरण्मय : पुरुषः एकहंस :
बृहदारण्यक ४-३-११

स्वप्नांत शरीराला लांब झोपवून स्वप्नरहित असलेला तो आत्मा झोंपलेल्याला निरनिराळ्या प्रकारचीं स्वप्नें दाखवितो. आपलें शुद्ध स्वरूप धारण करून झाल्यानंतर ईश्वरासारखा तो पुरुष दूरवर संचार करणारा तो एकटा पुन्हां जागृदवस्थेंत येतो.

अनेक प्रयोगाअंती व संशोधनानंतर आधुनिक शास्त्रज्ञ माणसाच्या जाणिवेचे विविध कप्पे आहेत हें मानू लागले आहेत व त्यात्या देहांनीं तो निरनिराळ्या लोकांत संचार करूं शकतो ही वस्तुस्थिति अजून त्यांना आकलन झालेली नाहीं. आपल्या प्राचीन आध्यात्मिक ग्रंथांत जीवात्म्याच्या विविध स्वरूपांची जाणिवेच्या अवस्थांची शरीराच्या कोषांची व त्या त्या कोषाच्या संचार करण्याच्या लोकांची खालीलप्रमाणें व्यवस्थित छाननी केली आहे.

| जीवात्म्यांचीं नांवें | जाणीवेच्या अवस्था | Sub-states | शरीरें | कोश | लोक |
|---|---|---|---|---|---|
| वैश्वानर | जागृति | Physical or Waking | स्थूल शरीर | अन्नमय | भूर्लोक |
| तैजस | स्वप्न | Physical<br>Dream<br>Trance<br>Highest<br>Trance | सूक्ष्म शरीर ( Astral or mental body) | प्राणमय कोश (etheric double)<br>मनोमय कोश<br>विज्ञानमय कोश ( Causal ) | भूर्लोक<br>भुवर्लोक<br>स्वर्लोक<br>महर्लोक |
| प्राज्ञ | सुषुप्ति | कुमार<br>नारद<br>मनु<br>(प्राजापत्य) | कारण शरीर (body higher than causal Buddhic Nirvanic etc.) | आनंदमय कोश<br>जन-आनंद<br>तप-आनंद<br>सत्य-आनंद | <br>जनर्लोक<br>तप लोक<br>सत्य लोक |

या नकाशावरून नजर फिरविली म्हणजे हें लक्षांत येतें कीं स्वप्नसृष्टींत माणूस सूक्ष्म शरीरानें किंवा उपनिषदाच्या परिभाषेंत सांगावयाचे म्हणजे प्राणमय मनोमय किंवा विज्ञानमय कोषांचा उपयोग करून भूर्भुवादि लोकांत संचार करूं शकतो. वरवरच्या

लोकांत संचार करितांना जाणिवेची विविध दालनें खुली होतात व त्या विकासित संपन्न जाणिवेला भूलोकांवर ज्या गोष्टी केवळ अगम्य असतात त्यांचा साक्षात्कार होतो. याविषयीं प्रश्नोपनिषदांत म्हटलें आहे—

अत्रैष देवः स्वप्ने महिमानमनुभवति । यद्दृष्टं दृष्टमनुपश्यति श्रुतं श्रुतमेवार्थमनुश्रृणोति देशादिगन्तरैश्च प्रत्यनुभूतं पुनः पुनः प्रत्यनुभवति दृष्टंचादृष्टं श्रुतं चाश्रुतं चानुभूतं चाननुभूतंच सच्चासच्च सर्वं पश्यति सर्वः पश्यति । प्रश्नोपनिषद ४–५॥

—मग तो देव ( शरिरस्थ देव, आत्मा अथवा मन स्वप्नसृष्टींतील विवृद्ध कार्यक्षेमतेचा ( जाणिवेचा, शक्तीचा ) अनुभव घेतो. ( जागृदवस्थेंत ) पाहिलेल्या गोष्टी तो पुन्हा पहातो. ( जागृदवस्थेत ) ऐकलेलें जें कांहीं तें तो पुन्हां ऐकतो. देशोदेशीं जाऊन जे अनुभव घेतले असतील ते तो पुन्हां घेतो. पाहिलेलें आणि न पाहिलेलें ऐकलेलें आणि न ऐकलेलें, अनुभविलेलें आणि न अनुभविलेलें जे सत् आहे आणि जे असत् आहे ते सर्वच्या सर्व तो पाहूं शकतो.

जागृदवस्थेंत ऐकलेल्या पाहिलेल्या व अनुभविलेल्या गोष्टी माणसाला स्वप्नांत कधीं कधीं जसाच्या तशा तर कधीं कधीं थोड्या फार विचित्र तऱ्हेनें ऐकता पाहतां व अनुभवितां येतात हें फ्राइडसारखे मानसशास्त्रज्ञ कबूल करितात परंतु जें अश्रुत आहे, अदृष्य आहे, अननभूत आहे त्याचा साक्षात्कार स्वप्नसृष्टींत वावरणाऱ्या माणसास होऊ शकतो, हें आपण स्वप्नांतील दूरदर्शन, स्वप्नांत भेटणारीं मृत माणसें व स्वप्नांतील भवितव्य दर्शन इत्यादि प्रकरणांत पाहिलें. भूवर्लोक व इतर उच्चतर लोकांत जाणिवेनें वावरण्याची सिद्धी योग्यांना प्राप्त झालेली असतें. याविषयीं श्रीमद्भगवद्गीतेंत असे स्पष्ट सांगितलें आहे कीं या निशा सर्वभूतानां तस्या जाग्रति भूतानि सानिशा पश्यतोमुनेः॥२-६९

—जी सर्व प्राणिमात्रांची रात्र असते तीमध्यें इंद्रियानिग्रहि पुरुष जागृत असतो ( म्हणजे आपला जडदेह इतर प्राणिमात्राप्रमाणें झोंपवून निरनिराळ्या लोकांत जाणिवेनें संचार करीत असतो—विधायक उद्योग करीत असतो ) आणि जेव्हां ( दिवसा ) सर्व प्राणिमात्र जागे असतात ती ज्ञानवान् पुरुषांची रात्र असते. ( म्हणजे त्याहि वेळीं डोळे मिटून समाधिस्त बसून तो योगी भूलोकाव्यतिरिक्त इतर लोकांत व्यवहार करीत असतो. )

योग्याला ज्या गोष्टी त्याच्या अभ्यासामुळें सहज साध्य असतात त्या कधीं कधीं माणसाला स्वप्नसृष्टींत अनुभवितां येतात. सामान्य माणसाच्या प्राणामय मनोमयादि कोषांची अभ्यासानें तयारी झालेली नसल्या कारणानें देह निद्रिस्त असतांना तो जरी भूवर्लोकांत किंवा स्वर्लोकांत जाऊन आला तरी तिथला अनुभव त्याच्या पार्थिव जाणिवेंत जशाच्या तसा उतरत नाहीं. ही कामें सिद्ध पुरुषांचीच होत. औरंगजेबाचा विनाश समर्थ रामदासांनीं स्वप्नसृष्टींत पाहिला होता. समर्थांनीं **इ. स. १६८१** सालीं समाधि घेतली व औरंगजेब **इ. स. १७०७** सालीं म्हणजे समर्थनंतर सव्वीस वर्षांनीं कालवश झाला ही गोष्ट इतिहास प्रसिद्ध आहे. परंतु समर्थांनीं जिवंतपणीं रचलेल्या त्यांच्या आनंदवन भूवन प्रकरणांत औरंगजेबाचा विनाश सूचविणारे खालील उद्गार आहेत.

उदंड जाहले पाणी स्नान संध्या करावया
बुडाला औरंग्या पापी—
स्वप्नीं जे देखिलें डोळां। तें तें तैसेचि जाहले ॥

स्वच्छ आरशामध्यें जसें आपण आपलें रूप पहावें तसें सिद्ध पुरुषाला भवितव्याचें दर्शन होऊं शकते. स्वतःला वेळोवेळीं पडणाऱ्या

स्वप्नांचा सूक्ष्म अभ्यास केल्यास सामान्य माणसालाही त्याच्या ठिकाणीं असणारी सुप्त जाणीव जागृत करतां येईल, विकसित करतां येईल. परंतु ज्या बाटलीमध्यें सुगंध ओतावयाचा ती बाटली जशी अगदीं स्वच्छ असावी लागते त्याप्रमाणें उच्च प्रकारचे ज्ञान ग्रहण करणारें मन विकाररहित व निर्मल असावें लागते व तसें असण्यासाठीं माणसाचे दैनंदिन आचरण शुद्ध असावे लागतें. झोंपतेवेळीं जो शेवटचा विचार माणसांच्या मनांत येतो तोच अत्यंत उदात्त असला पाहिजे आणि त्या विचाराची उदात्तता मागल्या सबंध दिवसाच्या आचरणावर अवलंबून असते. सर्व दिवसभर ज्या माणसानें केवळ लोभमूलक किंवा पापमूलक व्यवहार केलें असतील त्यानें झोपतेवेळीं क्षणभर भगवन्नामयस्मरण केलें तरी ज्या विचारानीं त्याच्या मनाची दिवसभर पकडून ठेवलेलें असते तेच प्रबळ विचार त्या ईश्वरविषयक विचारांना डावलून त्या माणसाला स्वप्नसृष्टींत घेऊन जात असतात. आयुष्याच्या शेवटीं जशी माणसाला काल निद्रा येते, आयुष्य भर जे बरे वाईट विचार माणसानें उराशी बाळगलेले असतात, तेच विचार मृत्यूच्या क्षणीं त्याच्या मनांत येऊन त्या विचारानुसार त्या त्या गतीप्रत तो जात असतो. त्याचप्रमाणें दिवसाच्या शेवटी घेतल्या जाणाऱ्या झोपेचा प्रकार आहे.

यं यं वाजपि स्मरन्भावंत्यजत्यन्ते कलेवरम् ।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावितः ॥ गीता ८-६ ॥

“ हे अर्जुना ज्या ज्या देवतेच्या स्वरूपाचें किंवा ज्या ज्या वस्तूचें अन्तकालीं स्मरण करीत मनुष्य हा देह सोडतो त्या त्या वस्तूलाच तो प्राप्त होतो. या श्लोकांतील सदा तद्भावभावितः ही शब्दरचना लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ज्या भावना माणसांच्या मनांत आयुष्य-

भर सदैव घोळलेल्या असतात. त्याच भावना कालनिद्रेच्या वेळींदेखील त्याच्या मनांत असतात त्या दृष्टीने आपले आचारविचार व भावना शुद्ध असणें जरूर आहे, त्याच आपल्याला जे शुद्ध आहे, जे पवित्र आहे, उदात्त आहे त्याप्रत नेतात, शुद्धाचरणं ही योगाभ्यासाची तयारी आहे. ज्या माणसाचें दैनंदिन व्यवहार धुतल्या तांदळाप्रमाणें चोख असतात त्याला दुःस्वप्नें पडत नाहींत. तो झोपी गेला असतां त्याचें सुविचार त्याला उत्तम लोकांत हिंडवितात. भूलोकांवर प्राप्त न होणाऱ्या अलौकिक आनंदाचा अनुभव घेऊन दुसऱ्या दिवशीं उठल्यानंतर तो माणूस उत्साहानें आपल्या विधायक उद्योगास हात घालतो.

# मराठी थिऑसॉफिकल फेडरेशननें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें.

| | रु.आ.पै. |
|---|---|
| (१) थिऑसफीवरील सुबोध व्याख्यानें<br>भाषांतरकार द. भा. लेले, बी. ए. | ०-१२-० |
| (२) सिद्धपुरुष व त्यांचा संप्रदाय<br>लेखक वा. ल. चिपळूणकर व रा. स. भागवत | १-१२-० |
| (३) हिंदु सामुदायिक पूजा (भारत-समाज-रचित)<br>सार्थ व सटीप ले. रा. स. भागवत एम्. ए. (ठाणें) | ०-४-० |
| (४) महम्मद पैगंबर व त्यांचा इस्लाम धर्म<br>ले. वा. ल. चिपळूणकर | ०-४-० |
| (५) मृत्यूनंतर काय? (दोन जिज्ञासूंचा संवाद)<br>ले. रा. स. भागवत. एम्. ए. | ०-४-० |
| (६) ईश्वर आहे काय? (दोन जिज्ञासूंमधील संवाद) ले. रा. स. भागवत | ०-४-० |
| (७) थिऑसफी म्हणजे काय? ले. रा. स. भागवत, एम्. ए. | ०-४-० |
| (८) साधनचातुष्टय—"कृष्णजी"-कृत "At the Feet of the Master"चें मराठी भाषांतर | ०-८-० |
| (९) जीवनाचा हेतु—ले. वा. ल. चिपळूणकर | ०-४-० |
| (१०) थिऑसफींत नवीन काय आहे? (दोन जिज्ञासूंचा संवाद) ले. वा. ल. चिपळूणकर व. रा. स. भागवत | ०-४-० |
| (११) थिऑसफी व जनतेच्या दारिद्र्याची हकालपटी<br>ले. रा. स. भागवत | ० ४-० |

# स्वप्नसृष्टि

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १४ | वाचून | वांचून |
| २ | १९ | छात्रि | छत्री |
| ३ | ३-४ | दाट अरण्य —प्रतिक होय | " दाट अरण्य किंवा —प्रतिक होय " |
| ३ | १५ | आईबाप माण-साला— | " आईबाप माण-साला— |
| ५ | ५ | मामांसा | मीमांसा |
| ७ | २३ | स्टिकन्स | स्टिफन्स |
| २१ | ७ | जागृदवस्तेप्रमाणें | जागृदवस्थेप्रमाणें |
| २४ | २४-२५ | तें तें स्वप्न | तें स्वप्न |
| २७ | १७ | dream & Sun | Dream & Sex |
| ३२ | १९ | आपल्या | अल्प |
| ३५ | १३ | भगवान | भगवान् |
| ३७ | २३ | गावा | गांवीं |
| ३८ | १९ | निवळ | निव्वळ |
| ३९ | २२ | बंधन | बंधनें |
| ५५ | ३ | सुचकता | सूचकता |
| ५[illegible] | ४ | अभ्याससकाला | अभ्यासकाला |
| ६१ | १४ | आला होता | झाला होता |
| ६५ | २२ | यांनीहि | यांनाहि |
| ७५ | २४ | सूर्याजीरावच्या | सूर्याजीरावाच्या |
| ७७ | १० | तीनतीशशें | तीनतीनशें |
| ७९ | १६ | पटिका | पट्टिका |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८० | २२ | उमळ | उभळ |
| ८५ | ३ | वाचतां | वाजतां |
| ८७ | १८ | परंतू | परंतु |
| ९४ | १३ | घराण्यापासून | घरापासून |
| १०१ | ५ | देऊं | होऊं |
| १०१ | १८ | मट्टुयास | माटुंग्यास |
| १०२ | २ | वांचून | वाचून |
| १०३ | २३ | येताच | येतोच |
| १०८ | ९ | बसला'. या सर्व गोष्टी—होत्या | बसला. या सर्व गोष्टी—होत्या.' |
| १०८ | २१-२२ | कळलें तें त्यावरून | कळलें त्यावरून |
| १०९ | ४ | ७६७७ | ७६—७७ |
| १०९ | १८ | मजत | मजेंत |
| १०९ | २४ | आगगाडीन जाव | आगगाडीनें जांवें |
| ११० | २३ | कवि कल्पना कित्येक | कवि कल्पना म्हणून कित्येक |
| १११ | १ | असता तर | असला तर |
| ११५ | ३ | आठवड्यापूर्वी | आठ वर्षांपूर्वी |
| ११८ | १० | चकन | चुकून |
| ११९ | २३ | बद्धान्त | बुद्धान्त |
| १२० | ४ | सन्नुषै | सन्नुभौ |
| १२१ | ६ (आडवी) | मदर्लोक | महर्लोक |
| १२२ | २५ | सर्वभूतानां तस्था | सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी यस्यां |
| १२३ | १३ | जशाच्या | जसाच्या |
| १२४ | ११ | मनाची | मनाला |